सोलापूर तरुण भारत
# आसमंत



# संघाचा वैश्विक संवादविस्तार : भारतीय विचारांचा जागतिक प्रवास

**निमित्त**
**सुनील आंबेकर**

शंभर वर्षांच्या प्रवासात काळानुरूप बदल आत्मसात करत, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने आपल्या कार्याचा विस्तार केला आहे. व्यक्तिनिर्माणातून राष्ट्रनिर्माणाचा ध्यास घेऊन सुरू झालेल्या या प्रवासात भारतीय संस्कृती, हिंदुत्वाची व्यापक संकल्पना आणि विश्वकल्याणाची दृष्टी जागतिक स्तरावर पोहोचवण्याची गरज संघाने ओळखली आहे. याच जाणिवेतून संघाच्या विचारांचा आणि कार्याचा जागतिक स्तरावर परिचय करून देण्यासाठी व्यापक संवादाचे प्रयत्न सुरू आहेत. प. पू. सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे अमेरिका, कॅनडा आणि 'यूके'चे अलीकडील दौरे, तसेच सरकार्यवाह दत्तात्रेय होसबाळे यांचे 'यूके', अमेरिका, जर्मनीचे दौरे हे याच दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

१९२५ मध्ये डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली, तेव्हा भारत पारतंत्र्यात होता. राष्ट्राची उभारणी केवळ राजकीय प्रयत्नांच्या किंवा सत्तापरिवर्तनाच्या भरोशावर होऊ शकत नाही, ही त्यांची ठाम धारणा होती. भारतीय परंपरेनुसार, राष्ट्रनिर्माणासाठी प्रत्येक व्यक्तीचे योगदान, समाजाचे संघटन आणि सामूहिक प्रयत्न आवश्यक असतात. राष्ट्राला संघटित, समृद्ध आणि सामर्थ्यसंपन्न बनवायचे असेल; तर चारित्र्यसंपन्न, शिस्तबद्ध, समाजनिष्ठ आणि राष्ट्रहिताला प्राधान्य देणारी नवी पिढी घडवावी लागेल. याच ध्यासातून व्यक्तिनिर्माण आणि समाजसंघटनाच्या माध्यमातून राष्ट्रनिर्माणाचे कार्य करणार्या संघाचा जन्म झाला.

डॉ. हेडगेवार यांनी भारताच्या राष्ट्रीय अस्मितेचा आणि सांस्कृतिक एकात्मतेचा आधार हिंदुत्वात पाहिला. हजारो वर्षांपासून भारताला जोडणारा सांस्कृतिक धागा म्हणजे हिंदुत्व, ही संघाच्या विचारधारेमागील मूलभूत भूमिका आहे. भाषा, प्रांत, खानपान, उपासना आणि परंपरा यांमध्ये विलक्षण विविधता असूनही भारतीय समाजाला एकात्मतेने बांधून ठेवणारी संस्कृती ही भारताची शक्ती आहे. या सांस्कृतिक एकात्मतेला बळकटी देऊन समाजाचे संघटन करणे, हे राष्ट्रनिर्माणासाठी आवश्यक आहे. याच विचाराचा विस्तार आज संघाच्या जागतिक संवादातूनही दिसून येतो.

> **१९२५ साली विजयादशमीला स्थापन झालेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची १०१ वर्षांची प्रदीर्घ वाटचाल म्हणजे 'व्यक्तिनिर्माणातून राष्ट्रनिर्माणा'च्या अविरत ध्येयव्रताचेच प्रतिबिंब! संघाच्या शताब्दीवर्षात सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी विविधतेतील एकात्मतेचा विचार सातासमुद्रापारही नेला. त्यानिमित्ताने संघाच्या या जागतिक संपर्क विस्तारामागील विश्वकल्याणाच्या भावनेचे महत्त्व अधोरेखित करणारा हा लेख...**

जागतिक संवादातून हिंदुत्वाची व्यापक मांडणी सरसंघचालकांच्या अमेरिका, कॅनडा आणि ब्रिटनमधील दौर्यांचा उद्देश केवळ अनिवासी भारतीयांशी संवाद साधणे हा नव्हता; तर संघाची विचारधारा, भारतीय संस्कृतीची वैश्विक दृष्टी आणि हिंदुत्वाची व्यापक संकल्पना जगासमोर मांडणे, हाही त्यामागील महत्त्वाचा हेतू होता. न्यूयॉर्कमधील 'युनिव्हर्सल वननेस', टोरोंटोमधील 'हिंदू विश्व बंधू' आणि लंडनमधील 'सेलिब्रेट वननेस' या कार्यक्रमांतून, विविधतेतील एकात्मतेचा विचारच अधोरेखित करण्यात आला. न्यूयॉर्कमधील 'युनिव्हर्सल वननेस' कार्यक्रमात पाच हजारांहून अधिक लोक सहभागी झाले. विविध धर्म, श्रद्धा आणि पंथांचे प्रतिनिधीही या संवादात सहभागी झाले. धार्मिक कट्टरतेच्या पलीकडे जाऊन आध्यात्म, मानवी मूल्ये आणि परस्पर सन्मान यांवर भर दिल्यास जगात सुख, शांती आणि सौहार्द कसे वाढू शकते, हा विचारही या संवादातून मांडण्यात आला.

हिंदुत्वाची व्यापकता ही विविधतेचा स्वीकार करून मानवतेला जोडण्यात आहे. धर्म, पंथ, उपासना आणि परंपरा भिन्न असू शकतात. पण, मानवतेचा मूलभूत धागा एकच आहे. विविधतेतून एकता, भिन्नतेतून समरसता आणि सर्वांच्या कल्याणाची भावना; हीच हिंदुत्वाची प्रगल्भ, सर्वसमावेशक जीवनदृष्टी आहे. विविध मार्गांतील समान सूत्रांचा शोध घेत, त्यांच्यातील भिन्नतेचा सन्मान करून सहअस्तित्वाचा मार्ग स्वीकारणे, हाच या विचाराचा गाभा. त्यामुळे परस्परविरोधाऐवजी संवाद, संघर्षाऐवजी सहकार्य आणि विभाजनाऐवजी एकात्मता यांचा संदेश या जागतिक संवादातून दिला जातो.

'परदेशातील भारतीयांनी आपल्या मातृभूमीशी सांस्कृतिक नाते जपत, ज्या देशात ते राहतात, त्या कर्मभूमीशी निष्ठावान राहावे आणि तेथील समाजाच्या प्रगतीत योगदान द्यावे,' हा संदेशही परदेश दौर्यांमधील संवादातला महत्त्वाचा भाग. हा संवाद केवळ भारतीय समाजापुरताच मर्यादित नाही. विविध देशांतील स्थानिक समाज, विचारवंत, शिक्षणतज्ज्ञ, उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते, युवा आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर यांच्याशीही संवाद साधला जात आहे. भारतीय संस्कृतीची ओळख करून देतानाच, इतर संस्कृतींकडे कमीपणाने पाहण्याची भूमिका नाही. उलट, विविधतेचा स्वीकार आणि परस्पर सन्मान हा भारतीय जीवनदृष्टीचा भाग आहे, हे अधोरेखित केले जाते. संघाच्या दृष्टीने जग हे संघर्षाचे मैदान नसून, सहकार्याचे क्षेत्र आहे, हा दृष्टिकोन ठसवला जात आहे.

संघाचा जागतिक संपर्कविस्तार म्हणजे, भारतीय विचार जगावर लादणे नव्हे; तर भारतीय संस्कृतीतील सहअस्तित्व, कुटुंबमूल्ये, सेवा, सामाजिक समरसता आणि पर्यावरणसंवर्धन यांसारखी मूल्ये जागतिक चर्चेचा भाग बनवणे होय. 'वसुधैव कुटुम्बकम्' आणि 'सर्वे भवन्तु सुखिनः' या भारतीय विचारांतून व्यक्त होणारी विश्वकल्याणाची भावनाही त्यामागे आहे.

भारताने 'विश्वगुरू' व्हावे, याचा अर्थ जगावर प्रभुत्व गाजवणे नव्हे; तर आपल्या ज्ञानाचा, अनुभवाचा आणि जीवनमूल्यांचा उपयोग संपूर्ण मानवतेच्या कल्याणासाठी करणे हाच आहे. स्थानिक पातळीवरील व्यक्तिनिर्माणातून सुरू झालेला प्रवास, जागतिक स्तरावर मानवतेला जोडणार्या संवादापर्यंत पोहोचवणे, हेच संघाच्या 'शताब्दी' प्रवासातील वैश्विक संपर्कविस्ताराचे महत्त्व आहे.

(लेखक राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचारप्रमुख आहेत.)

# अराजकतेचे ग्रहण

> **युरोप हा दीर्घकाळ लोकशाही, मानवी हक्क, कायद्याचे राज्य, आर्थिक समृद्धी आणि सामाजिक सुरक्षेचा आदर्श म्हणून जगासमोर उभा राहिला. दोन महायुद्धांच्या विध्वंसातून सावरत युरोपने विकासाचा नवा मार्ग स्वीकारला. मात्र, आज याच युरोपमध्ये राजकीय अस्थिरता, अराजकता मोठ्याप्रमाणात निर्माण होताना दिसत आहे. फ्रान्स, बेल्जियम, इटली, स्पेन आणि अल्बानिया देशांमधील विविध स्वरूपांचे संघर्ष या व्यापक अस्वस्थतेकडे लक्ष वेधतात. अर्थात, या सर्व देशांतील असंतोषाची कारणे आणि त्यांचे स्वरूप एकसारखे नाही. कुठे आर्थिक धोरणांविरोधात जनक्षोभ आहे, कुठे राजकीय नेतृत्वावरील अविश्वास वाढत आहे, तर कुठे स्थलांतर, राष्ट्रीय ओळख आणि सुरक्षेचे प्रश्न राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहेत.**



**लक्ष्यवेध**
**ओंकार मुळ्ये**

वेगवेगळ्या देशांत वारंवार दिसणारी अस्वस्थता एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित करते की, युरोपच्या लोकशाही व्यवस्थेला आतून अस्थिर करणारे घटक कोणते आणि या असंतोषाचे रूपांतर अराजकतेत होण्यामागे कोणत्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय प्रक्रिया कार्यरत आहेत?

अल्बानियाची राजधानी तिराना येथे झालेल्या हिंसक आंदोलनाच्या वृत्तामुळे हा प्रश्न अधिक गंभीर बनतो. सरकारविरोधी निदर्शनांमध्ये सार्वजनिक मालमत्तेची तोडफोड, पोलिसांवरील हल्ले आणि घटनात्मक संस्थांना लक्ष्य केल्याचे वृत्त समोर आले. न्यायव्यवस्थेच्या इमारतीला आग लावण्यासारखी घटना ही केवळ कायदा-सुव्यवस्थेची समस्या नाही. ती राजकीय संघर्षाने घटनात्मक व्यवस्थेच्या मर्यादा ओलांडल्यास लोकशाही संस्थांसमोर कोणते संकट उभे राहू शकते, याची जाणीव करून देते. सुरुवातीला विद्यापीठांमधील वाढते शुल्क, शिक्षणाच्या अपुर्या सुविधा, विद्यार्थ्यांचे भवितव्य आणि भ्रष्टाचाराच्या आरोपांविरोधात व्यक्त झालेला असंतोष पुढे पंतप्रधान एडी रामा यांच्या राजीनाम्याच्या मागणीपर्यंत पोहोचला. वादग्रस्त आलिशान रिसॉर्ट प्रकल्प, सरकारी निर्णयांमधील पारदर्शकतेचा अभाव आणि सत्ताधार्यांवरील अविश्वास यांमुळे आंदोलनाला व्यापक राजकीय स्वरूप प्राप्त झाले. जॅरेड कुशनर यांच्याशी संबंधित प्रस्तावित रिसॉर्ट प्रकल्पही या वादाच्या केंद्रस्थानी आहे. या आंदोलनातील सर्वाधिक चिंताजनक बाब म्हणजे निषेधाच्या मार्गाने सुरू झालेल्या संघर्षाचे हिंसक स्वरूपात झालेले रूपांतर.

लोकशाहीमध्ये सरकारविरोधात आंदोलन करणे हा नागरिकांचा मूलभूत अधिकार आहे. परंतु, आंदोलनाच्या नावाखाली न्यायव्यवस्था, सार्वजनिक संस्था, पोलिस आणि सर्वसामान्य नागरिकांच्या मालमत्तेला लक्ष्य केले गेले, तर संघर्षाचे स्वरूप बदलते. अशा वेळी आंदोलनाचा मूळ हेतू मागे पडतो आणि हिंसा हीच चर्चेच्या केंद्रस्थानी येते. अल्बानियाच्या बाबतीत आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे युरोपीय महासंघाचे सदस्यत्व मिळवण्याची महत्त्वाकांक्षा. युरोपीय महासंघात सहभागी होण्यासाठी केवळ आर्थिक निकष पूर्ण करणे पुरेसे नसते. कायद्याचे राज्य, स्वतंत्र न्यायव्यवस्था, भ्रष्टाचारविरोधी उपाययोजना, लोकशाही संस्थांची स्थिरता आणि मूलभूत अधिकारांचे संरक्षण यांनाही महत्त्व असते. त्यामुळे देशातील राजकीय अस्थिरता आणि संस्थांवरील हल्ले हे अल्बानियाच्या युरोपीय एकात्मतेच्या प्रयत्नांसाठी प्रतिकूल ठरू शकतात.

युरोपमधील वाढत्या असंतोषाच्या चर्चेत अवैध स्थलांतराचा मुद्दा दुर्लक्षित करता येणार नाही. गेल्या काही वर्षांत आशिया, आफ्रिका आणि मध्यपूर्वेतील संघर्ष, आर्थिक अस्थिरता, राजकीय छळ, रोजगाराच्या मर्यादित संधी आणि सुरक्षित भविष्याच्या शोधात अनेक लोकांनी युरोपकडे धाव घेतली. या पार्श्वभूमीवर सीमा सुरक्षा, आश्रय मागणार्यांचे व्यवस्थापन, बेकायदेशीर प्रवेशावर नियंत्रण आणि स्थलांतरितांचे सामाजिक एकात्मीकरण हे युरोपीय देशांसमोरील महत्त्वाचे प्रश्न बनले आहेत.

लोकशाहीमध्ये सरकारविरोधी आंदोलन हे व्यवस्थेचे अपयश असल्याचे नेहमीच लक्षण नसते. उलट, नागरिकांना सरकारच्या निर्णयांविरोधात आवाज उठवण्याची मुभा असणे ही लोकशाहीची ताकद असते. समस्या तेव्हा निर्माण होते, जेव्हा आंदोलनातील हिंसक घटक कायद्याची अंमलबजावणी करणार्या यंत्रणांवर हल्ले करतात, न्यायव्यवस्थेला लक्ष्य करतात किंवा सार्वजनिक जीवन विस्कळीत करण्याचा प्रयत्न करतात. युरोपसमोरील प्रश्न केवळ स्थलांतर रोखण्याचा किंवा आंदोलने दडपण्याचा नाही; तर नागरिकांच्या असंतोषाची कारणे दूर करून लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास पुन्हा निर्माण करण्याचा आहे. अन्यथा, आर्थिक असुरक्षितता, सामाजिक ध्रुवीकरण आणि राजकीय अविश्वास यांची एकत्रित तीव्रता युरोपच्या एकात्मतेला आणि लोकशाही मूल्यांना दीर्घकालीन आव्हान निर्माण करू शकते.

.................................

फ्रान्समध्ये पुन्हा एकदा आंदोलनाचा वणवा पेटला आहे. फ्रान्समधील उपनगरीय भागातील शाळांची दुरवस्था, शिक्षकांची अपुरी संख्या आणि अभ्यासाचे वाढलेले ओझे यांचे निमित्त करून, तेथील विद्यार्थी रस्त्यावर उतरले. लवकरच त्यात कामगार संघटनाही सहभागी झाल्या. शिक्षणाचा मुद्दा मागे पडून दैनंदिन जीवनात वाढती महागाई, बेरोजगारी आणि भविष्यातील अशाश्वतता यांनी त्याची जागा घेतली. फ्रान्समध्ये रस्त्यावरील आंदोलनांची आणि त्यांना हिंसक वळण लागण्याची परंपरा असली, तरी यावेळच्या आंदोलनात अतिडाव्या साम्यवादी आणि इस्लामवादी शक्तींनी हातमिळवणी केलेली दिसते. देशभरात सुमारे साडेआठ लाख लोक रस्त्यावर उतरले असून, राजधानी पॅरिसमध्ये दीड लाख लोक आंदोलन करत आहेत. ठिकठिकाणी दुकाने फोडण्यात आणि लुटण्यात येत आहेत. शाळांना, तसेच सरकारी कार्यालयांनाही आगी लावण्यात येत आहेत. रस्त्यावर गाड्या फोडण्यात, तसेच जाळण्यात येत आहेत.

लिमोज शहरात १४३ वर्षांपूर्वी बांधण्यात आलेली नगर मंदिराची ऐतिहासिक इमारत जाळण्यात आली, तर लिऑन येथे पर्यटन विभागाचे कार्यालय जाळण्यात आले. या आंदोलनाचे लोण शेजारी देशांमध्येही पोहोचले असून, इटलीमधील मिलान येथेही जाळपोळ करण्यात आली. अशाच प्रकारची आंदोलने युरोपमधील अल्बानिया, तसेच दक्षिण अमेरिकेतील अर्जेंटिनासारख्या देशांतही करण्यात येत असून, भारतातील 'जेन-झी' आंदोलन आणि या आंदोलनांत अनेक साम्यस्थळे दिसतात. छात्रशक्तीला पुढे करून हिंसाचार माजवायचा आणि अराजकसदृश परिस्थिती निर्माण करायची आणि मग क्रांती होत असल्याचे भासवून व्यवस्था उलथवून टाकायची. अशा चळवळींना जॉर्ज सोरोस, कतार आणि चीनमधील 'नेविल राय सिंघम' यांसारख्या व्यक्ती आणि संस्थांचा पाठिंबा आहे.

(पान ४ वर)

# जळते कोण आणि उजळते कोण?

**अराजकतावादी तत्त्वे सध्या देशातील तरुणाईला आंदोलनातून भडकवण्याचा प्रयत्न करत आहेत. अनेक राजकीय पक्ष तरुणांच्या भावनांचा गैरफायदा घेत आहेत. याबाबी तरुणांनी ध्यानात घ्यायला हवा. आंदोलनामागील गणिते, त्यातील धोके, त्याचे देशावर होणारे परिणाम, व्यक्तिगत आयुष्यातील होणारे नुकसान या मुद्द्यांच्या आधारे या आंदोलनांचा आढावा घेणारा हा लेख...**

राष्ट्रक्षा

हेमंत महाजन (नि.)ब्रि.



तरुणाई ही कोणत्याही देशाची सर्वांत मोठी शक्ती. मात्र, तिच्या शक्तीचा उपयोग विधायक परिवर्तनासाठी करायचा की, राजकीय स्वार्थाच्या नावाखालील हिंसक आंदोलनांसाठी करायचा, हे तरुणांनी स्वतः ठरविण्याची वेळ आली आहे. आंदोलन आणि हिंसाचारात स्पष्ट फरक आहे. हिंसाचार लोकशाही संस्थांवरील विश्वास कमी करून सामान्यांच्या जीवनात असुरक्षितता निर्माण करण्याचे काम करतो. देशाच्या विविध भागांत होत असलेल्या हिंसक आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर तरुणांनी स्वतःला एक मूलभूत प्रश्न विचारला पाहिजे की, आपण ज्या मागणीसाठी रस्त्यावर उतरत आहोत, त्यासाठी आपले भविष्य पणाला लावणे खरोखरच आवश्यक आहे का?

**तरुणांच्या भावनांचा गैरवापर:** आज अनेक तरुणांसमोर शिक्षण पूर्ण करून रोजगार मिळविणे, कुटुंबाला आर्थिक आधार देणे आणि स्वतःचे स्थिर भविष्य घडवण्यासारखी मोठी आव्हाने आहेत. शिक्षणाचा खर्च वाढत आहे, नोकर्यांसाठीची स्पर्धा तीव्र होत आहे आणि अनेक क्षेत्रांत रोजगाराचे स्वरूपही बदलताना दिसते आहे.

अपेक्षित नोकरी न मिळाल्याने, तरुणांमध्ये अस्वस्थता आणि निराशा निर्माण होणे स्वाभाविकच. या अस्वस्थतेकडे शासनाने आणि समाजाने गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. रोजगारनिर्मिती, कौशल्य विकास, उद्योगांना प्रोत्साहन आणि शिक्षण व रोजगारातील दरी कमी करणे आवश्यकच. मात्र, तरुणांच्या समस्यांना सोडवण्याऐवजी त्यांच्या भावनांचा गैरफायदा घेतला जात असेल, तर त्याबाबत सावध राहणेही आवश्यक आहे. जातीय अस्मिता, धार्मिक भावना, भाषिक अभिमानाला भावनिक आवाहनांची जोड देऊन तरुणांना रस्त्यावर उतरवले जाते. काहीवेळा प्रश्नाचे स्वरूप बाजूला पडते आणि नेत्यांचे शक्तिप्रदर्शनच आंदोलनाचे मुख्य उद्दिष्ट होते. त्यामुळेच तरुणांनी आंदोलनामागचा उद्देश, नेतृत्वाची विश्वासार्हता, मागण्यांची व्यवहार्यता आणि आंदोलनाचे संभाव्य परिणाम तपासले पाहिजेत. नेत्यांच्या भाषणांतील आश्वासने आणि प्रत्यक्षात पदरात पडणार्या परिणामांची तुलना करणेही आज आवश्यक झाले आहे.

**आंदोलन करणारे रस्त्यावर; निर्णय घेणारे सुरक्षित ठिकाणी!** हिंसक आंदोलनांची मोठी शोकांतिका म्हणजे, त्याची किंमत सामान्य तरुणांनाच मोजावी लागते. आंदोलनाला चिथावणी देणारे किंवा त्याचे नेतृत्व करणारे लोक सुरक्षित ठिकाणी राहतात; परंतु तरुणांना पोलिसी कारवाई, अटक, न्यायालयीन खटले आणि आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागते. एखाद्या आंदोलनात दगडफेक, जाळपोळ, सार्वजनिक मालमत्तेची तोडफोड किंवा पोलिसांशी हिंसक संघर्ष झाल्यास, संबंधित व्यक्तींना तपास, न्यायालयीन प्रक्रिया, वकिलांचा खर्च यांसारख्या समस्यांचा सामना करावा लागतो. काही प्रकरणांत शिक्षण, रोजगार आणि सामाजिक प्रतिष्ठेवरही याचा प्रतिकूल परिणाम होऊ शकतो. एखाद्या सामान्य कुटुंबातील तरुणावर संपूर्ण कुटुंब अवलंबून असेल, तर ही परिस्थिती अधिकच गंभीर होते. घरखर्च, पालकांची जबाबदारी, भावंडांचे शिक्षण आणि स्वतःच्या भविष्यासाठीच्या गुंतवणुकीवर संकट येऊ शकते. याउलट, आर्थिकदृष्ट्या सक्षम कुटुंबातील तरुणांना दीर्घ न्यायालयीन लढाईसाठी, तुलनेने अधिक साधने उपलब्ध होतात. त्यामुळे हिंसक आंदोलनांचे परिणाम सर्वांसाठी समान असतात, असे नाही. म्हणूनच, तरुणांनी कोणत्याही आंदोलनात सहभागी होण्यापूर्वी स्वतःला काही प्रश्न विचारणे क्रमप्राप्त. यात माझ्या अटकेची किंवा खटल्याची जबाबदारी कोण घेणार? माझे शिक्षण किंवा रोजगार धोक्यात आल्यास, माझ्या कुटुंबाच्या पाठीशी कोण उभे राहणार? आंदोलन करणारे लोक माझ्या अडचणीच्या वेळी मदत करणार का? या प्रश्नांची उत्तरे तरुणांनी भावनेच्या भरात नव्हे; तर शांतपणे शोधली पाहिजेत.

**गुन्हेगारी नोंदी, रोजगार आणि आयुष्यभराची किंमत -** आजच्या रोजगार विश्वात शैक्षणिक पात्रता आणि कौशल्यांबरोबरच विश्वासार्हता, व्यावसायिक वर्तन आणि संबंधित पदासाठीची आवश्यक पार्श्वभूमीही महत्त्वाची असते. प्रत्येकाचे समाजमाध्यम खाते तपासले जाते. यातून गुन्हेगारी पार्श्वभूमीची तपासणी केली जाते. अशा वेळी खटले प्रलंबित असल्यास अथवा अटक दिसत असल्यास नोकरी मिळत नाही. येथे एक महत्त्वाचा फरक लक्षात घेतला पाहिजे, तो म्हणजे केवळ गुन्हा दाखल झाल्याने संबंधित व्यक्ती दोषी ठरत नाही. तरीही, हिंसक घटनेतील सहभागासाठीच्या चौकशीमुळे ताण, वेळेचा अपव्यय आणि आर्थिक अडचणी उद्भवू शकतात. त्यामुळे आंदोलनात सहभागी होताना, त्याचे संभाव्य परिणाम स्वीकारण्याची तयारी असणेही आवश्यक आहे. (पान ६ वर)

# बालहक्क आणि आरोग्य व्यवस्था

पोरकी पोरं

डॉ. तुषार सावरकर



**मुलाचा जन्म होताना त्याच्या हातात जात, धर्म, संपत्ती किंवा सामाजिक प्रतिष्ठेचे प्रमाणपत्र नसते. जन्माच्या क्षणी प्रत्येक मूल समान असते; पण जन्मानंतर त्याला मिळणारे आरोग्य, पोषण, उपचार आणि जगण्याच्या संधी मात्र अनेकदा समान राहत नाहीत. एखादे मूल अत्याधुनिक रुग्णालयाच्या उपचार व्यवस्थेत जन्म घेते तर दुसर्‍या मुलाला प्राथमिक आरोग्य केंद्रापर्यंत पोहोचण्यासाठीही अनेक किलोमीटरचा प्रवास करावा लागतो. कुणाला आजाराचे तातडीने उपचार मिळतात, तर कुणाच्या कुटुंबाला उपचाराचा खर्च भेडसावतो. कुठे मुलाच्या आजाराकडे लक्ष दिले जाते, तर मुलगी असल्यामुळे तिच्या आरोग्याच्या गरजांकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता अजूनही नाकारता येत नाही. म्हणूनच बालहक्क आणि आरोग्य व्यवस्था यांचा विचार करताना प्रश्न केवळ 'किती मुले वाचली?' एवढाच नसून 'कोणत्या मुलाला जगण्याची आणि निरोगी वाढण्याची समान संधी मिळाली?' हा असला पाहिजे.**

गेल्या तीन दशकांत भारताने बाल आरोग्याच्या क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे. १९९० ते २०२३ या काळात भारतातील पाच वर्षांखालील बालमृत्यू दरात ७८ टक्क्यांची घट झाली. जागतिक पातळीवरील पाच वर्षांखालील बालमृत्यूंमध्ये भारताचा वाटाही १९९० मधील २७ टक्क्यांवरून २०२३ मध्ये १३.५ टक्क्यांपर्यंत कमी झाला. नवजात बालमृत्यूमध्येही लक्षणीय घट झाली आहे. मातृ-बाल आरोग्य कार्यक्रम, संस्थात्मक प्रसूती, लसीकरण, प्राथमिक आरोग्यसेवेचा विस्तार आणि नवजात बालकांसाठीच्या विशेष उपचार व्यवस्थेमुळे ही प्रगती शक्य झाली. या यशाकडे दुर्लक्ष करता येणार नाही. परंतु राष्ट्रीय सरासरी सुधारली म्हणून प्रत्येक मुलाचे वास्तव सुधारले आहे, असे मानणेही तितकेच चुकीचे ठरेल. कारण आरोग्यसेवेतील विषमता अनेकदा सरासरी आकड्यांच्या मागे लपलेली असते. शहरातील सुसज्ज रुग्णालय आणि दुर्गम आदिवासी भागातील आरोग्य केंद्र यांच्यातील अंतर केवळ भौगोलिक नसते; ते आरोग्याच्या संधीतील अंतर असते. आर्थिकदृष्ट्या सक्षम कुटुंबाला खासगी रुग्णालय, तज्ज्ञ डॉक्टर, तपासण्या आणि औषधे सहज उपलब्ध होऊ शकतात.

गरीब कुटुंबातील मुलाच्या बाबतीत मात्र रुग्णालयापर्यंत पोहोचण्याचा खर्च, कामाचा दिवस गमावणे, औषधांचा खर्च आणि दीर्घकालीन उपचारांची आर्थिक जबाबदारी हे सारे प्रश्न एकत्र उभे राहतात. अशा वेळी आरोग्याचा अधिकार कागदावर समान असला तरी त्याचा प्रत्यक्ष अनुभव समान राहत नाही. याच कारणामुळे बालहक्कांचा विचार केवळ रुग्णालयाच्या चार भिंतींत करता येणार नाही. मुलाचे आरोग्य हे त्याच्या कुटुंबाच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीशी जोडलेले असते. पोषण, सुरक्षित पाणी, स्वच्छता, निवास, मातृआरोग्य, शिक्षण आणि रोजगार या सर्वांचा बालआरोग्यावर परिणाम होतो. कुपोषित मूल हे केवळ कमी अन्न मिळालेल्या मुलाचे चित्र नसते; अनेकदा ते गरिबी, अपुरे पोषण, मातृ आरोग्याची समस्या, स्वच्छतेचा अभाव आणि आरोग्यसेवेपर्यंत मर्यादित पोहोच यांचे एकत्रित परिणाम दाखवत असते.

भारतातील पोषणाच्या स्थितीत काही सुधारणा झाल्या आहेत. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाच्या सहाव्या फेरीत पाच वर्षांखालील मुलांमधील वयानुसार कमी उंचीचे प्रमाण ३५.५ टक्क्यांवरून २९.३ टक्क्यांपर्यंत कमी झाले आहे. ही सुधारणा निश्चितच स्वागतार्ह आहे. परंतु जवळपास तीनपैकी एका मुलाची वाढ वयाच्या मानाने कमी असणे ही अजूनही गंभीर बाब आहे. कुपोषणाकडे केवळ अन्नपुरवठ्याचा प्रश्न म्हणून पाहण्याऐवजी त्यामागील सामाजिक आणि आर्थिक कारणांकडे पाहण्याची गरज आहे. महाराष्ट्रातील बालमृत्यूची आकडेवारीही या प्रश्नाचे गांभीर्य अधोरेखित करते. राज्य सरकारने २०२६ मध्ये विधान परिषदेत दिलेल्या माहितीनुसार, मागील अडीच वर्षांत राज्यात पाच वर्षांखालील ३४, ३२५ बालकांचा मृत्यू झाला. या मृत्यूंच्या कारणांमध्ये मुदतपूर्व जन्म, कमी जन्मवजन, संसर्ग, न्यूमोनिया, जन्मावेळी श्वास घेता न येणे आणि इतर कारणांचा समावेश आहे. या संपूर्ण संख्येला केवळ कुपोषणामुळे झालेले मृत्यू म्हणणे योग्य ठरणार नाही. मात्र, बालमृत्यू रोखताना पोषण, प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा आणि वेळेवर उपचार यांना एकत्रितपणे पाहण्याची आवश्यकता या आकडेवारीतून स्पष्ट होते. आरोग्य व्यवस्थेतील प्रगतीचा आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे संस्थात्मक प्रसूती. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाच्या सहाव्या फेरीत संस्थात्मक प्रसूतीचे प्रमाण ९०.६ टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे. प्रसूती प्रशिक्षित आरोग्य कर्मचार्यांच्या उपस्थितीत होण्याचे प्रमाणही मोठे आहे. यामुळे माता आणि नवजात बालकांच्या सुरक्षिततेत महत्त्वाची सुधारणा झाली आहे. परंतु रुग्णालयात प्रसूती झाली म्हणजे आरोग्यहक्क पूर्ण झाला, असे मानता येणार नाही. प्रसूतीच्या वेळी प्रशिक्षित कर्मचारी, आवश्यक औषधे, नवजात बालकांसाठी तातडीची उपचार व्यवस्था आणि प्रसूतीनंतरची काळजी उपलब्ध आहे का, हा अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे. स्तनपानाच्या बाबतीतही अशीच मिश्र परिस्थिती दिसते. जन्मानंतर पहिल्या एका तासात स्तनपान सुरू करणार्‍या बालकांचे प्रमाण ४१.८ टक्क्यांवरून ५०.१ टक्क्यांपर्यंत वाढले आहे. सहा महिन्यांखालील बालकांमध्ये स्तनपान सुरू असण्याचे प्रमाण ९५.६ टक्के असले तरी पहिल्या सहा महिन्यांत केवळ स्तनपान मिळणार्या बालकांचे प्रमाण ५५.८ टक्के आहे. म्हणजेच आरोग्य व्यवस्थेने केवळ प्रसूती सुरक्षित करण्यावर थांबून न राहता आईला योग्य माहिती, आधार आणि प्रसूतीनंतरची आवश्यक मदत देणेही तितकेच गरजेचे आहे.

बालआरोग्याचा आणखी एक दुर्लक्षित पैलू म्हणजे लिंगभेद. मुलगा आणि मुलगी दोघांनाही आजार होतो, दोघांनाही उपचारांची गरज असते आणि दोघांचेही जीवन समान मौल्यवान असते. तरीही सामाजिक मानसिकतेचा परिणाम आरोग्यसेवेच्या वापरावर होऊ शकतो. काही कुटुंबांमध्ये मुलाच्या उपचाराला प्राधान्य देण्याची प्रवृत्ती, मुलीच्या आरोग्याच्या तक्रारींकडे दुर्लक्ष किंवा तिच्या पोषणाकडे कमी लक्ष देणे यामुळे मुलीच्या आरोग्यावर दीर्घकालीन परिणाम होऊ शकतो. युनिसेफच्या माहितीनुसार भारतात मुलींच्या बालमृत्यूचे प्रमाण मुलांपेक्षा अजूनही चिंतेचा विषय आहे. त्यामुळे आरोग्य सेवा मसर्वांसाठीफ उपलब्ध आहे एवढे सांगणे पुरेसे नाही; ती प्रत्यक्षात मुलगा-मुलगी असा कोणताही भेद न करता मिळते का, हे तपासावे लागेल. लिंगभेदाचा संबंध बालविवाहाशीही जोडलेला आहे. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाच्या सहाव्या फेरीत २० ते २४ वर्षे वयोगटातील २०.१ टक्के महिलांचे लग्न वयाच्या १८ वर्षांपूर्वी झाल्याचे आढळले. मागील सर्वेक्षणाच्या तुलनेत ही घट असली तरी प्रमाण अजूनही गंभीर आहे. बालविवाहामुळे मुलीचे शिक्षण, पोषण, मानसिक आरोग्य आणि भविष्यातील आर्थिक स्वावलंबन बाधित होऊ शकते. अल्पवयीन मातृत्वामुळे गर्भधारणा आणि प्रसूतीशी संबंधित जोखीम वाढू शकतात आणि नवजात बालकाच्या आरोग्यावरही परिणाम होऊ शकतो. त्यामुळे बालविवाह रोखणे हे केवळ सामाजिक सुधारण्याचे काम नसून बाल आरोग्याचेही महत्त्वाचे धोरण आहे.

लसीकरणाच्या क्षेत्रात भारताने उल्लेखनीय प्रगती केली आहे. नियमित पूर्ण लसीकरणाचे प्रमाणही उच्च पातळीवर पोहोचले आहे. तरीही शेवटच्या टप्प्यातील मुलांपर्यंत पोहोचणे हे मोठे आव्हान आहे. दुर्गम आदिवासी वस्त्या, स्थलांतरित कुटुंबे, शहरी झोपडपट्ट्या आणि आरोग्यसेवेपासून दूर असलेल्या समुदायांतील मुलांना वेळेवर लस मिळते का, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. लसीकरणाची राष्ट्रीय सरासरी चांगली असली तरी एखादे मूल लसीपासून वंचित राहिले तर त्या एका मुलासाठी आकडेवारीतील राष्ट्रीय यश निरर्थक ठरते. न्यूमोनिया, अतिसार आणि मलेरियासारखे आजार आजही बाल आरोग्यासाठी महत्त्वाचे आव्हान आहेत. यातील अनेक आजारांचे प्रतिबंध आणि उपचार शक्य आहेत. त्यामुळे मुलाचा मृत्यू केवळ ङ्गआजारामुळे झालाफ असे म्हणून प्रश्न संपवणे योग्य नाही. आजार वेळेवर ओळखला गेला का ? पालकांना योग्य माहिती होती का? जवळच्या आरोग्य केंद्रात आवश्यक उपचार मिळाले का? गंभीर स्थितीत मुलाला पुढील उपचारांसाठी वेळेत हलवता आले का? या प्रश्नांची उत्तरेही बालहक्कांच्या चौकटीत शोधावी लागतील. विशेषतः आदिवासी आणि दुर्गम भागातील बालकांसाठी आरोग्य सेवेचा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा आहे. (पान ६ वर)

# सत्य

कथा

उज्ज्वल कुळकर्णी

कुलरच्या गारेगार हवेमध्ये मला खरंच गाढ झोप लागली होती आणि तशातच बेल वाजली. सुरुवातीला जाणीवपूर्वक दुर्लक्ष केलं. पुन्हा बेल वाजली तेव्हा मात्र मला उठणे भागच होते. मी घाईने कंगवा केसांवर फिरवला, शर्टची बटनं लावत जिना उतरलो. चेहरा शक्यतो शांत ठेवत मी बाकावर बसलेल्या व्यक्तीकडे पाहिले.

नमस्कार...सर..

हं... मी अजून थोडा सुस्तीतच होतो. त्याचे दोन्ही हात अजूनही जुळलेले होते.

बस, बस.. माझा स्वर त्याला जाणवला असावा. तो हळूच बसला.

केव्हा आलास?

सकाळीच

सहजच?

अं...हो पण खरं म्हणजे- अरेऽऽ बरं आठवलं. मध्यंतरी आकाशवाणीवर तुझी मुलाखत ऐकली. छान होती. माझ्या या वाक्याने मात्र तो एकदमच फुलारला. हसत हसत त्याने हात जोडले.

तुमची कृपा-फ छे... छे...

तुम्ही जळगावला आलाच नाहीत सर- बरेच दिवसात, खरं ना?

नाही आलो- माझ्या तुटक उत्तराने तो परत वरमला. वास्तविक त्याला ती अपेक्षाच नव्हती, हे त्याच्या चेहर्‍यावरून स्पष्ट दिसत होतं. मी नेहमीसारखं भरभरून भडाभडा बोलावं ही त्याची अपेक्षा होती. मधला थोडा वेळ शांततेत गेला आणि शेवटी मी काहीतरी विचारावं म्हणून विचारलं-

काय म्हणतोय धंदा? माझ्या एवढ्याशा प्रश्नाने त्याला एकदम उभारी आली. ताठ बसून तो बोलायला लागला.

धंदा छान चाललाय. बँकेचे सारं कर्ज फिटलंय. नवीन रसवंतीगृह सुरू केलंय. धडाक्यात चाललंय. ऊस पुरत नाही. गिर्‍हाईक जाम खुश आहेत. मेहनत मात्र फार पुरतेय. म्हणूनच तू इतका रोडावलास-

हो ना सर, खूप दूर दूर ठिकाणाहून लोक रस प्यायला येतात माझ्या रसवंतीगृहावर! तो थांबायलाच तयार नव्हता. थोडा पुढे झुकून त्याने परत बोलायला सुरुवात केली- पानपट्टीचे दुकान पण छान चाललं आहे सर. मला मात्र दोन्ही ठिकाणी लक्ष द्यावं लागतं. फार ओढाताण होते. रसवंतीचा उद्घाटनाच्या वेळी तुमची फार आठवण आली. वाटही खूप तुम्ही याल असं वाटलं होतं-

खरं आहे तुझं, पण माझ्याकडे नेमके पाहुणे आले. तुझे आमंत्रण मात्र वेळेवर मिळाले होतं. आता तू खरा धंदेवाला झाला आहेस. छान- आगे बढो तो मनापासून हसला. त्याने माझा अंदाज घेतला आणि हळूच बोलायला सुरुवात केली.

आज मात्र एका वेगळ्याच कामासाठी आलो आहे सर. माझी बॅग, शबनम, पैशाचे पाकीट सारं सारं प्रवासामध्ये चोरीला गेले. परत जळगावला जायला मला पैशांची आवश्यकता आहे; निदान तीन-चारशे रुपये हवेत बघा. दोन जण आहोत आम्ही काही क्षण शांततेत गेले. मला एकदम आठवलं आणि मी त्याला विचारलं-

अरे, तुझे नातेवाईक आहेत ना इथं?

हो... पण ते सगळे लग्नासाठी परगावी गेले आहेत. घराला कुलूप आहे. शेजार्‍यांनी माहिती दिली. मी पुन्हा गप्प. वास्तविक याची आणि आपली तोंडओळख जुजबी माहिती प्रेमाने बोलावं म्हणून आपण जवळकीने वागलो, पण याच्याशी पैशाचा व्यवहार करायचा म्हणजे- तो घाईघाईने परत बोलायला लागला.

मी जळगावला पोहोचल्यावर लगेच पैसे पाठवीन. मला फार संकोच होतोय, पण नाईलाज आहे सर.

कसंही करा, पण एवढी वेळ भागवा माझी. मी तुमच्याशी लबाडी करणार नाही. खात्री बाळगा सर-मी ४०० रुपये त्यांच्या हातावर ठेवले. त्याने लगेच वाकून नमस्कार केला आणि मलगेच पाठवतोफ असे म्हणून तो उठलाही. त्याचे लगेच उठणे मला खटकले.

पाहता- पाहता आठवडा उलटला. पैसे काही आले नाही. मी थोडा स्वतःवरच



मनातून चिडलो. जुजबी ओळख, त्याच्या धडपड्या स्वभावाचे कौतुक, इथपर्यंत ठीक. म्हणून का पैसे देऊन मोकळं व्हायचं- गरीब मेहनती म्हणून पैसे दिले तर परत करायचं नाव नाही- माझा वैताग मलाच त्रासदायक व्हायला लागला. माझा त्रासिक चेहरा पाहून बायकोने विचारले-

काय हो, काय झाले?

अगं...तो जळगावचा पोरगा- मागे नाही का सांगितले तुला- गरीब आहे, धडपड्या आहे, बोलायला छान आहे....

बरं मग?

अगं, त्यानं पैसे नेले हेही तुला सांगितलं होतं.

बरं मग?

बरं मग, बरं मग काय? अगं पैसे पाठवायचं नाव नाही ना अजून-

किती दिवस झाले?

आठवडा उलटून गेला

अहो, आठवडा कामात केव्हा निघून जातो कळतच नाही. पाठविल हो तो पैसे. काही अडचण आली असेल त्याला- माझ्या पैशांच्या व्यवहाराबद्दल तिचा हा दृष्टिकोन मलाही सुखद धक्का देणारा होता, पण तिच्या बोलण्याने एक वेगळाच उत्साह माझ्या अंगात शिरला. कसली अडचण, कसलं काय? स्वभावाचा फायदा घेऊन फसवून मोकळे होतात. पण मी त्याला असा सोडणार नाही.

अहो, थोडे दिवस थांबा अजून आणि मग काय हो पण ते सगळे लग्नासाठी परगावी गेले करायचं ते ठरवा. पाठवील बिचारा...

हं! बिचारा म्हणे. दोन दिवसांनी उत्साहात त्याच्या नातेवाईकाचं घर मोठ्या कष्टानं शोधलं. मला समोर पाहून त्याच्या नातेवाईकाने नमस्कार केला. पण का कुणास ठाऊक त्याचा चेहरा मात्र फारच गंभीर दिसला. तरीही मी थोडीशीही उसंत न खाता माझा परिचय करून देत त्याला पैसे दिले हे फार मोठे पाप केल्यापासून तुम्ही गरीब गरीब म्हणवणारे गरीब चेहर्‍याचे लोक असेच असतात वगैरे वगैरे ताडताड बोलू लागलो. मनातला संताप मी त्याच्या त्या नातेवाईकावर अगदी मनापासूनच काढला. समोर मतोफ असल्यासारखा.

मी थांबलो. मान वर करून त्याच्या नातेवाईकाकडे लक्ष जाताच मी दचकलो... तो ओक्साबोक्सी रडत होता.

त्याने हात लांब करून कोनाड्यातले पत्र माझ्या हातात दिले. (पान ६ वर)

वळणावरच्या नोंदी

स्वाती काळे

# दिल्लीत शिरताना...

इब्नबतूता (इ. स. १३२५ ते इ. स. १३५४) सिंधू नदी पार करीत असताना त्याला जनानी नंतर सेहवान हे मोठे गाव लागले. तो म्हणतो, गावाचे वेशीवर वाळूचे रखरखीत वाळवंट आहे. येथे फक्त उत्तम दर्जाचा टरबूज मिळतो. मासे, दूध आणि ममुशुंकफ नावाचे कडधान्य आणि सरड्यासारखे प्राणी खाऊन येथील लोक गुजराण करतात. पुढे त्याला मभकारफ नावाचे एक सुंदर गाव लागते. सिंधू नदीतून काढलेल्या कालव्यामुळे हे गाव समृद्ध आहे. सर्व प्रवाशांना येथे अन्नदान केले जाते. याच दरम्यान त्याला शरीफ जलालुद्दीन राजा भेटतो आणि त्यांचे संबंध दृढ होतात. नंतर ते राजधानी दिल्लीतही भेटतात. त्याच्यामुळे ईब्न बतूताला एका छोट्या गावाचे उत्पन्न मिळते. मुलतानला गेल्यानंतर मुलतानचा राज्यपाल कुत्ब- अल्-मुल्क त्याचे स्वागत करतो.

मध्ययुगात मुलतानहून दिल्लीला पोहोचायला ४० दिवस लागायचे, पण त्याला तोशीस अशी नव्हती. कारण त्याच्या जेवणाखाण्याची सर्व सोय केली गेली होती. जवळपास २० खानसामे त्याच्या लवाजम्यात होते. जेवणात सुरुवातीला ते जर्दाका हे भारतातील सर्वोत्तम फळ आहे. खोडाला जमिनीलगत लागणाऱ्या फळाला मबरकीफ म्हणतात आणि वरती लागलेल्या मशाकीपेक्षा ते फारच चवदार असते. भोपळ्याच्या आकाराचे असणारे हे फळ पिकल्यावर कापले की शंभर-दीडशे बिया दिसतात.

मध्ययुगीन भारतातील धान्याचे वर्णनही त्याने अचूकपणे केले आहे. तो म्हणतो, भारतातील लोक वर्षातून दोनदा पेरणी करतात. पेरणी करून ६० दिवसानंतर त्याची कापणी केली जाते. शरद ऋतूतील धान्यांमध्ये कुथ्थ्रु हे भरड धान्य अतिशय लोकप्रिय आहे. कदाचित हा भरड बाजरीचा प्रकार असावा. काल, अणळी, शामख ही धान्ये तेव्हा लोकप्रिय होती. पण आज आपण त्यांना ओळखू शकत नाही. संन्यासी आणि गोरगरीब या धान्याला प्राधान्य देतात. धान्य गोळा करण्याची पद्धत त्याकाळी आगळीवेगळी होती. प्रत्येक जण डाव्या हातात मोठी टोपली आणि उजव्या हातात एक चाबूक घेऊन बाहेर पडायचा. त्या चाबकाने धान्याच्या कणसांना झोडपून टोपलीत दाणे टाकले जातात. अशाप्रकारे वर्षभर पुरेल असे धान्य प्रत्येकाकडे साठवले जाते. शामाक या धान्याचे बी अत्यंत लहान असते. गोळा केल्यानंतर उन्हात वाळवून नंतर ते लाकडी उखळात कुटले जाते. त्याचे टरफल वेगळे झाल्यावर म्हशीच्या दुधात आतील पांढऱ्या गराची पेज तयार होते. माश नावाचं धान्य वाटाण्यासारखे आहे. थोडासा लांबट आणि हिरवा मुंज हा माशचा प्रकार तांदळाबरोबर शिजवतात आणि खमंग तुपासोबत खातात. या पदार्थाला ते खिश्री असं म्हणतात. हा भारतीयांच्या रोजच्या नाश्त्याचा पदार्थ आहे. बतूता बहुधा खिचडीबद्दल बोलत असावा. लुबिया नावाचे एक कडधान्य प्रसिद्ध आहे तसेच मूट नावाचे धान्य आहे, जे चाऱ्यासाठी वापरले जाते. जनावरांना सुरुवातीला १० दिवस तूप खाऊ घातले जाते आणि त्यानंतर पाला दिला जातो.

भाताचे पीक वर्षातून तीनदा काढले जाते. ज्या जमिनीवर कडधान्ये पिकवतात त्याच जमिनीवर गहू, तांदूळ, बार्ली लावले जाते. येथील जमीन सुजलाम सुफलाम आहे. ऊस, तीळ, गहू, हरभरा ही या देशातील महत्त्वाची पिके आहेत. एकदा इब्न बत्तूता घोड्यावरून प्रवास करीत असताना डोंगरात लपलेल्या बंडखोरांनी त्याला बाण मारायला सुरुवात केली. या हल्ल्यात तो घोड्यासकट जबर जखमी झाला. अखेरीस काफिल्यातील इतर लोकांनी या हल्लेखोरांना डोंगरात पळवून लावले. मध्यरात्री बतूताचा काफिला अबू बकर नावाच्या किल्ल्यात पोहोचला. या मार्गावर सतलज नदीच्या किनारी असलेले मअजोधनफ (पाकपट्टण, पाकिस्तान) गाव बघून त्याला आनंद झाला. हे गाव मोहम्मद तुघलकाने बाबा फरीद यांना बहाल केले होते. इब्नबतूताचा समकालीन आलमुद्दीन या बाबा फरीदच्या नातवाशी त्याची भेट झाली. हाही संतपुरुष होता. अजोधन गावातून बाहेर पडल्यावर त्याने पहिल्यांदाच सती प्रथेविषयी ऐकले. अजमेरला तीन सैनिकांच्या बायका सती जाण्यासाठी निघाल्या होत्या. त्याने लिहिले आहे की, त्याकाळी सती जाणे ही स्त्रियांवर लादलेली सक्तीची प्रथा नव्हती. पण जर विधवा स्त्रिया जिवंत राहणे पसंत करीत असत तर त्यांना जाडेभरडे वस्त्र घालून निरस आयुष्य जगावे लागायचे. सती जाण्यासाठी सुलतानाची परवानगी घ्यावी लागायची. सती जाण्याअगोदर या तीन स्त्रियांचे भरपूर कोडकौतुक झाले. चौथ्या दिवशी त्या घोड्यावर स्वार झाल्या. त्यांनी उंची तलम वस्त्रे परिधान केली होती. त्यांच्या एका हातात नारळ होते आणि दुसऱ्या आरसा होता. सती जाणाऱ्या त्या तीन स्त्रियांची भव्य मिरवणूक निघाली. हिंदू- मुस्लिम सर्व धर्मांचे लोक या मिरवणुकीत सामील होते. तीन मैलांवर ही मिरवणूक थांबली. खाली एक तळे होते. तेथे डुबकी मारून त्यांनी उंची वस्त्रे काढून जाडीभरडी वस्त्रे परिधान केली. अंगावर तेल ओतले. चिता धडाधडा पेटली होती. त्यांना भीती वाटू नये म्हणून जाड रजई त्यांच्यासमोर धरण्यात आली. त्यातील एका स्त्रीने ती रजई पुरुषाच्या हातून हिसकावून घेतली आणि त्वेषाने त्याला बोलली, मी काय आगीला घाबरते होय? मला माहिती आहे की चितेवर अग्नीच्या ज्वाला धडाडून वर येत आहेत. तो घोड्यावरून खाली कोसळू लागला. पण त्याच्या लोकांनी त्याच्या तोंडावर पाणी मारून त्याला सावरले. दिल्लीच्या १० मैल अगोदर मसूदाबादला त्याचा काफिला तीन दिवस थांबला. सुलतानाला खबर गेली होती. तेव्हा सुलतान मोहम्मद बिन तुघलक कन्नौजला होता. सुलतानाने त्याचे स्वागत करण्यासाठी शेख, अमीरउमराव, काझी यांना भेटायला पाठवले. मसूदाबादनंतर पालम या खेड्याजवळ थांबून आता तो दिल्लीकडे कुतुहलाने बघू लागला...




हा ब्रेडसारखा दिसणारा पदार्थ वाढायचे. नंतर भाजलेले मांसाचे तुकडे प्रत्येकासमोर ठेवण्यात यायचे. नंतर त्यांचा विशिष्ट गोड पदार्थ मसाबुनियाफ आणि केकसदृश दिसणारा आणि मैदा, साखर व तुपापासून बनवलेला खिश्ती हा विटेसारखा दिसणारा पदार्थ वाढण्यात येई. चिनी मातीच्या भांड्यांमध्ये तुपात कांद्यामध्ये आणि हिरव्या आल्यामध्ये शिजवलेले समुसाक (मांस) वाढण्यात येई. त्यात भरपूर काजू-बदाम, अक्रोड-पिस्ते असायचे. त्यानंतर भरपूर भात आणि त्यावर कोंबडीच्या मांसाचे तुकडे वाढण्यात यायचे. जेवणाचे पदार्थ संपायचेच नाहीत. सर्व वाढून झाल्यावर सुलतानासह सर्वजण प्रार्थना करायचे. जेवण सुरू करण्यापूर्वी सोन्याचांदीच्या पेल्यांमध्ये सरबत यायचे. ताटाजवळ देखरेखीला असणारा दरबारी बिस्मिल्ला म्हणायचा आणि जेवण सुरू व्हायचे. जेवणानंतर पान खाऊन झाल्यावर पुन्हा एकदा दरबारी जोराने बिस्मिल्ला म्हणायचा. दिल्लीला जाताना त्याला वाटेत सुंदर गावे लागली. पंजाबमधील फिरोजपूर जिल्ह्यातील मअबुहारफ गाव पहिले हिंद गाव असल्याचे तो सांगतो. सध्याचे अबोहार राजस्थानच्या सीमेलगत आहे. तो म्हणतो, भारतातील बहुतांशी वृक्ष जगातल्या इतर देशांमध्ये दिसत नाहीत. वाटेत त्याला आंब्याचे झाडही दिसले. तो म्हणतो की, जेव्हा त्याचे फळ हिरवे असते तेव्हा झाडावरून पाडून गोळा करून त्याचे लिंबासारखे लोणचे टाकतात. जेव्हा आंबा शरद ऋतूत पिकतो तेव्हा गावकरी त्याच्या फोडी खातात किंवा त्या रसाळ आंब्याला चोखतात. त्या काळी आंबा हे फळ ऑक्टोबर ते नोव्हेंबर महिन्यात पिकायचे का, याचे संशोधन करायला हवे. शरद ऋतूतच फणस पिकतो, असे त्याने म्हटले आहे. तो म्हणतो, फणस

आनंद स्पदंन

डॉ. अविनाश मोहरील

# एक छोटेसे थँक यू

जीवनाचे रहाटगाडगे सुरू असताना काही क्षण आपल्या आयुष्यात असे येतात ज्यावेळी आपल्या मनात आपल्या देशाचा विचार येतो. सध्याच्या धावपळीच्या काळात तर तसे विचार फार कमी वेळा येतात. आपला देश, देशापुढील समस्या, आजूबाजूला घडत असलेल्या घटना या सर्व बाबी आपल्याला वर्तमानपत्राच्या माध्यमातून कळत असतात. आपापले काम आपण प्रामाणिकपणे करणे हा देखील देशसेवेचाच भाग आहे. या सोबतच या पृथ्वीतलावरचा माणूस म्हणून देशाच्या सीमारेषांच्या पलीकडे जाऊन आपल्याला विचार करणे गरजेचे आहे.




पर्यावरणाच्या, निसर्गसंरक्षणाच्या बाबतीत आपला विचार व कृती सकारात्मक असण्याची नितांत आवश्यकता आहे. पर्यावरण संरक्षणाच्या बाबी फार छोट्या छोट्या कृतींमधून राबविता येऊ शकतात व त्यासाठी फार मोठे योगदान देण्याची आवश्यकताही नसते. परंतु फार मोठा विचार करताना कधी कधी लहान बाबींकडे आपले दुर्लक्ष होते. सर्वांनी एकत्रितपणे ठरवून हे छोटे छोटे बदल आपल्या दिनचर्येत घडवून आणले तर आपणाकडून या देशाची व धरणीमातेची मोठी सेवा घडू शकते. आपल्या कार्यपद्धतीत किंचित बदल करून पर्यावरणासाठी काम करणारा एक मुलगा मला एका मडेली नीडस् शॉपमध्ये भेटला. त्याच्या परीने तो करीत असलेले कार्य क्षुल्लक वाटत असले, तरी त्याच्या मनात हे कार्य करण्याची इच्छा उत्पन्न होणे ही एक मोठी बाब आहे. त्याच्या या कार्यामुळे परीस्थितीत आमूलाग्र बदल होणार नाही; त्याच्या त्या प्रयत्नांमुळे लोकांना विचार करावा लागेल व काही प्रमाणात बदल होईल. या प्रक्रियेमधून जो काही बदल होईल त्याचे श्रेय त्या मुलाचेच राहणार आहे.

या एका महत्त्वाच्या कामासाठी त्याने एक लहानगी गोष्ट वापरली. ती म्हणजे- एक छोटेसे थँक यू. बाजारातून किंवा मार्केटमधून काही सामान आणायचे असल्यास घरून पिशवी घेऊन जाणे ही एक सवय चांगली असते. त्यामुळे प्लॅस्टिकच्या बॅग वापरण्यापासून आपण परावृत्त होऊ शकतो. अगदी सहजपणे पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने एक महत्त्वाचे कार्य आपल्याला करता येऊ शकते.

सामानासाठी पिशवी सोबत नेल्याबद्दल कुणाकडून पावती मिळणे हा मात्र माझ्यासाठी नवा अनुभव होता. असा अनुभव मला डेली नीड्सच्या दुकानातील त्या मुलाने दिला. काही सामान आणण्यासाठी त्या दुकानात गेलो. सामान बरेच असल्याने त्याने सवयीप्रमाणे पॉलिथीन बॅगेत वस्तू भरणे सुरू केले. मी त्याला पिशवी असल्याबद्दल सांगितले. त्याने अतिशय आनंदी होऊन मला सुहास्य वदनाने मथँक यूफ म्हटले आणि मी पिशवी सोबत आणल्याबद्दल माझ्या हातावर एक छानसे चॉकलेट ठेवले. मी त्याला त्याबद्दल विचारले असता तो म्हणाला, सर आप बहोत अच्छा काम कर रहे है इसलीये थँक यू, जो भी हमारे शॉप मे घर से बॅग लेके आता है, हम चॉकलेट देके उसे बधाई देते है. इससे हमारे कई कस्टमर यहाँ आते वक्त घर से बॅग लेके आते है. मला या सगळ्या प्रकाराची गंमत वाटली.

मी त्याला सहज विचारले, एका चॉकलेटसाठी लोक बॅग आणतात ? तो म्हणाला, ऐसा नही सर, इस बात की वजहसे उन्हे हमारे शॉप मे आते वक्त बॅग लेना याद रहता है. दद मला त्याचा तर्क पटला. त्याने दिलेले चॉकलेट तोंडात टाकून मी त्याचे या उपक्रमाबद्दल मनापासून अभिनंदन केले. एका छोट्याशा कृतीमुळे लोकांना एखादी छान सवय लागत असेल तर ही किती सुंदर गोष्ट आहे.

असाच आणखी एक मथँक यूफ म्हणणारा पोरगा मला भेटला एका एटीएम सेंटरवर. आजकाल आपण सर्वच लोक एटीएम वापरायला लागलो आहे.

बहुतांश वेळी एटीएमचा वापर केल्यावर आपल्या व्यवहारासंबंधी माहिती देणारी ती स्लीप आपल्याला मिळाल्यावर ती बघितली जाते व क्षणातच चुरगळा करून खाली फेकली जाते. अनेक वेळा या एटीएम सेंटरवर आपल्याला या स्लीप्सचा खच पडलेला दिसतो. मी ज्या एटीएम सेंटरचा उल्लेख करतोय तेथे एक विशीतला मुलगा गार्ड म्हणून बसलेला असतो. त्याने या स्लीप्सच्या अयोग्य फेकाफेकीवर काढलेला रामबाण उपाय होता- एक सुहास्य वदनाने दिलेले थँक यू. एटीएमचा वापर केल्यावर ज्या कुणी ती व्यवहार निर्देशित करणारी स्लीप बरोबर डस्टबीनमध्ये टाकली त्या व्यक्तीला तो मनापासून थँक यू म्हणतो. सुरुवातीला मी त्याच्या थँक यूने चमकलो.

मी त्याला विचारले, कारे बाबा कशाचे थँक यू? तो म्हणाला, साहेब, तुम्ही ती ट्रान्झॅक्शन स्लीप बरोबर डस्टबीनमध्ये टाकली म्हणून थँक यू. बरेच लोक ती स्लीप इकडे तिकडे फेकून देतात व खूप कचरा होतो. तुम्ही तसे केले नाही त्याबद्दल थँक यू.

खरे सांगू! त्याचे ते गोड वाक्य ऐकून मी मनोमन सुखावलो.

माझ्यामध्ये सीव्हीक सेन्स किती जागृत आहे, असे मला विनाकारणच वाटून गेले. नंतर मला हळूहळू लक्षात आले की, तो ज्याने स्लीप डस्टबीनमध्ये टाकली त्या प्रत्येकालाच हे वाक्य ऐकवितो आहे. पण त्या निमित्ताने का होईना लोक ती ट्रान्झॅक्शन स्लीप योग्य पद्धतीने डस्टबीनमध्ये टाकायला लागले आहेत. एकदा कुतुहल म्हणून मी त्याला विचारले की, तू ड्युटीवर नसताना कोण थँक यू म्हणणार? त्याने मला स्वतः बनविलेली एक पाटी दाखविली; ज्यावर लिहिले होते- मआपण आपली ट्रान्झॅक्शन स्लीप डस्टबीनमध्ये टाकल्याबद्दल धन्यवाद, थँक यू.

कागदांचा कचरा होऊ नये यासाठी एक छोटासा पण प्रभावी प्रयत्न करणारा तो मुलगा माझ्या आणि बहुतांश मंडळींच्या इतका लक्षात राहिला आहे की, आता इतर कोणत्याही एटीएम सेंटरवर गेलो असता ट्रान्झॅक्शन स्लीप हातात आल्यावर तो मुलगा आणि त्याचे ते मथँक यूफ आठवते आणि ती स्लीप आपसूकच योग्य पद्धतीने टाकली जाते.

एका छोट्याशा थँक यू असा सुंदर परिणाम होऊ शकतो. या दोन्ही मुलांचा विचार माझ्या मनात सारखा घोळत राहतो. आपल्या देशापुरता विचार केला तरी अशा अनेक बाबी आपल्याला दिसत जातात, ज्या बदलण्याची आवश्यकता वाटते. परंतु त्या चुकीच्या गोष्टींचे प्रमाण बघितल्यावर आपल्या एकाच्या पुढाकार घेतल्याने काय होईल, असा विचार मनात येऊन त्या चुकीच्या गोष्टींकडे सहजच दुर्लक्ष केले जाते. परंतु या मुलांनी ज्याप्रमाणे पुढाकार घेऊन एक छोटीशीच गोष्ट करण्याचे ठरविले व त्याचा परिणाम दिसू लागला, हेच खरे गमक आहे. आपल्या देशातील आपल्या सर्वांना लागलेल्या वाईट सवयी मोडून काढण्यासाठी फार मोठा गाजावाजा करून उपक्रम साजरे करण्यापेक्षा अत्यंत साध्या परंतु कल्पक पद्धतीने या सवयी बदलविण्याचा प्रयत्न काही जण मनापासून करीत आहेत. आपणही शक्य झाल्यास असे प्रयत्न आपापल्या कार्यक्षेत्रांत करावे. ते न जमल्यास निदान हे प्रयत्न करीत असलेल्या, छोट्या वाटत असलेल्या परंतु मुळात खूप मोठ्या प्रयत्नांना मदत तर निश्चित करावी. खात्रीपूर्वक सांगतो, असे केल्यास एक गोड थँक यू तर निश्चित प्राप्त होईल.

विवेचन

श्रीरंग हिर्लेकर

# नाचू कीर्तनाचे रंगी

(उत्तरार्ध)




१) शारदीय प्रकारात प्रामुख्याने विष्णू अवतारांच्या व वैष्णव भक्तांच्या उदा. ध्रुव, प्रल्हाद, अंबरिश यांच्या पुराणकथा सांगतात. २) वारकरी पद्धतीत विष्णूऐवजी पंढरपूरचा विठ्ठल व त्याचे असंख्य भक्त उदा. संत नामदेव, जनाबाई, तुकाराम महाराज, एकनाथ, ज्ञानेश्वर, चोखामेळा आणि पुरंदरदास यांच्या चरित्रातील आख्याने असतात. ३) सांप्रदायी कीर्तनात विविध संत संप्रदाय व परंपरा, संत माहात्म्यांच्या चरित्रातील कथांवर कीर्तने होतात. महाराष्ट्रात रामदासी कीर्तन हा प्रकार आहे. यात समर्थ, त्यांचा राम संप्रदाय, कल्याण स्वामी, वेणाबाई इत्यादी. बंगालमध्ये निमाई, चैतन्य प्रभू, रामकृष्ण परमहंस वगैरे. आणि ४) गुजरात आणि उत्तर प्रदेशात राम, कृष्ण किंवा मीराबाई.

सर्व प्रकारांची आपापली वैशिष्ट्ये आहेत; मात्र सर्वसाधारणपणे वारकरी आणि हरदासी कीर्तनात आरंभी १५ ते २० मिनिटे नमन करतात. यांचा क्रम असा : गणपती, सरस्वती, कुलदेवता, स्थान देवता, पांडुरंग आणि गुरू यांच्या नामांचा जयघोष आणि मग प्रसंगानुरूप स्तवनाची पदे गायल्या जातात.

मग पूर्वरंगात बोध विषयाच्या अनुषंगाने संत साहित्यातील एखाद्या प्रसिद्ध अभंगावर अनेक दृष्टांत, संसारिक उदाहरणे, म्हणी, वाक्प्रचार देत विषयाचे निरूपण होते. कंटाळवाणे होऊ नये म्हणून अधूनमधून नामघोष, जयजयकार स्वतः कीर्तनकार करतात आणि श्रोत्यांकडूनही करून घेतात. मध्यंतरात कीर्तनकार १० मिनिटे आसनावर बसतात. आयोजक त्यांचा सत्कार करतात. श्रोत्यांच्या कपाळावर बुक्का लावतात. त्यानंतर नामजप आणि एखाद्या हौशी श्रोत्याला भजन किंवा भक्तिगीत गायला संधी देतात. कारण कीर्तन आणि श्रवण ही जोडी अभंग ठेवणे आवश्यक आहे. श्रोत्यांचे चित्त ढळू नये, मांडलेला भक्तिरस वितळू नये हा उद्देश त्यात असतो.

उत्तररंग साधारण एक तासाचा असतो. निरूपणाच्या अभंगातील विषयाच्या स्पष्टीकरणार्थ संतचरित्रातील एखादी कथा सांगितली जाते. उद्देश एकच 'परित्राणाय साधुनाम् विनाशाय दुष्कृताम्' किंवा धर्म, पापपुण्य कल्पना, नीतिशास्त्र, न्याय हे सर्व श्रोत्यांच्या मनावर बिंबवून त्यांना सन्मार्गावर लावणे. येथे कीर्तनकाराचे खरे कौशल्य, चतुरस्त्र- बुद्धी, वाक्पटुत्व, गायन, पाठांतर सर्व पणाला लागते. कीर्तनाचा समारोप पुन्हा एकदा मूळ पद गाऊन, नामघोष आणि आरतीने करतात.

वारकरी कीर्तनात पखवाज, मृदंग, तबला, टाळ आणि हार्मोनियमची साथ असते. कीर्तनकाराच्या हातात टाळ आणि पायात घुंगरू असतात. कधी ते स्वतः सुरुवात करतात आणि टाळ दुसर्याच्या हाती देऊन स्वतः चिपळ्या वाजवतात. मंदिर किंवा मैदानात ही कीर्तने रंगतात. नारदीय कीर्तनकारांच्या हाती तंबोरी असते. ही कीर्तने मूर्तिसन्मुख होतात. देवालाही आपल्या भक्ताने केलेली कीर्तने आवडतात. नाथांच्या कीर्तनात तर श्रीखंड्याची मूर्ती पण नाचत असे... 'रंगात रंगला श्रीरंग।'

उत्तरप्रदेशातील रामलीला, कोंकणातील दशावतार हेही कीर्तनाचेच प्रकार आहेत. यात अवतारांच्या चरित्रातील प्रसंगांवर नाट्यस्वरूपातील सादरीकरण असते.

तमाशा या प्रकाराचाही उद्देश लोकांना अध्यात्म मार्गावर आणणे हाच असतो. 'कृष्णाने भुलविल्या यमुनेच्या गौळणी', 'देरे कान्हा चोळी अन् लुगडी' किंवा वरवर अत्यंत शृंगारिक वाटणारी गीते उदा. 'आज पहाटे श्रीरंगाने मजला पुरते लुटले गं।' पण शेवट बघा- 'दिसला मग तो देवकीनंदन' किंवा ज्ञानेश्वरांच्या विराण्या (चंदनाची चोळी माझे अंग अंग जाळी) ही सर्व शेवटी अचपळ मनाला अध्यात्म मार्गावर खेचून आणण्याचेच काम करतात.

**अजून काही प्रकार:** अनेक प्रयोग होतात. उदा. चक्रीकीर्तन, खंडनमंडनात्मक जुगलबंदी इत्यादी. खंडन करणारा सामान्यांचा भोगवाद सांगतो तर मंडनकर्ता तो कसा चुकीचा ते समजावतो. अर्थात शेवटी ईश्वरभक्तीच श्रेष्ठ यावर एकमत होते. लोकमान्यांच्या काळात समाज प्रबोधनाचे विषय बदलले. लोकांना आध्यात्मिक मार्गाप्रमाणेच राष्ट्रभक्तीच्या प्रवाहात आणण्यासाठी कीर्तन हे सुलभ साधन ठरले. रागरंग तोच फक्त देवाऐवजी दैवी गुण असलेल्या महापुरुषांची चरित्रे असा राष्ट्रीय कीर्तनाचा प्रकार सुरू झाला. काही प्रसिद्ध कीर्तनकार त्या पद्धतीचे कीर्तन करतात. उदा. नेताजी सुभाष, छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराज, बाजीराव पेशवे, स्वातंत्र्यवीर सावरकर, भगतसिंग इत्यादींची चरित्रे.

**सामाजिक:-** शिक्षण, स्वच्छता, स्त्रीमुक्ती, नैतिक आचरण, कुटुंब नियोजन यांची शिकवण म्हणून संत गाडगेबाबा, संत तुकडोजी महाराजांप्रमाणे आजचे काही कीर्तनकार या विषयांवर प्रबोधन करतात.

**राजकीय आणि कार्पोरेट :-** राजकीय धोरणे जनतेला कळावीत म्हणून म्हणून राजकीय पक्ष कीर्तनकारांचा उपयोग करवून घेतात. कार्पोरेट जगतात विमा कंपनी, बचतीचे महत्त्व सांगणारी बँक, इन्व्हेस्टमेंट कंपन्या, आयटी सेक्टर आपली धोरणे जनतेला कळवण्याचे सोपे आणि परिणामकारक साधन म्हणून कीर्तनांकडे बघतात.

काय असावे, काय नसावे? :

१) कीर्तनकाराचे आचरण, राहणे, दिसणे, वेषभूषा संप्रदायाला धरून असावी. नारदांच्या या गादीवरून काय बोलावे, कोणते विषय आणि शब्दप्रयोग टाळावेत याचा विवेक असावा. शृंगारिक किंवा अश्लील हावभाव न व्हावेत.

२) कीर्तनात गायनवादनाची भूमिका महत्त्वाची असते हे खरे; पण काही कीर्तनकार गाण्याचा अतिरेक करून आपली गायकी दाखवत निरुपणातील उणेपणा झाकतात. ती गायनाची मैफिल नाही. गायनात साथीदारांची भूमिका दुय्यम असावी तसेच गायनवादन कीर्तनापेक्षा वरचढ ठरू नयेत. भोजनात चटणी-कोशिंबिरींचे स्थान मुख्य पदार्थांच्या डावीकडेच असावे.

३) पाठांतर : मराठवाड्यातील एक जन्मांध कीर्तनकार ह. भ. प. प्रभाकरराव देशपांडे ५५ वर्षांपूर्वी माझ्या घरी येत. मी त्यांना ज्ञानेश्वरी, तुकोबांची गाथा, नाथांच्या गवळणी इत्यादी वाचून दाखवत असे व लक्षात ठेवून ते निरूपण करीत.

अनेकांना संत, पंत आणि तंत साहित्य मुखोद्गत असते. संस्कृत श्लोक किंवा मोरोपंतांच्या आर्या सहज आणि अस्खलित म्हणतात. कीर्तनकारांच्या विद्वत्तेने श्रोतेही भारून जातात, पण अतिरेक केल्यास सामान्य लोक कंटाळतात. कीर्तन कसे हवे तर विद्वानांच्या पगड्या आणि शेतकर्याचे पागोटे सारखेच डोलले पाहिजे.

**'हेचि दान देगा देवा।**
**तुझा विसर न व्हावा'**

या भजनाने कीर्तन संपते. श्रोते घरी परततात.

**।। जय हरि विठ्ठल।।**

## एक प्रवास

विविध विचारांची लोकं
एका विचाराने उत्सुक होऊन
सोयीचे दिवस, सोयीची टूर घेऊन
निर्णयावर येतात सर्व ठरवून
कसं होईल? हा विचार
ठाम निश्चयाने आडवा येत नाही तेव्हा-
जुळवून घेऊ, प्रसंगांना
कमी-अधिक, होतेच कुणाचेही
सुरुवातीला उत्साह बघावा
चिन्हे सगळी असतात दमदार
दोन दिवसांत सोयीला मुरड
मनाचे लाड कसे पुरवणार..!
हळूहळू ओळखी होतात
जुळवाजुळवीत मन रमतं
नाहीच जमलं काही की
खट्टू मन रुसून बसतं
सोयींसाठी देहाचे आजार
डोकं वर काढू लागतात
सोय होता हसतखेळत
प्रवासात दंग होतात
आपण आनंद घेतो
तेव्हा नाण्याला दुसरी बाजू असते
सारे तरंग मनाचे, तशी
दृष्टी आड सृष्टी असते
आपण बघितले, ना बघितले
सुख-दुःखाचे चक्र कायम असतं
आपला जसे, तसे मनाचे
काळाचेही चक्र असतं
समजले ज्याला तो झाला
म्हणावा युगायुगाचा प्रवासी
बाकी नातं जुळते सहजपणे
जसे बिंबाचे प्रतिबिंबासी...
प्रवास असाच व्हावा
जणू जीव शिव एकच आहे
प्रत्यक्षात दृष्टांत मिळतो
प्रश्न जागृकतेचा आहे.

अतुल ठाकरे

पर्यावरण

मिलिंद बेंडाळे

# कचऱ्याचा निचरा बनतेय मोठे आव्हान

भारतीय शहरांमध्ये एक दृश्य पावसाळ्यामध्ये नेहमी पाहायला मिळते. ते म्हणजे रस्त्यांवर साचलेले पाणी, तुंबलेली गटारे, वाहतुकीची कोंडी, घरांमध्ये शिरलेले पाणी आणि प्रशासनाची धावपळ. अतिवृष्टी झाली की थेट हवामान बदलावर खापर फोडले जाते. हवामान बदलामुळे कमी वेळेत अधिक तीव्र पाऊस पडण्याच्या घटना वाढत आहेत, हे निर्विवाद; मात्र प्रत्येक वेळी केवळ पावसाला दोष देऊन प्रशासनाची जबाबदारी संपत नाही. शहरांमध्ये पाणी साचण्यामागे एक तितकेच गंभीर आणि दुर्लक्षित कारण आहे, ते म्हणजे कचरा व्यवस्थापनाचा अभाव. शहरातील नाले, गटारे आणि पावसाच्या पाण्याचा निचरा करणाऱ्या वाहिन्यांमध्ये प्लॅस्टिकच्या पिशव्या, बाटल्या, थर्माकोल, घरगुती कचरा आणि बांधकामाचा मलबा मोठ्या प्रमाणात अडकतो. परिणामी पावसाचे पाणी वाहून जाण्याचा नैसर्गिक मार्गच बंद होतो. काही तासांचा पाऊस पुरेसा ठरतो आणि शहरातील रस्ते नाल्यांमध्ये रूपांतरित होतात. त्यामुळे शहरी पूर ही केवळ पावसाची समस्या नसून नियोजन, कचरा व्यवस्थापन आणि प्रशासनिक समन्वयाच्या अपयशाची संयुक्त परिणती आहे. देशात दररोज निर्माण होणाऱ्या शहरी घनकचर्याचे प्रमाण प्रचंड आहे.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आकडेवारीनुसार भारतात दररोज सुमारे १ लाख ७० हजार ९०० टन शहरी घनकचरा निर्माण होतो. त्यापैकी केवळ ६१ टक्के कचर्यावर प्रक्रिया होते. सुमारे २२ टक्के कचरा लँडफिलमध्ये जातो, तर १७ टक्के कचर्याचा व्यवस्थित मागोवा उपलब्ध नाही. या मागोवा नसलेल्या कचऱ्याचे काय होते, हा खरा प्रश्न आहे. सर्वसाधारणपणे कचर्याचा मोठा हिस्सा रस्त्याच्या कडेला, मोकळ्या जागांमध्ये, नाल्यांच्या परिसरात किंवा जलस्रोतांमध्ये पोहोचतो. पावसाळ्यात हाच कचरा वाहून जाऊन नाल्यांमध्ये अडकतो. प्लॅस्टिक आणि विघटन न होणाऱ्या इतर वस्तू नाल्यांच्या अरुंद भागात जाळ्यासारख्या अडकतात आणि त्यावर माती, पाने, चिखल आणि इतर कचरा साचत जातो. परिणामी, नाल्याची पाणी वाहून नेण्याची क्षमता झपाट्याने कमी होते. हैदराबादमध्ये पावसाच्या पाण्याच्या निचऱ्याच्या नाल्यामधून तब्बल १३ ट्रक कचरा काढावा लागल्याचे उदाहरण या समस्येची व्याप्ती दाखवते. म्हणजे नाले बांधले आहेत, त्यांची सफाई करण्यासाठी यंत्रणा आहे; पण कचरा पुन्हा पुन्हा त्याच नाल्यांमध्ये जात असेल तर या सर्व यंत्रणेचा उपयोग किती? आज हवामान बदलामुळे पावसाचे स्वरूप बदलत आहे. पूर्वी अनेक तास किंवा दिवसांमध्ये पडणारा पाऊस आता काही मिनिटे किंवा तासांमध्ये मोठ्या प्रमाणात पडतो. अशा परिस्थितीत जुन्या पावसाच्या सरासरीवर आधारित जलनिचरा व्यवस्था अपुरी पडणारच. शहरी जलनिचरा व्यवस्था अनेकदा ताशी १२ ते २० मिलिमीटर पावसाची तीव्रता हाताळण्याच्या क्षमतेवर आधारित असते. प्रत्यक्षात काही शहरांमध्ये त्यापेक्षा किती तरी अधिक तीव्रतेचा पाऊस पडत आहे. महाराष्ट्रातील ठाणे आणि गुजरातमधील नवसारीसारख्या शहरांमध्ये दोन वर्षांच्या पुनरावृत्ती कालावधीच्या पावसाच्या घटनांमध्ये ताशी ५५ ते ६० मिलिमीटरपर्यंत पावसाची तीव्रता नोंदली गेली आहे. ज्या नाल्यांची क्षमता आधीच मर्यादित आहे, त्यात कचरा भरला तर ते अतिवृष्टीचा सामना कसा करणार हा प्रश्न उरतोच. या पृष्ठभूमीवर शहरी पूर रोखण्याची रणनीती

> **शहरांना पूरमुक्त करण्याची सुरुवात मोठ्या प्रकल्पांपासून नव्हे, तर कचरा नाल्यात जाणार नाही, याची हमी देणाऱ्या एका साध्या तत्त्वापासून झाली पाहिजे. यामागील कारण म्हणजे कचरा व्यवस्थापन ही केवळ स्वच्छतेची जबाबदारी राहिलेली नाही, तर ती शहरांच्या सुरक्षिततेची, सार्वजनिक आरोग्याची आणि हवामान बदलाशी जुळवून घेण्याची अत्यावश्यक पायाभूत व्यवस्था बनली आहे. समाज याकडे गांभीर्याने लक्ष देईल का?**



अधिक मोठे नालेर या एका उपायाभोवती न फिरता पाऊस + कचरा + जलनिचरा + शहर नियोजन या सर्व घटकांचा एकत्रित विचार करणारी असली पाहिजे. दरवर्षी पावसाळा जवळ आला की, नालेसफाईची मोहीम सुरू होते. काही दिवस मोठ्या प्रमाणात गाळ आणि कचरा काढला जातो. त्याची छायाचित्रे प्रसिद्ध होतात. अहवाल तयार होतात. त्यानंतर पुन्हा परिस्थिती पूर्वपदावर येते. नालेसफाई ही वार्षिक मोहीम न राहता सतत चालणारी व्यवस्थापन प्रक्रिया झाली पाहिजे. कोणत्या नाल्यात दरवर्षी जास्त कचरा साचतो, कोणत्या परिसरातून प्लॅस्टिक जास्त वाहून येते, कुठे अनधिकृत कचरा टाकला जातो आणि कोणत्या भागात पाणी साचण्याची शक्यता जास्त आहे, याची डिजिटल नोंद ठेवली पाहिजे. प्रत्येक प्रभागासाठी मकचरा नकाशाफ आणि मपूरजोखीम नकाशा तयार करता येऊ शकतो. या दोन्ही नकाशांचा एकत्रित वापर करून नालेसफाईचे वेळापत्रक ठरवल्यास मर्यादित मनुष्यबळ आणि निधीचा परिणामकारक वापर करता येईल. शहरांमध्ये घनकचरा व्यवस्थापन एका विभागाकडे, नाले दुसऱ्या विभागाकडे पाणीपुरवठा तिसऱ्याकडे आणि मलनिःसारण चौथ्या यंत्रणेकडे असते; मात्र पावसाचे पाणी या प्रशासकीय सीमांचा विचार करत नाही. कचरा नाल्यात गेला, तर जलनिचरा विभागाची समस्या बनतो. नाल्यात मिसळले तर आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो. रस्त्यावर कचरा पडला, तर स्वच्छता विभागाची जबाबदारी येते; पण प्रत्यक्षात या समस्या परस्परांशी जोडलेल्या आहेत. त्यामुळे महानगरपालिका आणि नगरपालिकांमध्ये एकात्मिक शहरी जलव्यवस्थापन कक्ष उभारण्याची गरज आहे.

हवामानाचा अंदाज, पावसाचे प्रमाण, नाल्यांची क्षमता, कचर्याचे संकलन, सिवरेज व्यवस्था आणि पूरस्थिती यांचा एकत्रित डेटा या कक्षाकडे असावा. आपत्कालीन परिस्थितीमध्ये वेगवेगळ्या विभागांच्या बैठका घेण्यापेक्षा वर्षभर समन्वयाने काम करणारी व्यवस्था निर्माण झाली पाहिजे. प्रशासनाला दोष देणे सोपे आहे; पण रस्त्यावर कचरा टाकणारा नागरिक, दुकानाबाहेर प्लॅस्टिक फेकणारा व्यापारी आणि बांधकामाचा राडारोडा नाल्याच्या कडेला टाकणारा कंत्राटदार यांचीही जबाबदारी आहे. नागरिकांनी कचरा योग्य पद्धतीने दिला नाही, तर जगातील कोणतीही महानगरपालिका १०० टक्के स्वच्छता राखू शकत नाही. म्हणूनच दंडाची व्यवस्था कठोर करण्याबरोबरच तिची अंमलबजावणीही तितकीच महत्त्वाची आहे. मकचरा टाकू नकाफ अशी घोषणा भिंतीवर लिहिण्यापेक्षा कचरा टाकणार्यावर प्रत्यक्ष कारवाई झाली पाहिजे. व्यावसायिक आस्थापनांसाठी स्वतंत्र नियम, बांधकाम कचर्यासाठी स्वतंत्र संकलन व्यवस्था आणि प्लॅस्टिक कचर्यासाठी स्वतंत्र प्रणाली आवश्यक आहे. नागरिक सहभागाशिवाय शहरी पूर नियंत्रणाचे कोणतेही धोरण दीर्घकाळ यशस्वी होणार नाही. आपल्या शहरांच्या अनेक भागांमध्ये नाले हे कचरा टाकण्याची सोयीची ठिकाणे बनले आहेत. ही मानसिकता बदलण्याचे आव्हान प्रशासनापुढे आहे. यासाठी कचरा संकलनाची सुविधा वेळेवर आणि नियमित असणे आवश्यक आहे. घराघरातून कचरा नीट उचलला न गेल्यास नागरिक रस्त्यात किंवा नाल्यात टाकण्याची शक्यता वाढते. त्यामुळे स्रोतावर कचरा वर्गीकरण, नियमित संकलन, प्रक्रिया आणि पुनर्वापर या चारही बाबी प्रभावीपणे राबवाव्या लागतील. केवळ कचरा उचलणे म्हणजे कचरा व्यवस्थापन नव्हे. कचर्याचा पुढील प्रवास कुठे होतो, याचीही जबाबदारी प्रशासनाने स्वीकारली पाहिजे. शहरी पूर रोखण्यासाठी प्रत्येक उपाय कोट्यवधी रुपयांचा असावा असे नाही. नाल्यांच्या प्रवेशद्वारांवर डेब्रिस ट्रॅप्स, स्क्रीन आणि ट्रॅश रॅकसारखी साधने बसवून मोठ्या प्रमाणातील घनकचरा नाल्यात जाण्यापासून रोखता येतो. केरळमधील अलाप्पुझा येथील मकॅनालपीफ सारख्या उपक्रमांमधून स्थानिक पातळीवर कचरा अडवण्याचे आणि विकेंद्रित कचरा व्यवस्थापनाचे प्रयोग झाले आहेत. अशा प्रयोगांचा अभ्यास करून महाराष्ट्रातील शहरांमध्ये स्थानिक परिस्थितीनुसार अंमलबजावणी करता येईल. प्लॅस्टिक कचरा हा नाल्यांसाठी सर्वात मोठा धोका ठरतो. त्यामुळे एकदाच वापरल्या जाणार्या प्लॅस्टिकवरील निर्बंधांची अंमलबजावणी कागदावर न राहता प्रत्यक्षात दिसली पाहिजे. कचरा व्यवस्थापन सुधारले तरी शहरी पूर पूर्णपणे थांबणार नाही. कारण अनेक शहरांमध्ये नैसर्गिक नाले, ओढे, तलाव आणि पाणथळ जागांवर अतिक्रमण झाले आहे. काँक्रीटीकरणामुळे जमिनीत पाणी मुरण्याचे प्रमाण कमी झाले आहे. त्यामुळे पावसाचे पाणी वेगाने वाहून जाते आणि विद्यमान निचरा व्यवस्था त्याला सामावून घेऊ शकत नाही. शहरांच्या विकास आराखड्यात जलस्रोत आणि नैसर्गिक निचरा मार्गांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. तलाव बुजवून, नाले अरुंद करून किंवा नैसर्गिक पाण्याचे मार्ग बंद करून उभारलेली बांधकामे भविष्यात शहरांसाठी मोठी आपत्ती ठरू शकतात.

(लेखक पर्यावरण अभ्यासक आहेत.)

पान १ वरून

## अराजकतेचे ग्रहण

फ्रान्सची अर्थव्यवस्था संकटात आहे. देशाच्या डोक्यावरील कर्जाचा बोजा, सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या सुमारे १२० टक्के झाला आहे. वित्तीय तुटीचे प्रमाण ५.८ टक्के आहे. भारताचे उदाहरण द्यायचे झाल्यास, 'कोविड-१९' काळात भारताची वित्तीय तूट ६.७ टक्के झाली होती. गेल्या पाच वर्षांत तिचे प्रमाण ४.४ टक्क्यांपर्यंत खाली आणण्यात आले. फ्रान्सच्या बाबतीत याच्या विरुद्ध परिस्थिती आहे. तिथे तुटीचे प्रमाण ४.७ टक्क्यांवरून, ५.८ टक्क्यांवर गेले आहे. तूट कमी करायची म्हणजे, सरकारी खर्चात कपात करणे आवश्यक असून, तसे केल्यास शिक्षण, आरोग्य आणि अन्य सामाजिक क्षेत्रांची आबाळ होते. फ्रेंच महिलांमध्ये जननदर १.५६ टक्के असून, मुख्यतः आफ्रिकेतून कायदेशीर किंवा बेकायदेशीर मार्गाने येऊन फ्रान्समध्ये स्थायिक झालेल्या महिलांचा जननदर २.६ टक्के आहे. त्यामुळे गेल्या दोन दशकांत फ्रान्समध्ये बाहेरून आलेल्यांची संख्या ५ टक्क्यांपासून वाढून, आता १३.५ टक्के इतकी झाली आहे. त्यांच्यात शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. बाहेरून आलेले लोक मुख्यतः कृष्णवर्णीय आणि मुस्लीम धर्मीय आहेत. त्यांची पुढची पिढी फ्रेंच समाजाशी एकरूप होऊ न शकल्याने, त्यांच्यामध्ये धर्मांधता वाढत आहे. सध्या फ्रान्समध्ये चालू असलेल्या हिंसाचारात, या समाजघटकांचाच वाटा मोठा आहे. या आंदोलनात दुकाने फोडताना 'मॅडोनाल्ड्स'चा विध्वंस केला; पण शेजारच्या 'हलाल रेस्तराँत'ला धक्काही लावला नाही.

फ्रेंच कर्मचारी आठवड्याला फक्त ३५ तास काम करतात. घरी असताना कर्मचाऱ्यांना कामासाठी 'ई-मेल' किंवा फोन करण्यास परवानगी नसून, तसे केल्यास त्याकडे दुर्लक्ष करण्याचा हक्क त्यांना आहे. फ्रान्समध्ये तुम्हाला दरवर्षी सहा आठवड्यांची भरपगारी रजा मिळते. बाळंतपणाची रजा संपल्यानंतर, महिलांना काहीकाळ आठवड्याच्या मध्यालाही सुटी मिळते. कामगार संघटना शक्तिशाली आहेत. शेतीला खूप मोठ्या प्रमाणावर अनुदान दिले जात असून, ते कमी केल्यास शेतकरी 'बंडा'चा झेंडा हाती घेतो. कामगारही नित्यनियमाने संपावर जातो. त्यामुळे अनेक फ्रेंच कंपन्या, आपले काम विकसनशील देशांत 'आऊटसोर्स' करतात. त्यामुळे अन्य देशांच्या तुलनेत, फ्रान्समध्ये ९-१० टक्के एवढे बेरोजगारीचे प्रमाण आहे. फ्रान्समध्ये 'सेक्युलॅरिझम' हा जीवन व्यवस्थेचा भाग आहे. पण, मुस्लीम धर्मियांची नवी पिढी त्याला अपवाद ठरते.

# एआयला लगाम नको; पण नियंत्रण हवे!

वेध

भागवत सोनावणे

एआयची ताकद वाढत असताना तंत्रज्ञान किती काळ माणसाच्या नियंत्रणात राहील, असा प्रश्न उभा राहात आहे. घातक हेतू असलेले लोक या तंत्रज्ञानाचा गैरवापर करू पहात आहेत. अर्थात त्यामुळे एआयला घाबरणे किंवा कोणतीही मर्यादा न घालता मोकळे सोडणे शहाणपणाचे नाही...विकासाचा वेग कायम ठेवतानाच एआयच्या वापरासाठी स्पष्ट नियम, मानवी देखरेख आणि कठोर सुरक्षा चौकट आवश्यक आहे.

एखादे नवीन तंत्रज्ञान आले की बरेचदा दोन टोकाच्या प्रतिक्रिया उमटतात. एक गट त्यात भविष्यातील सर्व समस्या सोडवणारे उत्तर पाहतो, तर दुसरा गट त्याच तंत्रज्ञानात भविष्यातील संकटाचे बीज शोधतो. कृत्रिम बुद्धिमत्तेबाबतही असेच होत आहे. मएआयफ मुळे जगात क्रांती होणार आहे, असे सांगितले जाते; त्याचवेळी एआय मानवजातीसाठी धोका ठरू शकतो, असे इशारेही दिले जात आहेत. प्रत्यक्षात सत्य या दोन्ही कमध्ये दडले आहे.



आज एआय एजंटच्या वाढत्या क्षमतेकडे लक्ष देणे गरजेचे बनत आहे. आजचा साधा चॅटबॉट आणि उद्याचा एआय एजंट यांच्यात मोठा फरक आहे. चॅटबॉट प्रश्नाचे उत्तर देतो. एआय एजंट एखादे काम पूर्ण करण्यासाठी अनेक टप्पे स्वतः आखू शकतो. माहिती शोधणे, तिचे विश्लेषण करणे, पुढची कृती ठरवणे आणि काही डिजिटल साधनांचा वापर करणे अशी प्रक्रिया तो स्वतः राबवू शकतो. या क्षमतेमुळे उत्पादकता वाढू शकते; त्याचबरोबर चुकीच्या कृतीचा धोकाही वाढतो. याच कारणामुळे एआय एजंटला अधिकार देताना मकाय करता येईल?फ यापेक्षा मकाय करता कामा नये? हे आधी ठरवणे आवश्यक आहे. समजा, एखाद्या एआय एजंटला बँकेच्या प्रणालीशी जोडले आणि ग्राहकांच्या व्यवहारांचे विश्लेषण करण्यासाठी त्याला परवानगी दिली, तर ती सुविधा उपयुक्त आहे. एआयने चूक केली, असे म्हणून प्रश्न संपत नाही. त्या चुकीची किंमत कोण मोजणार, हा खरा प्रश्न आहे. आज एआयच्या निर्णयांमध्ये पारदर्शकतेचा प्रश्नही महत्त्वाचा आहे.

एखाद्या माणसाने निर्णय घेतला तर त्याला कारण विचारता येते. एखाद्या अधिकाऱ्याने फाईल नाकारली, तर त्याच्या निर्णयाची नोंद मागता येते; पण मएआयफने एखाद्या व्यक्तीला कर्ज नाकारले, विमा प्रीमियम वाढवला किंवा एखाद्या अर्जाला प्राधान्य दिले, तर त्या निर्णयामागची प्रक्रिया समजणे अनेकदा अवघड असते. म्हणून एआयच्या भविष्यात स्पष्टीकरणाचा अधिकार हा देखील महत्त्वाचा मुद्दा ठरणार आहे. भारतासाठी हे आव्हान विशेष मोठे आहे. कारण भारताने डिजिटल व्यवस्थेचा स्वीकार मोठ्या प्रमाणात केला आहे. आज ग्रामीण भागातील सामान्य नागरिकापासून महानगरातील मोठ्या उद्योगापर्यंत सर्वजण डिजिटल प्रणालींवर अवलंबून आहेत. बँकिंगपासून सरकारी अनुदानापर्यंत आणि आरोग्यसेवेपासून ऑनलाईन शिक्षणापर्यंत डिजिटल पायाभूत व्यवस्था जीवनाचा भाग बनली आहे. याच डिजिटल व्यवस्थेमध्ये एआयचा प्रवेश वाढणार आहे. एआयमुळे सरकारी सेवा अधिक वेगवान होऊ शकतात. नागरिकांच्या अर्जांची छाननी, कागदपत्रांची पडताळणी, करचुकवेगिरीचा शोध, वाहतूक नियोजन, आपत्ती व्यवस्थापन अशा अनेक क्षेत्रांमध्ये एआयचा उपयोग होऊ शकतो; पण नागरिकांची माहिती मोठ्या प्रमाणा-वर एआय प्रणालीकडे गेल्यास डेटा सुरक्षेचा प्रश्नही निर्माण होईल. नागरिकांचा डेटा म्हणजे फक्त आकडेवारी नाही. त्यामध्ये आर्थिक व्यवहार, आरोग्यविषयक माहिती, ओळख, पत्ता आणि वैयक्तिक सवयींची माहिती असू शकते. हा डेटा चुकीच्या हातात गेला, तर परिणाम गंभीर असू शकतात, एआयच्या युगात डेटा सुरक्षा ही एआय धोरणाचा भाग असायला हवी. यासोबतच एआयच्या मदतीने होणाऱ्या दिशाभूल करणाऱ्या प्रचाराचे आव्हानही मोठे आहे. एखाद्या व्यक्तीच्या आवाजाची हुबेहूब नक्कल करणे, त्याच्या चेहऱ्याचा वापर करून बनावट व्हिडीओ तयार करणे किंवा एखाद्या घटनेची खोटी चित्रे तयार करणे आज पूर्वीपेक्षा सोपे झाले आहे. एखादी खोटी माहिती काही मिनिटांमध्ये समाजमाध्यमांद्वारे लाखो लोकांपर्यंत पोहोचू शकते. याचा परिणाम केवळ राजकीय क्षेत्राप-ुरता मर्यादित राहणार नाही. आर्थिक अफवा पसरवणे, एखाद्या कंपनीविरुद्ध बनावट माहिती निर्माण करणे यासाठीही एआयचा वापर होऊ शकतो. याचा अर्थ मएआयफ वर बंदी घालावी असा नाही. उलट, अशा काळात सत्य पडताळण्याची यंत्रणा अधिक मजबूत करण्याची गरज आहे. एआयमुळे रोजगारावर होणाऱ्या परिणामाची चर्चादेखील भावनिक पद्धतीने करण्यापेक्षा वास्तववादी पद्धतीने करायला हवी.

काही नोकऱ्या कमी होतील, काही नोकऱ्यांचे स्वरूप बदलेल आणि अनेक नवीन व्यवसाय निर्माण होत-ील. औद्योगिक क्रांतीच्या काळात यंत्रांमुळे काही पारंपरिक कामे संपली; पण त्याच वेळी नवीन क्षेत्रे निर्माण झाली. एआयच्या बाबतीतही असेच होण्याची शक्यता आहे; मात्र या वेळी बदलाचा वेग अधिक असू शकतो. त्यामुळे कौशल्य विकासाला प्रचंड महत्त्व येणार आहे. शिक्षण व्यवस्थेने विद्यार्थ्यांना केवळ माहिती पाठ करण्याऐवजी विश्लेषण, सर्जनशीलता, समस्या सोडवणे आणि तंत्रज्ञानाचा जबाबदार वापर शिकवायला हवा. एआयच्या युगात मानवी बुद्धीचे महत्त्व कमी होणार नाही. उलट, ते अधिक वाढेल. कारण एआयकडे माहिती असेल, वेग असेल, गणना करण्याची क्षमता असेल; पण कोणता निर्णय नैतिक आहे, कोणता निर्णय समाजहिताचा आहे आणि कोणत्या परिस्थितीत मानवी संवेदनशीलता आवश्यक आहे, हे ठरवण्याची जबाबदारी माणसाचीच राहील. म्हणून एआयच्या नियंत्रणाबाबतचा सर्वात महत्त्वाचा शब्द आहे, मानवी देखरेख. विशेषतः संरक्षण आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या क्षेत्रात ही बाब अधिक संवेदनशील आहे. एआयचा वापर लष्करी नियोजन, ड्रोन, सायबर सुरक्षा आणि गुप्तचर विश्लेषणासाठी होऊ शकतो; पण अंतिम निर्णय पूर्णपणे स्वयंचलित प्रणालीवर सोपवणे कितपत योग्य आहे, हा जागतिक पातळीवर गंभीर चर्चेचा विषय आहे. कारण युद्धातील एका चुकीच्या निर्णयाची किंमत हजारो, लाखो जीव असू शकते. त्यामुळे एआयचा वापर ज्या क्षेत्रात मानवी जीविताशी थेट संबंधित आहे, (पान ६ वर)

# कोहाळा- नारळ बर्फी



कोहळा, लाल भोपळा यांना नवरात्रोत्सवात विशेष महत्व असते. एकतर याच दिवसात हे भरपूर प्रमाणात आणि छान येतात. शिवाय देवीला हे कापून अर्पण करण्याचीही बरेच ठिकाणी प्रथा आहे. यात भरपूर प्रमाणात जीवनसत्व, फायबरस असतात त्यामुळे तब्येतीसाठीही खूप उत्तम असतात. शिवाय नवरात्रीच्या उपवासालाही यांच्यापासून बनवलेले पदार्थ चालतात. कोहळ्याची बर्फी तर उपवासामुळे होणारे पित्त शमवण्यास मदत करतेच, दिसायला आकर्षक, पौष्टीक आणि टेस्टी असते. म्हणून आज आपण करूया कोहळ्याची सुरेख बर्फी..

**साहित्य:** कोहाळ्याचा कीस २ वाट्या, २ वाट्यासाखर, अर्धी वाटी खोवलेला नारळ, अर्धी वाटी खवा, पाव वाटी साजूक तूप, दहा-बारा वेलदोड्याची पूड, डेकोरेशनसाठी टुटीफ्रुटी,पिस्ते.

**कृती :** प्रथम एका भान्ड्यात खोवलेला नारळ आणि साखर मिसळून ठेवावे. म्हणजे ओल्या नारळामुळे साखर विरघळून त्याला पाणी सुटेल. मग गॅसवर कढई ठेवून त्यात तूप घालून त्यामध्ये कोहाळ्याचा किस वाफावून घ्यावा. मग त्यात नारळाचा कीस व साखर घालून छान परतावे. थोडे घट्ट होऊन रंग बदलला की त्यात खवा घालून घट्ट गोळा होईपर्यंत परतावे. मग वेलदोड्याची पूड घालुन एकजीव करावे. एका ताटाला तुप लावून घ्यावे. मग हा घट्ट झालेला गोळा त्यावर घालून हातात प्लास्टिकची पिशवी घालून किंवा वाटीच्या बुडाला तुप लावून ताटात व्यवस्थीत पसरून घ्यावे. सुरीने वड्या पाडून प्रत्येक वडीवर टुटीफ्रुटी व पिस्ते लावून मस्त सजवाव्यात. थंड होताच सुरी किंवा उलथण्याने छान वड्या काढून डिशमध्ये काढून ठेवाव्यात.

**वैशिष्ट्य:** कोहाळे हे एक नारळाप्रमाणेच पूर्णपणे उपयोगी आहे. याचे पाणी.. रस सुद्धा अत्यंत औषधी असतो. म्हणून तो फेकून नं देता सुगरणी पापडाचे पीठ त्यात भिजवून पापड बनवतात. ही वडी खूपच पौष्टिक आणि चवीला सुरेख लागते. मऊ असल्यामुळे लहान मुलांपासुन ते वृद्धांपर्यन्त सर्वजण खाऊ शकतात. कोहाळा खूपच गुणकारी व औषधी असल्यामुळे शक्तीवर्धक आणि स्त्रियांना खूपच लाभदायक आहे पांढऱ्या शुभ्र वड्यांवरील रंगीबेरंगी सजावटीमुळे खूपच आकर्षक दिसतात. नक्की या उपवासासाठी करून ठेवा आणि मनसोक्त आस्वाद घ्या.

स्नेहा मुसरीफ

कीर्तिरूपांच्या आठवकथा
डॉ. रमा गोळवलकर

# कात्यायन

## यज्ञ अग्नीत तुपाची धार अर्पण करणारी ब्रह्मवादिनी ऋषिका विश्ववारा आत्रेयी



शक्तीची निस्सीम भक्ती आणि विशेष उपासना करणारे शाक्तपंथीय चार उपपंथात वर्गीकृत केले जातात. यापैकी ललिता सहस्रनाम पठनासह श्रीयंत्राचं पूजन करून ललिता त्रिपुरसुंदरी या सुंदर, ज्ञानदायी, ऐश्वर्यप्रदात्री आणि कल्याणकारी देवी स्वरूपाची उपासना करणारे मश्रीकुलफ पंथीय म्हणवतात. तर, मकालीकुलाफ्चे उपासक मुख्य भर तांत्रिक साधनांवर देत देवीच्या उग्र, संहारक आणि शक्तिशाली रूपांत म्हणजेच महाकाली किंवा तारा या मुख्य देवीची पूजा केली जाते. या दोन्हीही कुलांमध्ये दशमहाविद्यांची उपासना प्रचलित आहे. कुलांनुसार या १० महाविद्यांचे विभाजन करण्यात आलं आहे. मकालीकुलाफ्चे उपासक महाकाली, तारा, छिन्नमस्ता, धूमावती, त्रिपुरभैरवी, बगलामुखी या सहा महाविद्या समाविष्ट आहेत. तर, मश्रीकुलाफची साधना करणारे मश्रीविद्याफ संप्रदायी त्रिपुरसुंदरी (पोडशी), भुवनेश्वरी, मातंगी, कमलात्मिका (कमला) या चार महाविद्या समाविष्ट करतात. याशिवाय आचार आणि साधना पद्धतीनुसार शाक्त पंथाचे तीन उपमार्ग पडतात: **१) दक्षिणमार्ग किंवा समयाचार/ साममार्गी:** हा सात्त्विक मार्ग आहे. यामध्ये वैदिक नियमांचं पालन करून, देवीच्या सात्त्विक स्वरूपाची सात्त्विक पद्धतीच्या प्रकट षोडशोपाचारानं केलेली पूजा. २) वाममार्ग किंवा कौलाचार हा अत्यंत गुप्त आणि तांत्रिक मार्ग आहे. यामध्ये अवैदिक मानल्या जाणाऱ्या गुप्त तांत्रिक विधी (पंचमकार- मद्य, मांस, मस्य, मुद्रा, मैथुन) चा वापर करून साधना केली जाते. ३) दक्षिणमार्ग आणि वाममार्ग या दोन्हीतील चांगल्या किंवा सोप्या पद्धती एकत्र करून केलेली देव्योपासना मिश्रमार्ग म्हणवली जाते.

पूजेचं तंत्र आणि मूळ तत्त्वज्ञानावर आधारित विभागणी हा तिसरा प्रकार आहे. शाक्त तंत्र साहित्यात मूळ बीजमंत्रांच्या आधारे उद्भवलेल्या विद्या संप्रदायांचे तीन मुख्य उपपंथ आहेत. मकफ या अक्षरानं सुरू होणाऱ्या मंत्राचं अधिष्ठान आणि कामराज रूपी शिवासह शक्तीची उपासना केंद्रस्थान असलेली मकादि विद्या. ब्रह्मवादिनी लोपामुद्रेच्या तपःसाधनेचा परिपाक म्हणजे ह या बीजाक्षरापासून सुरू होणारा मूळ मंत्र असलेली हा विद्या आणि स हे बीजाक्षर असलेल्या मूळ मंत्राचं आलंबन करणारी ती सादि विद्या!

देव्योपासनेचे आधुनिक प्रवाह ढोबळमानानं दोन प्रकारात विभागले आहे १) भक्तिमार्ग: दुर्गा, कालिका, लक्ष्मी, सरस्वतीची पूजा, नवरात्रीची घटस्थापना, कुलाचार इत्यादी. २) योग मार्ग कुंडलिनी साधनेद्वारे शरीरातील मूलाधारचक्रात सुप्त असलेल्या मकुंडलिनी शक्तीलाफ जागृत करून सहस्रारचक्रातील शिवाशी मिलन घडवून आणण्याची साधना. या सगळ्या वेगवेगळ्या प्रवाहांचं अंतिम ध्येय जगन्माता आद्यशक्तीची भक्ती करत मोक्ष मिळवण्याचा प्रयत्न करणं हेच आहे तसंच या सगळ्याचा प्रथम आणि मुख्य स्रोतही एकच आहे. देवीविषयीची अन्योन्य श्रद्धा, निष्ठा आणि भक्तीचा पहिलावहिला अध्वर्यु म्हणून या ऋषींचा उदोकार करायलाच हवा. यज्ञ संस्कृतीच्या उद्भवकाळात कधीतरी कत नावाच्या एका तपस्वी ऋषींच्या पुत्राचं नाव होतं कात्य! त्यांच्या वंशात जन्मले देवीचे महान भक्त महर्षी कात्यायन. देवी तत्त्वाविषयीची विशेष आस्था त्यांच्या तपश्चर्येत पुरेपूर विरघळली आणि त्यातूनच त्यांनी देवीला मागितलेलं वरदान फलद्रूप झालं. विंध्याचल पर्वताच्या परिसरात अन्न-पाण्याचा त्याग करत केलेल्या त्यांच्या कठोर तपःसाधनेनं प्रसन्न होत ज्यावेळी साक्षात जगदंबा त्यांच्या समोर प्रकटली. मी तुमचं काय इष्ट करू ऋषिवर, असा प्रश्न तिनं केला. त्या प्रश्नाचं कात्यायनांनी दिलेलं उत्तर ऐकून आपल्या संस्कृती कोणत्या तात्त्विक विचारांच्या पायव्यावर उभी आहे, याची जाणीव होते. मानवी जीवनात पुरुष आणि स्त्री या दोघातल्या नात्यांचे विविध प्रकार अस्तित्वात आहेत. त्यातलं दोन नाती अतिशय पवित्र आहेत एक माता आणि पुत्राचं आणि दुसरं पिता आणि पुत्रीचं. कात्यायन महर्षी नेमकं दुसरं नातं निवड आणि देवीला म्हणतात तू माझी आत्मजा म्हणजे पुत्री होऊन ये, मला पिता म्हणून तुझं लालन पालन करण्याची संधी दे.

जगदंबेने त्यांची इच्छा पूर्ण केली; ती अशी- ब्रह्मदेवानं महिषासुराला अमरत्वाचं वरदान देण्यास नकार दिला तर त्याऐवजी त्यानं त्याचा मृत्यू कोणताही देव, दानव किंवा मानवी पुरुष करू शकणार नाही, तर केवळ एका स्त्रीच्या हातूनच त्याचा वध होईल, असा वर मिळवला. पुढे उन्मत्त होत त्यानं तिन्ही लोकांतील प्रजेवर अत्याचार सुरू केले. अखेर सर्व देवतांच्या क्रोधातून आणि तेजातून एक दिव्य शक्ती प्रकट झाली. भाद्रपद कृष्ण चतुर्दशीच्या दिवशी महर्षी कात्यायनांच्याच आश्रमात देवीने कन्यारूपात अवतार घेतला, तीच ही कात्यायनी! आश्विन शुक्ल सप्तमी अष्टमी आणि नवमी या तीन दिवसांत महर्षी कात्यायनांनी तिची यथासांग पूजा केली आणि दशमीच्या दिवशी देवी कात्यायनीनं महिषासुराचा वध केला. त्यामुळे महिषासुरमर्दिनी हे विशेष नाम तिला या युद्ध प्रसंगामुळे मिळालं. कात्यायनीचे पिता एवढ्यापुरतीच त्यांची ओळख मर्यादित नाही. अत्यंत ज्ञानी आणि तीक्ष्ण कुशाग्र बुद्धिमत्तेच्या सामर्थ्यावर त्यांनी वैदिक वाङ्मयविषयी अतिशय महत्त्वाचं आणि पायाभूत योगदान केलं. वेदांचं रक्षण, यज्ञसंस्कृतीचं नियमन आणि त्यासाठी आवश्यक असलेल्या गणिताचा पाया भक्कम करण्याचं कार्यदेखील त्यांचंच. शुक्ल यजुर्वेदाची संहिता शुद्ध करून तिची संरचना व्यवस्थित करण्यात, तिचं जतन आणि संवर्धनाची धुरा त्यांनी सांभाळली. प्रत्यक्ष वैदिक ऋचा किंवा सूक्त न रचता कात्यायन महर्षींनी ऋग्वेदाचं तंतोतंत जतन करण्यासाठीची व्यवस्था निर्माण केली. मौखिक परंपरेनं एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सोपवला जाणारा ऋग्वेद कोणत्याही प्रकारे दूषित होऊ नये म्हणून महर्षी कात्यायनांनी सर्वानुक्रमणी हा अत्यंत पद्धतशीर ग्रंथ लिहिला. या ग्रंथात त्यांनी ऋग्वेदातील प्रत्येक सूक्ताचे ऋषी कोण, त्याची देवता कोणती आणि त्यात कोणता छंद वापरला आहे याची अचूक नोंद केली. त्यांनी ऋग्वेदात समाविष्ट असलेल्या एकूण १०,६६२ ऋचा, त्यांचे १,५३,८२६ शब्द आणि त्या शब्दांचे ४,३२,००० अक्षरांची अचूक मोजणी करून ठेवली, ज्यामुळे अनेक सहस्रकांपासून वेद मूळ रूपात सुरक्षित आहेत. सोबतच शुक्ल यजुर्वेदात समाविष्ट करण्या आलेल्या यज्ञांचे नियम सोपे आणि सुटसुटीत करण्यासाठी कात्यायन श्रौतसूत्र हा ग्रंथराज त्यांनी रचला. सोबतच यज्ञवेदी अचूक आकाराच्या बनवण्यासाठी त्यांनी भूमिती समजावून सांगणारे कात्यायन शुल्बसूत्र हा भूमितीय ग्रंथ रचला तसंच माणसानं वैदिक परंपरेनुसार जीवनात पाळायचे नियम, सोळा संस्कारांचे नियम सांगणारा कात्यायन गृह्यसूत्र हा ग्रंथ आणि प्राचीन भारतीय न्यायव्यवस्थेला वैचारिक प्रगल्भता देणारा कात्यायन स्मृती हे दोन महत्त्वाचे ग्रंथ रचले. विशेषतः वैदिक परंपरेत स्त्रीधन आणि मानवी हक्कांवर त्यांनी अत्यंत पुरोगामी विचार मांडलेले आढळतात. त्यांची ही आठवकथा.

बोली आणि संस्कृती
प्रा. अजय देशपांडे

# कुरुंदाचं जातं, रखुमाई बुक्का दळी...



लोकसाहित्य म्हणजे लोकांचे साहित्य, प्रत्यक्ष जगण्यातून उगवलेले साहित्य, समूहाच्या प्रतिभेतून प्रस्फुटित झालेले साहित्य. डॉ. अरुणा ढेरे लिहितात, लोकवाङ्मय हे कुणा पंडिताचे नाही, तत्त्वचिंतकाचे नाही, विद्वानाचे नाही. ते सामान्य माणसाचे आहे. जो साधाभोळा आहे, पण अतिशय जिवंत आणि चळवळ्या आहे. ज्याच्याजववळ एक उपजत शहाणपण आहे, ज्याचा माणुसकीवर माणसाने मानलेल्या मूल्यांवर विश्वास आहे आणि नैसर्गिक जगण्यासाठी लागणारा सगळा गोड चिवटपणा ज्याच्या अंगी आहे, असा माणूस लोकवाङ्मयाचा निर्माता आहे. (आठवणींतले आंगण पृष्ठ ११५). लोकसंस्कृती आणि लोकसाहित्याने विठ्ठलाचे देवत्व कायम ठेवून त्याला माणूस म्हणून आपल्या जगण्यात सामील करून घेतले आहे. लोकगीतांमध्ये, लोककथांमध्ये तळपातळीवरील माणसांच्या जगण्याशी एकरूप झालेल्या विठ्ठल-रखुमाई, राम-सीता, शंकर-पार्वती, राधा-कृष्ण यांचे उल्लेख आहेत. विठ्ठल- रखुमाई-जनाबाई ही सारी मंडळी लोकगीतांतून मात्र माणूस म्हणून भेटतात.

लोकप्रतिभेने विठ्ठल आणि रुक्मिणी यांचा सारा कारभार लोकभाषेत चालत असल्याचे अनेक लोकगीतांतून, लोककथांतून वर्णिलेले आहे. विठ्ठल-रुक्मिणी यांचे दैनंदिन जीवन आपल्यासारखेच आहे, वेगळे नाही. मुळात लोकदेव असणारा विठोबा तळपातळीवरील दुःखभोगी माणसांच्या दैनंदिन जगण्यात त्यांच्यासारख्याच वावरत असतो. वारकर्यांना रुक्मिणी आणि विठोबाचे पंढरपूर दुरून काळेनिळे दिसते. काळ्यासावळ्या विठोबाचे पंढरपूर काळा बुक्का उधळल्यामुळे काळेनिळे दिसते, असे वर्णन लोकप्रतिभेने केले आहे.

**कुरुंदाचे जाते म्हणजे काय?** कुरुंद नावाचा कठीण दगड असतो. या दगडाचे जाते, पाटे, वरवंटे तयार करीत असत. कुरुंद सहज झिजत नाही म्हणून या दगडाचे पाटे- वरवंटे तयार करतात. आपल्या महाराष्ट्रातील काही भागात मकुरुंद लागणे असा वाक्प्रचार आहे. डोळ्यातील पांढऱ्या भागावर लाल जांभळा ठिपका येतो, त्यामुळे दृष्टिदोष निर्माण होत नाही; पण तो ठिपका जात नाही. या ठिपक्याला मकुरुंद लागणेफ असे म्हणतात. महाराष्ट्रात कुरुंदवाड नावाचे गाव आहे. या गावी कृष्णा-पंचगंगा संगमावर असलेल्या शिवमंदिरात प्रसूतीची दृश्ये असणारा शिलपट्ट आहे.

मुळात कुरुंद नावाचा दगड असणारे गाव असा कुरुंदवाडचा अर्थ असू शकतो. या ओवीत कुरुंद नावाच्या दगडाचे जाते असा उल्लेख आहे. कुरुंदाच्या जात्यावर रुकमाई बुक्का दळत आहे. तिच्या हाताला गट्टे पडले तेव्हा खुद्द विठ्ठल बुक्का दळू लागला. त्याच्या मजबूत हातातली कंकणे रुमझुम वाजू लागली. पंढरपूर ही विठ्ठलाची नगरी आहे. बुक्का असो की अन्य काहीही दळायचे असो, किमान सव्वा लाख माठ भरतील एवढे दळावेच लागते. एवढे मोठे दळण दळताना आणि कुरुंदाचे दणकट जाते फिरवताना कधी खूप थकवा येतो तर कधी अक्षरशः समाधी लागते आणि डोळ्यांसमोर साक्षात विठ्ठल दिसतो. प्रत्येकाची देखभाल करण्यासाठी ती तत्पर असते. रुक्मिणीचे हे रूप लोकमातेचे आहे. ती पंढरपूरची कारभारीण आहे. कधी वारकऱ्यांची व्यवस्था करताना विठ्ठलाकडे तिचे थोडे दुर्लक्ष होते. एका लोकगीतांतून विठ्ठल-रुक्मिणी यांच्या सहजीवनातील लगबग अभिव्यक्त झाली आहे.

**विठ्ठल देव बोले, दे गं रुक्मिणी धोतर**
**दिंडी आली ज्ञानोबाची, त्याला जातो मी सामोरं**
**विठ्ठल देव बोले नीस रुक्मिणी गहू-डाळ**
**साधूंची आली दिंडी, ऐंशी पखवाज, नऊशे टाळ**
**विठ्ठल देव बोले, काढ रुक्मिणी झाडून**
**प्रीतीचे वारकरी आले संसार सोडून**

विठ्ठल-रुक्मिणीचा हा संवाद सर्वसाधारण माणसांच्या कुटुंबातील संवादासारखाच आहे. लोकवाणीने विठोबा, ज्ञानोबा, तुकोबा ही भावस्पर्शी शब्दरूपे घडवली आहेत. या शब्दांच्या पुढे ममाउलीफ हा शब्द येतो. विठ्ठल तर विठू माउली, विठोबा माउली आहे. साक्षात विठ्ठलदेखील ज्ञानोबा असा उल्लेख करतो.

ज्ञानोबा माउलीची दिंडी पंढरीपूरच्या वेशीवर आली आहे. ज्ञानोबा माउलीसह सर्व वारकर्यांचे स्वागत करण्यासाठी विठोबाला जायचे आहे म्हणून लगबगीने मदे गं रुक्मिणी धोतर दिंडी आली ज्ञानोबाची, त्याला जातो मी सामोरं म हे शब्द त्याच्या ओठावर येतात. ऐंशी पखवाज, नऊशे टाळ असणार्या दिंडीसाठी स्वयंपाक करावा लागणार आहे म्हणून विठोबा म्हणतो, मविठ्ठल देव बोले नीस रुक्मिणी गहू- डाळ. पंढरपुरात वारकऱ्यांची खाण्याची, राहण्याची सोय विठोबा- रखुमाई करतात, ही कल्पना लोकप्रतिभेतूनच अंकुरित होऊ शकते. या ओळीत नीस हा शब्द आला आहे. निसणे म्हणजे निवडणे होय. गहू आणि डाळ निसणे म्हणजे त्यातील खडे-माती वगैरे काढून टाकणे, गहू निसणे म्हणजे दळण्यायोग्य करणे, दाळ निसणे म्हणजे वरणासाठी योग्य करणे होय. प्रीतीचे वारकरी आले संसार सोडून म्हणून त्यांची देखभाल विठोबा-रखुमाई करतात. रुक्मिणी पंढरपुरात वारकऱ्यांसाठी आंगण आखर सारी जागा झाडून स्वच्छ करते. लोकप्रतिभेने दळणारी निवडण-पाखडण करणारी सारवणारी, झाडणारी, सडा टाकणारी रखुमाई साकारली आहे.

पंढरपुरात वारकरी पंगतीने जेवतात. रुक्मिणी सतत वाढत राहते. सातव्या पंगतीला रुक्मिणी वाढते शेंगभेंडी पंचामृत लावा तोंडी अशी ओळ एका लोकगीतात आहे. तर, आणखी एका लोकगीतात फारच रंजक वर्णन आहे. पंढरपुरात वारकऱ्यांची खाण्याची व्यवस्था करताना विठोबाला जनाबाईंची आठवण आली. म्हणून जेवण करताना विठोबाने जनाबाईंसाठी लाडू काढून ठेवले. तेव्हा रुक्मिणीचे लक्ष गेले.

**देव जेवल्यात, लाडू ठेवती शेल्याआड**
**रखुमाई बोले, मदेवा जनीचं किती येड!**

जनाबाईला नेऊन देण्यासाठी शेल्यात लाडू लपवणाऱ्या विठुरायाला रुक्मिणी म्हणते, देवा जनाबाईचे तुला किती वेड आहे! ती आली नाही म्हणून तिच्यासाठी तू स्वतः लाडू नेत आहेस! रुक्मिणी आणि जनाबाई यांचे नाते गमतीदार आहे. जनाबाईंना या ना त्या प्रकारे विठ्ठल मदत करीत राहतो.

**आषाढीला मी नाही गेले, कार्तिकीला गं जाईन।**
**देव पंढरीचा गं विठू, विटे उभा मी पाहीन ।।**
**गोपाळपुरा जाया, जनाईला गं झालं ऊन।**
**देवा या विठ्ठलानं, यानं लाविलं गं चिंचबन ।।**

आषाढीला जाणे शक्य झाले नाही म्हणून कार्तिकीला पंढरपुरास जाणारी जनाबाई आणि तिची वाट पाहणारा विठोबा काही लोकगीतांतून भेटतो. पंढरपूरच्या रस्त्यावर विठोबाने चिंचबन तयार केले. उन्हात जनाबाईंचे पाय जळू नये म्हणून चिंचांची मोठी झाडे पंढरीच्या वाटेवर सावली धरून उभी आहेत. या गीतातील ही वाटेवरच्या सावल्यांची सुंदर कल्पना लोकप्रतिभेतूनच अंकुरित झाली आहे.

विठ्ठल आणि रखुमाई यांच्याशी बोलण्यासाठी लोकभाषेचा स्वीकार केला आहे. महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीशी नाते ठेवणारा आणि लोकदेव असणारा विठ्ठल लोकवाणीतूनच अधिक उत्तम साकारला आहे.

# अवकाशातील भारताची ‘जागरूक नजर’

**अवकाश जिंकण्याची स्पर्धा सुरू झाली, तेव्हा त्यामागे महासत्तांच्या प्रतिष्ठेचा प्रश्न होता. आज अवकाशाकडे पाहण्याची दृष्टी बदलली. आज उपग्रहांतून माणसाला काय मिळणार? हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो आहे. आज भारतीय अवकाश क्षेत्राचा परीघही विस्तारताना दिसतो. भारताने अलीकडेच प्रक्षेपित केलेया ‘ईओएस-०५’ उपग्रहाच्या पार्श्वभूमीवर या प्रगतीचा आढावा घेणारा हा लेख...**

वेधक
डॉ. दीपक शिकारपूर



अवकाश जिंकण्याची स्पर्धा सुरू झाली, तेव्हा त्यामागे महासत्तांच्या प्रतिष्ठेचा प्रश्न होता. आज अवकाशाकडे पाहण्याची दृष्टी बदलली. आज उपग्रहांतून माणसाला काय मिळणार? हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो आहे. आज भारतीय अवकाश क्षेत्राचा परीघही विस्तारताना दिसतो. भारताने अलीकडेच प्रक्षेपित केलेया ‘ईओएस-०५’ उपग्रहाच्या पार्श्वभूमीवर या प्रगतीचा आढावा घेणारा हा लेख...

एखाद्या गावाला पुराचा वेढा पडत असताना प्रशासनाला परिस्थितीतील बदल लवकर समजले, तर किती जीव वाचू शकतील? पिकांच्या स्थितीतील बदल वेळेत लक्षात आले, तर शेतकर्याला किती मदत होईल? जंगलातील हानी, जलसाठ्यांचे बदलते स्वरूप आणि किनारपट्टीवरील संकटे मोठ्या प्रदेशाच्या संदर्भात आधीच समजली, तर निर्णय किती सुधारतील? अवकाश संशोधनाचा खरा अर्थ अशाच प्रश्नांत दडलेला आहे. रॉकेट आकाशाकडे झेपावते; पण त्याच्या यशाचे मोजमाप जमिनीवरील माणसाच्या आयुष्यात झाले पाहिजे. भारताचा ‘ईओएस-०५’ उपग्रह याच दृष्टीने महत्त्वाचाच. दि. ४ सप्टेंबर रोजी पहाटे २.५५ वाजता श्रीहरिकोटा येथून, ‘जीएसएलव्ही-एफ१७’ प्रक्षेपकाद्वारे ‘ईओएस-०५’चे यशस्वी प्रक्षेपण झाले. सुमारे २ हजार ३६७ किलोग्रॅम वजनाच्या या उपग्रहाला, प्रथम संक्रमण कक्षेत सोडण्यात आले. त्यानंतर स्वतःच्या प्रणोदन यंत्रणेच्या साहाय्याने, त्याची कक्षा उंचावण्यात आली. ‘इस्रो’ने दि. ७ सप्टेंबर रोजी अंतिम कक्षावर्धन प्रक्रिया यशस्वी झाल्याचे आणि उपग्रहाची स्थिती सामान्य असल्याचे जाहीर केले. म्हणजे, प्रक्षेपण आणि अपेक्षित उंचीपर्यंत पोहोचणे हे वेगवेगळे, महत्त्वाचे टप्पे आहेत. पूर्वी ‘गिसॅट-१ए’ म्हणून ओळखल्या गेलेल्या या मोहिमेभोवती, ‘अवकाशातील सीसीटीव्ही’ आणि ‘भारताची गरुडदृष्टी’ अशी आकर्षक बिरुदे चर्चेत आली, ती लक्षवेधक अशीच. मात्र, तंत्रज्ञान समजून घेताना, उपमा आणि वास्तविक क्षमतेतील अंतर लक्षात ठेवावे लागते. ‘इस्रो’ने ‘ईओएस-०५’चे वर्णन, ‘भू-समकालिक कक्षेतून प्रतिमांकन करणारा भारताचा पहिला उपग्रह’ असे केले आहे. येथे विशेषत्व समर्पित भू-प्रतिमांकन क्षमतेचे आहे. भारताचे ‘इन्सॅट’सारखे हवामान उपग्रह, यापूर्वीपासून पृथ्वीची प्रतिमा आणि हवामानविषयक माहिती देत आहेत.

यातील कक्षेची संकल्पना सोप्या उदाहरणाने समजून घेऊया. रस्त्यावरून फिरणारा निरीक्षक वेगवेगळ्या ठिकाणांची जवळून पाहणी करू शकतो; उंच मनोर्यावरील निरीक्षकाला मात्र एकाचवेळी मोठा परिसर दिसतो. पृथ्वीजवळील अनेक निरीक्षण उपग्रह आणि भू-समकालिक उपग्रहांच्या भूमिकांतील फरक काहीसा असाच आहे. दोन्ही प्रकारचे निरीक्षण एकत्र आल्यावर चित्र अधिक अर्थपूर्ण होते. भू-समकालिक कक्षेतील उपग्रहाचा पृथ्वीभोवतीचा प्रदक्षिणाकाल, पृथ्वीच्या स्वतःभोवती फिरण्याच्या कालावधीशी जुळतो. ही कक्षा विषुववृत्ताच्या प्रतलात आणि वतुर्ळाकार असेल, तर ती भूस्थिर ठरते; उपग्रह जमिनीवरील निरीक्षकाला जवळजवळ एकाच जागी दिसतो. आदर्श भूस्थिर कक्षेची उंची सुमारे ३५ हजार ७८६ किमी असते. त्यामुळे ‘भू-समकालिक’ आणि ‘भूस्थिर’ हे शब्द सरसकट एकाच अर्थाने वापरणे अचूक नाही. या कक्षीय व्यवस्थेचा उपयोग, ठरावीक मोठ्या प्रदेशाकडेच वारंवार नजर ठेवण्यासाठी होतो. याच वारंवार निरीक्षणात ‘ईओएस-०५’सारख्या मोहिमेचे महत्त्व आहे. एखादी प्रतिमा परिस्थिती त्या क्षणी कशी आहे हे सांगते; वेगवेगळ्या वेळी घेतलेल्या प्रतिमांच्या मालिकेतून परिस्थिती कोणत्या दिशेने बदलत आहे, हे समजण्यास मदत होते. आपत्ती व्यवस्थापनात ही बाब विशेष महत्त्वाचीच. मात्र, ‘सतत नजर’ म्हणजे, प्रत्येक ठिकाणाचे अखंड थेट व्हिडिओ प्रसारण नव्हे! प्रतिमा घेण्याचे नियोजन, संवेदकांची क्षमता, माहिती पृथ्वीवर पोहोचवण्याचा वेळ आणि विश्लेषण यांवरच प्रत्यक्ष सेवा अवलंबून असते.

पृथ्वी निरीक्षण म्हणजे, केवळ सुंदर छायाचित्रे गोळा करणेही नव्हे. प्रतिमांतील रंग, उजेड, आकार आणि काळानुसार होणारे बदलांचे, वैज्ञानिक विश्लेषण केले जाते. विविध तरंगलांबींतील निरीक्षणामुळे, मानवी डोळ्यांना सहज न जाणवणारे फरक अभ्यासता येतात. मात्र, प्रतिमेत दिसणारा बदल, म्हणजे त्याचे कारण निश्चित समजले, असे होत नाही. जमिनीवरील मोजमाप, स्थानिक माहिती आणि तज्ज्ञांची पडताळणी आवश्यक असते. उपग्रहातून मिळालेली माहिती हा निर्णयाचा महत्त्वाचा आधार आहे; ती स्वतंत्रपणे अंतिम निर्णय नाही.

कृत्रिम बुद्धिमत्ता या प्रक्रियेला नक्कीच गती देऊ शकते. मोठ्या प्रमाणातील प्रतिमांची तुलना, असामान्य बदलांची प्राथमिक छाननी आणि तज्ज्ञांनी तपासावयाच्या भागांना प्राधान्य देणे, अशी कामे विकसित करता येतील. मात्र, संगणकाने दाखवलेला प्रत्येक बदल वास्तविक संकट असेलच, असे नाही. ढगांची सावली, हंगामी बदल किंवा प्रतिमांतील तांत्रिक फरकांमुळे, चुकीचे निष्कर्ष निघूही शकतात. त्यामुळे मानवी पडताळणी, निष्कर्षातील अनिश्चिततेची स्पष्ट नोंद आणि स्थानिक माहितीशी तुलना हा वापराचा आवश्यक भाग असला पाहिजे. मराठीसह भारतीय भाषांतील संवाद ही पुढची गरज आहे. शेतकरी, मच्छीमार, ग्रामसेवक किंवा स्थानिक आपत्ती स्वयंसेवकाला वैज्ञानिक संज्ञांची परीक्षा द्यायची नसते; योग्य वेळी काय करायचे, हे समजून घ्यायचे असते. यासाठी मोबाईल संदेश, आवाजातील सूचना, स्थानिक रेडिओ आणि ग्रामपातळीवरील संपर्काची सांगड घालावी लागेल. इंटरनेट वापरत नसलेल्या नागरिकांपर्यंतही संदेश पोहोचण्याची व्यवस्था हवी. तंत्रज्ञानाचा लाभ काही तज्ज्ञांपुरता सीमित राहू नये, यासाठी माहितीच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत पोहोचण्यावर गुंतवणूक करणे आवश्यक आहे.

तरुणांसाठी या क्षेत्राचा आणखी एक अर्थ म्हणजे, नव्या प्रकारचे काम. भूगोल, संगणकशास्त्र, कृषी, पर्यावरण, सांख्यिकी आणि नागरी अभियांत्रिकी, यांची सांगड घालणार्या प्रकल्पांना महत्त्व मिळू शकते. विद्यार्थ्यांनी उपलब्ध सार्वजनिक उपग्रह माहिती वापरून, आपल्या जिल्ह्यातील जलक्षेत्रे, शेती किंवा जमीनवापराचे छोटे अभ्यास करावेत. स्थानिक प्रश्न समजून घेणे, योग्य माहिती निवडणे आणि निष्कर्ष प्रामाणिकपणे मांडणे, ही कौशल्ये विकसित करावीत. रोजगाराची हमी एका उपग्रहातून मिळत नाही; पण समस्यांवर काम करण्यासाठी नवे साधन नक्की उपलब्ध होते. या मोहिमेकडे पाहताना, अपयशातून शिकण्याची वैज्ञानिक वृत्तीही लक्षात घ्यायला हवी. ‘इस्रो’च्या नोंदीनुसार, २०२१ मधील ‘ईओएस-०३’चे प्रक्षेपण अयशस्वी झाले होते. त्यानंतरही अशा क्षमतेच्या विकासासाठी प्रयत्न सुरू राहिले, हे महत्त्वाचे. विद्यार्थ्यांसाठी यात मोठाच संदेश आहे. एखादा प्रयोग फसणे, म्हणजे कल्पना निरुपयोगी ठरणे नव्हे. त्रुटी समजून घेणे, रचना सुधारणे आणि पुन्हा कसून पडताळणी करणे, या प्रक्रियेतूनच विश्वासार्ह तंत्रज्ञान घडते.

‘ईओएस-०५’ची खरी परीक्षा, आता त्यातून निर्माण होणार्या उपयोगी ज्ञानात असेल. संकटाची सूचना वेळेत मिळालेला नागरिक, अधिक माहितीच्या आधारावर निर्णय घेणारा अधिकारी आणि परिसराचा अभ्यास करणारा विद्यार्थी हेच या प्रवासाचे केंद्र असले पाहिजेत. अवकाशातील प्रगतीला जमिनीवरील परिणामांची जोड मिळाली, तरच तिचे सामाजिक मूल्य वाढेल. भारताची गरुडदृष्टी किती दूर पाहते, याइतकेच ती किती लोकांचे आयुष्य अधिक सुरक्षित आणि सक्षम करते, हेही महत्त्वाचे आहे. आकाशात उभारलेली ही क्षमता प्रत्येक भारतीयाच्या उद्याला उजाळा देणारी ठरो! (लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

# ग्रहसंकेत

**(रविवार, २५ आक्टोबर ते शनिवार, ३१ आक्टोबर २०२६)**

नारायण जगन्नाथ कारंजकर,ज्योतिष भास्कर, ज्येष्ठ पत्रकार
'शिवकृपा' फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो. कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र.९४२३७५८४०१)

✻ **रविवार, २५ आक्टोबर-** कोजागरी पौर्णिमा, शरद पौर्णिमा, कुलधर्म, आकाश दीपदान, आग्रयण, श्री लक्ष्मी-इंद्र पूजा ✻ **सोमवार, २६ आक्टोबर-** कार्तिक स्नानारंभ, नवान्न प्राशन, ज्येष्ठ अपत्यास निरांजन ओवाळणे, महर्षी वाल्मिकी जयंती, श्री महालक्ष्मी महाप्रसाद कोल्हापूर ✻ **मंगळवार, २७ आक्टोबर-** पंत महाराज बाळेकुंद्री समाधी उत्सव प्रारंभ बेळगाव, शुक्राचे पूर्वेस दर्शन ✻ **बुधवार, २८ आक्टोबर-** महाराजा यशवंतराव होळकर पुण्यदिन ✻ **गुरुवार, २९ आक्टोबर-** संकष्ट चतुर्थी, (चंद्रोदय- मंबई- २०:५३, अहिल्यानगर- २०:४५, कलबुर्गी-२०: ४०, कोल्हापूर-२०:५३, जालना-२०:३८, धाराशिव-२०:४१, नांदेड-२०:३३, पंढरपूर-२०:४६, परभणी-२०:२६, पुणे-२०:५०, बीड-२०:४१, लातूर-२०: ३९, विजयपूर-२०: ४६, छत्रपती संभाजीनगर-२०: ४०, सातारा -२०: ५१ , सोलापूर-२०: ५३), दाशरथी चतुर्थी, करक चतुर्थी, करवा चौथ, बिरदेव यात्रा पट्टणकोडोली, वसगडे यात्रा ✻ **शुक्रवार, ३० आक्टोबर-** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी ✻ **शनिवार, ३१ आक्टोबर-** सिंहस्थ प्रारंभ, सरदार पटेल जयंती, इंदिरा गांधी स्मृतिदिन, श्री भीमदास करांडे महाराज पुण्यतिथी पंढरपूर, गुरु सिंह राशीत

**मुहूर्त :-** ✻ **साखरपुडा-** २५ (१२ पर्यंत), २६ (१८ पर्यंत), २९ ऑक्टोबर ✻ **डोहाळ जेवण -** २६ (१८ पर्यंत), २९ ऑक्टोबर (१८ नंतर) ✻ **जावळ-** २५ (१२ पर्यंत), २६ ऑक्टोबर ✻ **गृहप्रवेश-** २६, ३१ ऑक्टोबर

### मेष :- अडचणी कमी होतील

चेहऱ्यावर हसू आणि मनात समाधान असावं. सुखी जीवनासाठी हा खरा मंत्र आहे. सप्ताह अखेरीस गुरु पंचमात येणार असल्याने आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. विनाकारण फार दगदग करू नका. कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील. गुंतवणूक विचाराने करावी. स्थावर बाबतीत शुभ घटना घडतील. अडचणी कमी होतील. शुभ ता. २५, ३०

### वृषभः- सुसंधी लाभतील

आपल्या शब्दांनी कुणाची मने दुखावली जाऊ नयेत. सप्ताह अखेरीस गुरु सुखस्थानी येत आहे. शुभ कार्यात अडचणी येतील. सरकारी कामे मनासारखी होतील. कलेला सुसंधी लाभतील. चिकाटीने रहावे. प्रगती होत जाईल. नव्या विचारांना चालना देऊ शकाल. उत्साहवर्धक घटना घडतील. स्थावर प्रश्न विचाराने सोडवावे. शुभ ता. २५, २९, ३०

### मिथुनः- सौख्याच्या घटना

अंधार कितीही असला तरी, दिवा हार मानत नाही. प्रकाश देत राहतो. पंचमातील रवि- बुधामुळे आर्थिक बाबतीत अनुकूलता आहे. गुरु तिसरा होत आहे. त्यामुळे कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील. भाग्यवृद्धिंगत होईल. कार्यक्षेत्रात चिकाटीने रहावे. प्रगती होत जाईल. अपेक्षित कामे होतील. प्रगतीच्या संधी लाभतील. शुभ ता. ३०, ३१

### कर्कः- अपेक्षित घटना

आशेचा किरण कधीही सोडायचा नसतो. शोधत रहावे. सप्ताह अखेरीस गुरु धनस्थानी येत आहे. दिवाळीसाठी चांगली खरेदी करू शकाल. रेंगाळलेली कामे मार्गी लागतील. गुढ शास्त्रात प्रगती साधता येईल. सौख्यदायी घटना घडतील. प्रतिकूलतेवर मात कराल. अपेक्षित घटना घडल्याने समाधान वाटेल. शुभ ता. २५, ३०

### सिंहः- नव्या विचारांना चालना

मोठं होण्यासाठी कुणाला छोटं करू नये. पंचमेश, अष्टमेश गुरु राशीत येणार आहे. त्यामुळे सौख्याच्या घटना घडतील. योजलेली कामे होतील. नव्या संधीचे स्वागत करावे. कलागुणांचा विकास होईल. संसर्गजन्य आजारापासून सावध रहावे. अचानक नवा खर्च संभावतो. अडचणीतून मार्ग निघेल. नव्या विचारांना चालना मिळेल. शुभ ता. २५, २६

### कन्याः- पदोन्नतीचे योग

मदतीला आलेला हात जाती-धर्माचा नसतो तर माणुसकीचा असतो. गुरु बारावा होत आहे. धनस्थ ग्रहांमुळे आर्थिक बाबतीत समाधानकारक घटना घडतील. धार्मिक, सामाजिक कार्य घडतील. सरकारी नोकरीत असलेल्यांना पदोन्नतीचे योग आहेत. वैद्यकीय, संरक्षण क्षेत्रात अनुकूलता राहील. अपेक्षित कामे होतील. चिंता नको. शुभ ता. २५

### तुला:- चांगल्या संधी लाभतील

आजचं नातं, आजचा क्षण मनापासून जगा. लाभस्थानी येणारा गुरु आर्थिक बाबतीत प्रगतीचा आहे. नव्या कामाला गती मिळेल. आत्मविश्वास वाढेल. कार्यक्षेत्रात चांगल्या संधी लाभतील. कौटुंबिक जीवनात सौख्य लाभेल. उत्साहवर्धक घटना घडतील. अडचणींवर मात कराल. अनुकूलता वाढत जाईल. योजलेली कामे होतील. शुभ ता. २५, ३१

### वृश्चिकः- अनावश्यक खर्च टाळावा

चांगली वेळ पाहूनच लोक आपल्यासमोर असतात. तेही गरजेपोटी. धनेश, पंचमेश गुरु कर्मस्थानी येत आहे. त्यामुळे कार्यक्षेत्राबाबत शुभ घटना घडतील. सरकारी कामे विचारपूर्वक करावीत. अनावश्यक खर्च टाळावा. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. शिक्षण अनुभवातून प्रगती साधता येईल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. शुभ ता. २५, ३०

### धनुः- आर्थिक सुधारणा

प्रत्येक वेळी आपणच बरोबर असतो असं नाही, राशी स्वामी गुरु भाग्यस्थानी येत आहे. अनुकूलता वाढेल. शारीरिक तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. नवीन कामे विचारपूर्वक करावी. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. संतती संबंधात शुभ घटना घडतील. नव्या संधीचे स्वागत करावे. जुने येणे वसूल होईल. प्रतिकूलतेतून मार्ग निघेल. अपेक्षित कामे होतील. शुभ ता. २५, ३१

### मकरः- प्रवास घडतील

समजूसदारपणा जीवनात सर्वात महत्त्वाचा असतो. कर्मस्थ रवि- बुध, शुक्रामुळे कार्यक्षेत्रात अनुकूलता वाढेल. गुरु आठवा होणार आहे. त्यामुळे थोडी धन चिंता राहणार आहे. दूरचे प्रवास घडतील. नव्या संधी विचारपूर्वक स्वीकाराव्यात. खाद्यपदार्थ वस्त्र प्रावरणे अशा व्यवसायात अनुकूलता राहील. शुभ ता. ३०

### कुंभः- ओळखी पारखून घ्या

हसरा चेहरा आणि शांत मन हीच खरी संपत्ती आहे. राशीसमोर गुरु येत आहे. त्यामुळे वावटळीतही दिवा लावू शकाल. स्पर्धांमध्ये यश मिळवू शकाल. योजलेली कामे विलंबाने पण यशस्वी होतील. अडचणीतून मार्ग काढावा लागेल. आर्थिक व्यवहार विचारपूर्वक करावेत. नवीन ओळखी पारखून घ्या. त्रास संभवतो. शुभ ता. २५, ३०

### मीनः- जोखीम पत्करू नका

पैशाची कदर करा, पैसा तुमची कदर करेल. राशी स्वामी गुरु षष्ठात केतूवर येत आहे. सध्या सहकार्य नाही. त्यामुळे फार जोखीम पत्करू नका. महत्त्वाची कामे याच आठवड्यात करून घ्यावीत. दैवीकृपेने अडचणीतून मार्ग निघत जाईल. नव्या योजना सध्या लांबणीवर टाकाव्यात. चिकाटीने रहावे मार्ग निघेल. शुभ ता. २५, ३१

!!शुभ भवतु !!

**न्याय अथवा न्यायशास्त्र याची बैठक ही तत्त्वज्ञानापेक्षा तर्कशास्त्रावरच प्रामुख्याने आहे असे वाटते. न्यायशास्त्री हे पदार्थांपदार्थांत कार्यकारणभाव पाहतात आणि शुद्ध तार्किक ज्ञानाच्या साहाय्याने ते निर्णय बांधतात. हे निर्णय करण्याचे १६ अंगे आहेत. न्यायशास्त्राची सुरुवातच ही १६ अंगे सांगण्याने झाली आहे. त्यांनाच न्यायशास्त्रवाद्यांचे षोड शपदार्थ म्हणतात. त्यात प्रमाण, प्रमेय , संशय, प्रयोजन, दृष्टांत, सिद्धांत, अवयव, तर्क, निर्णय, वाद, जल्प, वितंडा, हेत्वाभास, छल, जाती आणि निग्रहस्थान इत्यादींचा अंतर्भाव होतो. या पदार्थांचे तत्त्वज्ञान झाल्याने निःश्रेयस म्हणजेच मोक्ष प्राप्त होतो, असे तेथे म्हटले आहे.**

तत्त्वदर्शन

डॉ. राजेंद्र डोळके

# ज्ञानशास्त्र



न्यायशास्त्रा'त ज्ञानाला विलक्षण महत्त्व आहे. न्यायशास्त्राचा संपूर्ण डोलारा हा 'ज्ञाना' वरच उभा झाला आहे. ज्ञानाचे खरे- खोटे पण ठरविणे हे विलक्षण कठीण काम असते. तर्क किंवा कोणत्याही इतर प्रमाणाद्वारे मिळविलेले ज्ञान खरे आहे की खोटे, हे प्रत्यक्ष अनुभवावरूनच ठरवावयाचे असते. पण प्रत्यक्ष अनुभव सुद्धा प्रत्येक वेळी खराच असतो असे नाही; आणि असे झाले, म्हणजे अनुभवच संशयास्पद ठरला, तर सर्वच ज्ञान डळमळीत पायावर आधारल्यासारखे होईल. त्यामुळे न्यायदर्शनात ज्ञानाच्या खरेखोटेपणाला विलक्षण महत्त्व देण्यात आले आहे. म्हणून ज्ञानाच्या स्वरूपाबद्दल थोडे जाणून घेणे आवश्यक ठरते.

वस्तुतः ज्ञान म्हणजे काय हे कोणाला सांगण्याची गरज नाही. प्रत्येकालाच त्याचा अर्थ चट्कन प्रतीत होतो. ज्याप्रमाणे डोळस माणसाला प्रकाश म्हणजे काय हे समजावून द्यावे लागत नाही त्याचप्रमाणे व्यवहारात वावरणाऱ्या मनुष्याला ज्ञान म्हणजे काय हे समजावून देण्याची आवश्यकता नाही. ज्ञानाशिवाय कोणताही व्यवहार होणे शक्य नाही. एक क्षण ज्ञानाशिवाय अशक्य आहे. ज्ञान म्हणजे 'पूर्ण जाणून घेणे'. ज्ञान यातील 'ज्ञा' हा जो मूळ धातू त्याचा अर्थ जाणणे असा आहे. सर्व काही सर्वार्थांनी जाणणे असा याचा अर्थ आहे. वस्तूवस्तूचे स्व-स्वरूप संपूर्णपणे जाणून घेणे; त्याचे दर्शन ते दिसल्याबरोबर त्याच्या सर्व गुण- धर्मासहित प्रतीत होणे म्हणजे ज्ञान. घोडा पाहिल्यावर 'घोडा हा प्राणी पाहिला' हे तर खरेच असते. परंतु थोडा सूक्ष्म विचार केल्यास घोड्याबरोबर घोड्याचे 'घोडेपण' अथवा 'अश्वत्व' हेही त्याच वेळी आपल्या प्रत्ययास येते, हे मान्य करावे लागेल. म्हणजेच वस्तूचे अथवा पदार्थाचे त्याच्या गुण-धर्म-स्वभावासहित संपूर्ण माहिती होणे म्हणजे ज्ञान.

न्यायदर्शनानुसार ज्ञान हे दोन प्रकारचे असते. अनुभव आणि स्मृती. एकदा अनुभवलेल्या गोष्टीची पुन्हा आठवण होते ती स्मृती. स्मृती ही अनुभवजन्य संस्काराने उत्पन्न होत असल्यामुळे जसा अनुभव तशी स्मृती असते. अनुभूत पदार्थ नष्ट झाल्यानंतर त्याचे भावनारूप संस्कार हृदयात कायम असतात. म्हणजेच स्मृती कायम असते. याचे कारण आपल्याला आलेले अनुभव हे स्मृतिकोषात साठविलेले असतात. स्मृतीला प्रामाण्य किंवा अप्रामाण्य, यथार्थत्व किंवा यथार्थत्व हे अनुभव जसे असतात त्याप्रमाणे प्राप्त होते. 'अनुभव' हा लौकिक गुरुपेक्षाही मोठा आणि सर्वश्रेष्ठ गुरू असतो. गुरूकडून जी संक्रमित केली जाते त्याला सामान्यतः 'विद्या' असे म्हटले जाते. परंतु अनुभवातून मनुष्य जे शिकतो त्याला ज्ञान म्हणतात. अनुभवातून मिळालेले ज्ञान आणि गुरूकडून मिळालेले ज्ञान यातून निवडच करायची झाल्यास मनुष्य स्वतःच्या अनुभवांचीच निवड करतो. त्यावेळी तो गुरूकडून मिळालेल्या ज्ञानाची ही पर्वा करीत नाही. गुरूकडून मिळालेली विद्या किंवा ज्ञान हे कधी ना कधी संपण्याची शक्यता असते. परंतु अनुभव हे मनुष्यमात्राला शेवटच्या क्षणापर्यंत येत असल्यामुळे अनुभवातून ज्ञान मिळणे हे जन्मभर चालू असते.

ज्ञानाचा खजिना कितीही लुटला तरी कमी होत नाही. जगात सर्वकाही चोरले जाऊ शकते. परंतु ज्ञान ही एकच गोष्ट अशी आहे की, तिची कधीही चोरी होऊ शकत नाही. ज्ञान हे मागूनच मिळवावे लागते आणि त्यासाठी गुरूची आवश्यकता असते. म्हणूनच गुरूला ज्ञानदान करणारा असे म्हटले जाते. ज्ञान हे कधीही चोरले जाऊ शकत नसल्यामुळे त्याला इतर वस्तूंप्रमाणे कधीही किल्ली - कुलपाची आवश्यकता नसते. यामुळेच त्याला आपल्या ज्ञानाचा फार अहंकार असतो. चारचौघात त्याला आपल्या ज्ञानप्रदर्शनाची भारी हौस असते. तो आपल्या जवळचे ज्ञान दुसऱ्याला देतो खरे) परंतु ते देण्यापूर्वी त्याला ते ज्ञान नाही ही गोष्ट जाणवून देतो. म्हणजे ज्ञान हे दुसऱ्यांचा कमीपणा प्रकट करून मगच त्याला द्यावे, अशी मनुष्याची प्रवृत्ती अनुभवास येते.

अनुभव दोन गोष्टींवर अवलंबून असतो. निरीक्षण आणि प्रयोग. सृष्टीमध्ये असंख्य घटना या आपोआप होत असतात. या घटनांकडे काळजीपूर्वक लक्ष देणे म्हणजे निरीक्षण आणि त्या निरीक्षणांची सत्यता तपासून पाहणे म्हणजे प्रयोग. रॉकेलच्या डब्याला आगीचा स्पर्श झाला की त्याचा स्फोट होतो ही घटना सहज किंवा आपोआप दृष्टीस पडली की ते निरीक्षण झाले. परंतु ही घटना सर्वकाळी सत्य असते का, पडताळून पाहण्यासाठी मुद्दाम आगपेटीची काडी रॉकेलच्या डब्याला लावणे हा प्रयोग झाला. निरीक्षण किंवा प्रयोग किंवा या दोन्ही रीतीने सिद्ध झाले की त्यास अनुभव म्हणतात. अशा रीतीने अनुभव आला की ते ज्ञान जन्मभरासाठी मेंदूत कायमचे पक्के झाले. डोंगरावर दुरून झाड व माणूस एकाच आकृतीचा दिसतो. म्हणून प्रत्यक्ष त्या ठिकाणी जाऊन त्याची खात्री करून सत्य समजावून घ्यावे लागते. अशा प्रकारे ज्ञानाचे सत्यत्त्व अथवा सत्यज्ञान हे 'अनुभव' घेतल्यानंतर कळून येते. एखादी गोष्ट अनुभवसिद्ध आहे किंवा प्रत्ययास आली असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा आपल्याकडून त्याचे निश्चयात्मक ज्ञान अथवा खात्री पटवून घेतलेली असते. अशा प्रकारे झालेले ज्ञान खरोखरच यथार्थ म्हणजेच खरे आहे की नाही हे कसे निश्चित करावे? म्हणजे ज्ञान हे यथार्थ आहे हे सिद्ध होण्याची कसोटी कोणती? या प्रश्नाचे उत्तर देणाऱ्यांमध्ये दोन पक्ष दिसून येतात- स्वतः प्रामाण्यवादी व परतः प्रामाण्यवादी. ज्ञान जेव्हा उत्पन्न होते तेव्हा स्वतःच्या उत्पत्तीबरोबरच स्वतःचे यथार्थत्व व प्रामाण्य ते घेऊन येते. याचा अर्थ असा की, ज्ञानाचे प्रामाण्य सिद्ध करण्याकरिता स्वयंज्ञानच समर्थ आहे. ज्ञानाशिवाय अन्य कोणीही ज्ञानाचे प्रामाण्य सिद्ध करण्यास समर्थ नाही. या विचारसरणीला स्वतः प्रामाण्यवादी असे म्हणतात.

दुसरे परतः प्रामाण्यवादी मत असे म्हणते की, व्यावहारिक सफलता ही ज्ञानाचे प्रामाण्य किंवा यथार्थता सिद्ध करण्याची कसोटी होय. या पक्षाचे म्हणणे असे की, इंद्रिये व तर्कबुद्धी ही ज्ञान होण्याची साधने धोका देऊ शकतात. म्हणून या साधनांनी दिलेले ज्ञान सत्य की असत्य, यथार्थ की अयथार्थ हे ठरविण्याकरिता त्या ज्ञानाचा व्यावहारिक जीवनात उपयोग कायला पाहिजे. उदा. 'हे पाणी आहे' असे ज्ञान झाल्यानंतर लगेच त्या ज्ञानाला यथार्थ मानता येणार नाही. त्याकरिता ते पाणी पिऊन पाहिले पाहिजे. ते पिऊन जर आपली तहान नाहीशी झाली तरच ते ज्ञान यथार्थ म्हणून समजायला पाहिजे. म्हणजेच व्यावहारिक साफल्य ही ज्ञानाच्या प्रामाण्याची खरी कसोटी होय. ज्ञानाने इच्छा उत्पन्न होऊन प्रयत्न होतो आणि प्रयत्न सफल झाल्यास मूळच्या ज्ञानाचे प्रामाण्य निश्चित होते.

▶ पान २ वरून

# जळते कोण आणि उजळते कोण?

**रुग्ण, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांगांचे हाल-** आंदोलनात अनेक वाहने अडकलेली दिसतात. रुग्णवाहिका, डायलिसिस किंवा नियमित उपचारासाठी जाणारे रुग्ण, गर्भवती महिला, अन्य वैद्यकीय मदतीची गरज असलेल्या नागरिकांसाठी प्रत्येक मिनिट महत्त्वाचे असते. रस्ते अडवल्याने त्यांचा जीविताला धोका निर्माण होऊ शकतो. दिव्यांग व्यक्तींनाही वाहतुकीची सुविधा सहज उपलब्ध न झाल्यास त्यांचे हाल आणखी वाढतात.

**नोकरदार आणि कामगारांचे नुकसान-** रास्ता रोको किंवा बंदामुळे नोकरदार कामावर उशिरा पोहोचतात. काहींची गैरहजेरी लागते, काहींचे वेतन कापले जाते; तर रोजंदारी, कंत्राटी किंवा असंघटित क्षेत्रातील कामगारांना कामच मिळत नाही. घरगुती कामगार, मजूर, फेरीवाले, वाहनचालक आणि लहान सेवा पुरवठादारांचे हातावरचे पोट असते. त्यांच्यासाठी बंद म्हणजे अनेकदा त्या दिवसाच्या मिळकतीवर पाणी सोडल्यासारखे होते. अशा आंदोलनांमुळे सेवा देण्यासही विलंब होतो.

**विद्यार्थ्यांचे शिक्षण आणि भविष्य धोक्यात-** शाळा- महाविद्यालये बंद पडल्याने परीक्षा पुढे ढकलल्या जाणे, प्रवासात अडथळे येणे किंवा इंटरनेट सेवा खंडित होण्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणातही खंड पडतो. परीक्षेच्या, प्रवेश प्रक्रियेच्या किंवा मुलाखतीच्या दिवशी वाहतुकीसअडथळे निर्माण झाल्यास विद्यार्थ्यांचे परिश्रम वाया जाऊ शकतात. पालकांचे उत्पन्न थांबल्यास विद्यार्थ्यांच्या शिक्षणावरही त्याचा परिणाम होतो. राजकीय पक्षांकडून तरुणाईला आंदोलनात येण्याचा आग्रह करताना, नंतरच्या परिणामांची पुरेशी जाणीव करून दिली जात नाही. हिंसक कृत्यांमध्ये सहभाग, सार्वजनिक मालमत्तेची तोडफोड किंवा कायद्याच्या उल्लंघनामुळे तरुणांना कायदेशीर अडचणींचा सामना करावा लागतो. नेत्यांची राजकीय कारकीर्द सुरू राहते; परंतु गुन्ह्याची नोंद किंवा दीर्घ कायदेशीर प्रक्रिया तरुणाच्या शिक्षण, नोकरी आणि कुटुंबावर परिणाम करू शकते.

**अर्थव्यवस्था, उद्योग आणि रोजगार निर्मिती-** बंद, हिंसक आंदोलनामुळे दुकाने, बाजारपेठा, उद्योग, पर्यटन, वाहतूक आणि पुरवठा साखळीचेही नुकसान होते. माल वेळेवर पोहोचत नाही, ग्राहक बाजारात जात नाहीत आणि यामुळे व्यवसायांची उलाढाल घटते.

मोठ्या उद्योगांबरोबरच रस्त्यावरील विक्रेते, लहान उपाहारगृह, चहाच्या टपऱ्या, किराणामालाची दुकाने आणि स्थानिक वाहतुकीवरही आर्थिक भार पडतो. वारंवारच्या अस्थिरतेमुळे उद्योग आणि गुंतवणूकदारांना व्यवसायाच्या शाश्वततेबद्दल शंका निर्माण होण्याचा धोका असतो. अशी आंदोलने राज्याच्या कार्यक्षमतेविषयी नकारात्मक संदेश देणारीच ठरतात. याचा दीर्घकालीन परिणाम नवीन उद्योग, रोजगारनिर्मिती आणि तरुणांना उपलब्ध होणाऱ्या संधींवर होण्याची भीती असते.

**प्रशासन आणि करदात्यांवर वाढता भार-** मोठ्या आंदोलनांच्या वेळी पोलीस, वाहतूक नियंत्रण, अग्निशमन, वैद्यकीय मदत आणि स्थानिक प्रशासनाला अतिरिक्त कुमक तैनात करावी लागते. हा खर्च सार्वजनिक पैशांतूनच होतो. हिंसा किंवा तोडफोड झाल्यास त्याच्या दुरुस्तीचाही खर्च वाढतो. याहून गंभीर बाब म्हणजे, प्रशासनाचे विकासाच्या कामातून लक्ष विभागले जाते. आंदोलन शांततामय असले, तरी मोठी गर्दी हाताळण्यासाठी नियोजन आवश्यकच असते.

**निष्कर्ष : संघर्ष करा; पण विवेक गमावू नका!**

हिंसाचारापेक्षा विचारांची ताकद मोठी असते. देशाला आज केवळ रस्त्यावर उतरणाऱ्या तरुणांची गरज नाही, तर कायद्याचा आदर करणारे आणि स्वतःच्या कर्तृत्वाने परिवर्तन घडवणारे तरुण हवे आहेत. तेव्हा तरुणांनी स्वतःच्या शक्तीचा वापर दुसऱ्याच्या राजकीय स्वार्थासाठी होणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे. हिंसाचाराची सर्वाधिक किंमत सामान्य कुटुंबांनाच मोजावी लागते. प्रत्येक तरुणाने लक्षात ठेवले पाहिजे की, त्याच्या शिक्षणात, संगोपनात आणि भविष्यासाठीच्या स्वप्नांत संपूर्ण कुटुंबाची मेहनत आणि आशा गुंतलेल्या असतात. एका क्षणाच्या आवेशामुळे या साऱ्यालाच धक्का बसू शकतो, त्यामुळे हे टाळले पाहिजे. तरुणाईने कोणाच्याही हातातील बाहुले होण्याऐवजी भविष्याची जबाबदारी स्वीकारणेच श्रेयस्कर ठरणार आहे.

▶ पान २ वरून

# बालहक्क आणि आरोग्य व्यवस्था

आरोग्य केंद्रांची संख्या वाढवणे आवश्यक आहेच; पण तेथे डॉक्टर, परिचारिका, औषधे, तपासणी सुविधा, रुग्णवाहिका आणि नवजात बालकांसाठी आवश्यक उपचार व्यवस्था नियमित उपलब्ध असणे अधिक महत्त्वाचे आहे. गंभीर आजारी नवजात बालकाला विशेष नवजात काळजी कक्षापर्यंत वेळेत पोहोचवता आले नाही, तर आरोग्य व्यवस्थेतील एखाद्या छोट्या त्रुटीची किंमत त्या बालकाच्या जीवाने मोजावी लागू शकते. याच ठिकाणी सामाजिक न्यायाचा प्रश्न आरोग्याच्या प्रश्नाशी एकरूप होतो. गरीब, आदिवासी, ग्रामीण किंवा सामाजिकदृष्ट्या वंचित मुलाला कमी दर्जाची आरोग्यसेवा मिळणे हा केवळ आरोग्य विभागाचा प्रशासकीय प्रश्न नाही; तो समानतेच्या घटनात्मक मूल्यांसमोर उभा राहणारा प्रश्न आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील मुलासाठी सार्वजनिक आरोग्य व्यवस्था ही पर्यायी सुविधा नसून अनेकदा जीवनरेषा असते. त्यामुळे सरकारी आरोग्यसेवेची कमी असणे म्हणजे सर्वांत जास्त गरज असलेल्या मुलांच्या हक्कांवर परिणाम होणे. बालकाला मृत्यूपासून वाचवणे ही पहिली जबाबदारी आहे; त्यानंतर त्याला निरोगी वाढण्याची संधी देणे ही पुढची जबाबदारी आहे. पुरेसे पोषण, वेळेवर लसीकरण, सुरक्षित प्रसूती, उपचाराची उपलब्धता, मानसिक आरोग्य, स्वच्छ वातावरण आणि भेदभावमुक्त सेवा या सर्वांचा समावेश बालकाच्या आरोग्य हक्कात होतो. भारताने बालमृत्यू कमी करण्याच्या दिशेने मोठी वाटचाल केली आहे. आता पुढचे लक्ष्य केवळ आकडे आणखी कमी करणे नसावे. आरोग्यव्यवस्थेतील सामाजिक, आर्थिक आणि लिंगविषयक दरी कमी करणे हे पुढचे मोठे आव्हान असले पाहिजे. कारण एखाद्या देशाची आरोग्य व्यवस्था सर्वांत श्रीमंत मुलाला किती चांगली सेवा देते, यावर तिचे मूल्यमापन होत नाही; ती सर्वात गरीब, सर्वांत दुर्गम आणि सर्वांत वंचित मुलाला किती समान संधी देते, यावर तिची खरी कसोटी होते. मुलगा असो वा मुलगी, शहरातील असो वा आदिवासी पाड्यातील, श्रीमंत घरातील असो वा गरीब कुटुंबातील, त्याच्या जीवनाची किंमत समान आहे. ही समानता केवळ संविधानाच्या पानांवर न राहता आरोग्य केंद्राच्या दारापासून रुग्णालयाच्या खाटेपर्यंत आणि उपचाराच्या प्रत्येक टप्प्यावर दिसली पाहिजे. बालमृत्यू कमी होणे ही उपलब्धी आहे; पण कोणतेही मूल गरिबी, सामाजिक वंचितपणा, लिंगभेद, अंतर किंवा अपुर्या आरोग्यसेवेमुळे आपले जीवन गमावणार नाही, अशी व्यवस्था उभी करणे हे बालहक्कांचे खरे उद्दिष्ट आहे. प्रश्न एवढाच की, आपण मुलांना फक्त जगवू इच्छितो की त्यांना समानतेने, जगण्याचा अधिकारही देऊ इच्छितो?

▶ पान २ वरून

# सत्य

विजेचा शॉक बसून तो गेल्याचं त्याच्या वडिलांचं आलेलं ते पत्र होतं. पत्रातल्या शेवटच्या दोन ओळींवर माझी नजर स्थिर झाली. त्या ओळी होत्या. काही काळ शुद्धीवर होता. खूप बोलत होता. पण सरांचे ४०० रुपये त्वरित पाठवा, असं मात्र सारखा म्हणत होता. पत्रापाठोपाठ आलेली मनीऑर्डर त्याच्या त्या नातेवाईकाने माझ्या हातात ठेवली. माझ्या शरीरात जणू वीज संचारून गेली. मी स्तब्ध झालो. अचानक माझ्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. सत्य माझ्यासमोर होते. मी त्या नोटा तिथंच ठेवल्या. पटकन उठलो आणि निघालो. माझ्याकडे बघून तो आणि सत्य हसत असल्याचा भास रस्ताभर मला अस्वस्थ करीत होता.

▶ पान ४ वरून

# एआयला लगाम नको...

तिथे मानवी नियंत्रणाची पातळी सर्वाधिक असायला हवी. याचबरोबर एआय विकसित करणाऱ्या कंपन्यांनीही आपली जबाबदारी स्वीकारली पाहिजे. एखादे नवीन मॉडेल बाजारात आणण्याआधी त्याची कठोर सुरक्षा चाचणी झाली पाहिजे. त्याच्या संभाव्य गैरवापराचा अभ्यास झाला पाहिजे. सुरक्षा त्रुटी सापडल्यास लपवण्याऐवजी तत्काळ दुरुस्त करण्याची व्यवस्था असली पाहिजे. सरकारने एकीकडे नव्या तंत्रज्ञानाला प्रोत्साहन द्यावे आणि दुसरीकडे नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी स्पष्ट नियम तयार करावेत. अतिनियमनामुळे नवकल्पनांना अडथळा येऊ नये; पण नियम नसल्यामुळे कंपन्यांना अमर्याद स्वातंत्र्यही मिळू नये. या दोन्ही टोकांमध्ये संतुलन साधणे हे धोरणकर्त्यांसमोरचे खरे आव्हान आहे. एआयचे स्वरूप जागतिक असल्याने आंतरराष्ट्रीय सहकार्याचीही गरज आहे. एका देशात तयार झालेली एआय प्रणाली दुसऱ्या देशात वापरली जाऊ शकते. एका देशातील गुन्हेगार दुसऱ्या देशातील डिजिटल यंत्रणेवर हल्ला करू शकतो. त्यामुळे एआय सुरक्षेसाठी जागतिक पातळीवर काही समान मूलभूत नियम असणे आवश्यक आहे.

# जनसांख्यिकीचा प्रभाव काय असतो?

**धर्म बदलल्यास पूर्वीच्या आरक्षणाचे लाभ मिळणार नसल्याचे सर्वोच्च न्यायालयाने परवाच्या निकालातून स्पष्ट केले. अशा या धर्मांतरणामागची कारणे अनेक असली, तरी 'लोकसंख्या बदल' हे सुद्धा त्यामागील एक प्रमुख कारण! कारण, मोठ्या प्रमाणात होणार्‍या धर्मांतरणामुळे लोकसंख्येबरोबच संस्कृतीही त्याचा विपरीत परिणाम होतो. या पार्श्वभूमीवर 'लोकसंख्या बदला'चे विश्लेषण करणारा हा लेख...**

आकलन
डॉ. मयंक चतुर्वेदी



कोणत्याही राष्ट्राच्या लोकसंख्येची रचना त्या देशाचे सामाजिक स्वरूप, सांस्कृतिक परंपरा, राजकीय प्रतिनिधित्व आणि विविध समुदायांमधील परस्परसंबंध यांवर परिणाम घडवते. एखाद्या प्रदेशात दीर्घकाळापासून वास्तव्यास असलेल्या समुदायाच्या लोकसंख्येचे प्रमाण घटल्यास, त्या समुदायाची सांस्कृतिक उपस्थिती, स्थानिक संस्थांमधील सहभाग आणि राजकीय प्रभाव यांत कसे बदल घडतात, याचे ताजे उदाहरण पुन्हा एकदा आपल्या समोर आले. हिंदू समाजाच्या धार्मिक परंपरा, मंदिरे, तीर्थक्षेत्रे, सण- उत्सव आणि सांस्कृतिक श्रद्धा हा भारताच्या सभ्यताविषयक वारशाचा महत्त्वपूर्ण आधार. या परंपरांचे स्वातंत्र्य आणि सुरक्षितता सुनिश्चित करणे, सामाजिक स्थैर्याच्या दृष्टीने आवश्यकच. काश्मीरमधील काश्मिरी पंडितांचे विस्थापन आणि ईशान्य भारतातील धार्मिक व जातीय संरचनेशी संबंधित बदलासारख्या अनेक घडामोडी या विषयावर गंभीर चर्चा करण्याची गरज अधोरेखित करतात. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील मीरा रोड येथील 'पूनम इस्टेट लस्टर-१' या संकुलातील ताजा प्रकार समोर आला आहे.

६२५ सदनिका असलेल्या या संकुलात राहणार्‍या सुमारे १२० हिंदू कुटुंबांनी, नवरात्रोत्सवादरम्यान गरबा, दांडिया आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यासाठी ना- हरकत प्रमाणपत्राची मागणी केली होती. रहिवाशांनी शांतता, सुरक्षितता आणि स्वच्छतेशी संबंधित नियमांचे पालन करण्याची हमीही दिली होती. मात्र, तरीही त्यांचा अर्ज फेटाळण्यात आला. या निर्णयाविरोधात स्थानिक रहिवासी उमाशंकर नाग यांनी, सहकारी संस्थांच्या निबंधकांकडे तक्रार दाखल केली आहे. या प्रकरणातील सर्वांत महत्त्वाचा प्रश्न म्हणजे, निर्णय घेताना निष्पक्षता राखण्यात आली होती का? नवरात्रोत्सवाच्या आयोजनाला परवानगी नाकारण्यामागे सुरक्षितता, स्वच्छता आणि सामायिक जागेच्या वापरासंबंधीचे नियम हे कारण होते का? असे नियम सर्व धार्मिक कार्यक्रमांसाठी समान रीतीने लागू केले जातात का? या निर्णयात धार्मिक ओळखीच्या आधारे भेदभाव करण्यात आला का? या प्रश्नांची उत्तरे सोसायटीचे ठराव, नियमावली आणि प्रशासकीय कागदपत्रांची तपासणी केल्यानंतरच स्पष्ट होतील. मात्र, या प्रकरणातून धार्मिक आधारावर भेदभाव होत असल्याचा आरोप पुढे आला असून, तो घटनात्मक समानता आणि धार्मिक स्वातंत्र्याच्या दृष्टीने गंभीर विषय आहे.

भारताच्या २०११च्या जनगणनेनुसार, देशाच्या एकूण लोकसंख्येत हिंदूंचे प्रमाण ७९.८ टक्के, तर मुस्लिमांचे प्रमाण १४.२ टक्के होते. १९५१ मध्ये हिंदूंचे प्रमाण ८४.१ टक्के, तर मुस्लिमांचे प्रमाण ९.८ टक्के नोंदवण्यात आले होते. या आकडेवारीवरूनच सहा दशकांच्या कालावधीत, दोन्ही समुदायांच्या राष्ट्रीय लोकसंख्येच्या प्रमाणात महत्त्वपूर्ण बदल झाल्याचे दिसते. तथापि, या आकडेवारीचे प्रदेशनिहाय विश्लेषण करणेही आवश्यकच.

**काश्मीर- विस्थापनाची शोकांतिका**

काश्मीर खोर्‍याचा आधुनिक इतिहास धार्मिक सुरक्षितता आणि लोकसंख्येतील बदलातील संबंध समजून घेण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. १९८०च्या दशकाच्या उत्तरार्धात आणि १९९०च्या आसपास दहशतवाद, हत्या, धमक्या आणि भीतीच्या वातावरणामुळे काश्मिरी हिंदूंच्या, विशेषतः काश्मिरी पंडितांच्या जीवनावर गंभीर परिणाम झाला. मोठ्या संख्येने त्यांना खोरे सोडून जाण्यास भाग पडले. परिणामी, त्यांच्या पारंपरिक सामाजिक- सांस्कृतिक अस्तित्वावर, मालमत्तेवर आणि मूळ निवासस्थानाशी जोडलेल्या जीवनपद्धतीवर खोल परिणाम झाला.

केंद्रीय गृहमंत्रालयाने मार्च २०२१ मध्ये संसदेत सादर केलेल्या माहितीनुसार, १९९० पासून सुरक्षेच्या कारणास्तव काश्मीर खोरे सोडून गेलेल्या, ४४ हजार १६७ स्थलांतरित कुटुंबांची नोंद जम्मू-काश्मीरच्या मदत कार्यालयात करण्यात आली. त्यांपैकी ३९ हजार ७८२ कुटुंबे हिंदू होती. दहशतवादी हिंसाचार, धमक्या आणि भीतीमुळे, एखाद्या समुदायाची आपल्या मूळ निवासस्थानी राहण्याची क्षमता कशी प्रभावित होते, याचेच हे विस्थापन एक महत्त्वपूर्ण उदाहरण. या शोकांतिकेचा अभ्यास करताना, दहशतवादी संघटनांचा हिंसाचार, हल्ले, तत्कालीन सुरक्षा परिस्थिती आणि प्रशासनाचे अपयश याबाबीही महत्त्वाच्या ठरतात.

**ईशान्य भारत- धर्मांतर, संस्कृती आणि राजकीय परिस्थिती:** नागालॅण्ड, मिझोराम आणि मेघालय या राज्यांमध्ये ख्रिश्चन समुदाय बहुसंख्य आहे. जनगणनेतील धार्मिक आकडेवारी या राज्यांची वैशिष्ट्यपूर्ण लोकसंख्यात्मक रचना स्पष्ट करते. या बदलामागे ब्रिटिशकालीन मिशनरी कार्य, स्थानिक धार्मिक चळवळी, आदिवासी समाज आणि दीर्घ ऐतिहासिक प्रक्रियांची भूमिका आहे. ईशान्य भारताला फुटीरतावादी चळवळी आणि जातीय संघर्षांचाही इतिहास आहे. या घटनांचा अभ्यास करताना धार्मिक परिवर्तनाबरोबरच जमीन, स्वायत्तता, जातीय अस्मिता, राजकीय प्रतिनिधित्व आणि ऐतिहासिक तक्रारी या घटकांचाही विचार करणे आवश्यक ठरते. अशा परिस्थितीत एखाद्या प्रदेशाची धार्मिक रचना बदलल्यास, तेथील सांस्कृतिक संस्थांवर आणि सामाजिक संबंधांवर परिणाम होऊ शकतो, हे स्वाभाविकच. ईशान्य भारताचा अनुभव, लोकसंख्येतील बदलांचा दीर्घकालीन परिणाम समजून घेण्यासाठी महत्त्वाचा ठरतो.

आसाम आणि पश्चिम बंगालमधील सीमावर्ती भागांत अवैध स्थलांतर, नागरिकत्व आणि स्थानिक अस्मिता यांबाबत दीर्घकाळापासून वाद सुरू आहेत. धुबरी, मालदा, मुर्शिदाबाद आणि उत्तर दिनाजपूर यांसारख्या जिल्ह्यांच्या लोकसंख्यात्मक रचनेवरून, राजकीय आणि सामाजिक पातळीवर चर्चा होत असते.

**केरळमध- धार्मिक रचना आणि सुरक्षेसमोरील आव्हाने:** केरळमध्ये हिंदू, मुस्लीम आणि ख्रिश्चन हे समुदाय दीर्घकाळापासून सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक जीवनाचा भाग आहेत. राज्याच्या धार्मिक रचनेत कालानुरूप बदल झाले. येथे कट्टरतावाद आणि दहशतवादी संघटनांशी संबंधित अनेक प्रकरणेही समोर आली आहेत. 'इस्लामिक स्टेट'मध्ये सहभागी झालेल्या व्यक्तींशी संबंधित प्रकरणांची चौकशी हे त्याचे एक उदाहरण. 'पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया' या संघटनेच्या कारवाया आणि दहशतवादाशी संबंधित प्रकरणांचा सुरक्षेच्या दृष्टिकोनातून अभ्यास, महत्त्वाचा आहे. याच पार्श्वभूमीवर भारत सरकारने या संघटनेवर बंदी घातली. भारतीय संविधानातील 'अनुच्छेद १४' कायद्यापुढे समानता आणि कायद्याचे समान संरक्षण यांची हमी देतो. 'अनुच्छेद २५' अंतःकरणाचे स्वातंत्र्य, तसेच धर्म मानण्याचा, त्याचे आचरण करण्याचा आणि प्रचार करण्याचा अधिकार प्रदान करतो. मात्र, हा अधिकार सार्वजनिक सुव्यवस्था, नैतिकता, आरोग्य आणि संविधानातील अन्य तरतुदींच्या अधीन आहे. 'अनुच्छेद २६' धार्मिक संप्रदायांच्या काही संस्थात्मक अधिकारांचे संरक्षण करतो.

या घटनात्मक तरतुदींनुसार हिंदूंना नवरात्रोत्सव, दीपावली, दुर्गापूजा आणि अन्य धार्मिक सण साजरे करण्याचे स्वातंत्र्य मिळायला हवे. मात्र, येथे नेमके काय घडते? लोकसंख्येतील बदलांमुळे, एखाद्या प्रदेशाची संस्कृती, सामाजिक संस्था आणि राजकीय प्रतिनिधित्व प्रभावित होऊ शकते. हिंदू समुदायाचे लोकसंख्येतील प्रमाण घटल्यास, धार्मिक स्वातंत्र्याचे उल्लंघन होण्याची शयता निर्माण होते. तथापि, लोकसंख्येतील बदल आणि धार्मिक स्वातंत्र्यावरील मर्यादा यांचा थेट संबंध प्रत्येक प्रकरणात स्वतंत्रपणे तपासणे आवश्यक आहे. काश्मिरातील विस्थापन हे धार्मिक सुरक्षिततेच्या दृष्टीने झालेल्या गंभीर अपयशाचे उदाहरण म्हणून आजही समोर आहे. त्याचप्रमाणे, मीरा रोडमधील वाद निवासी संकुलांमध्ये समान वागणूक आणि धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्याच्या अधिकारांची तपासणी करण्याची गरजच अधोरेखित करतो. हे लक्षात ठेवले पाहिजे की, भारताच्या सभ्यताविषयक वारशाच्या रक्षणासाठी हिंदू समाजाचे धार्मिक स्वातंत्र्य, मंदिरे, सण-उत्सव आणि सांस्कृतिक परंपरांचे संरक्षण आवश्यक आहे. त्याच वेळी, कायद्याचे राज्य प्रत्येक नागरिकाच्या अधिकारांचे रक्षण करणारे असले पाहिजे. या संपूर्ण विषयातून सर्वांनी समजून घेण्याची बाब अशी की, राष्ट्राचे खरे सामर्थ्य प्रत्येक समुदायाला आपली धार्मिक ओळख, सांस्कृतिक परंपरा आणि व्यक्तिगत स्वातंत्र्य जपत सुरक्षितपणे, सहअस्तित्वाच्या भावनेने आणि एकतेने जगता येण्यात आहे. मात्र, लोकसंख्येतील बदलांमुळे या एकतेला आव्हान निर्माण होऊ शकते.

हिंदू बहुसंख्य असलेल्या प्रदेशातच एकता आणि सौहार्द टिकते, तर हिंदूंचे लोकसंख्येतील प्रमाण घटल्यावर त्यांची सुरक्षितता, धर्म, धार्मिक आचार, कला आणि संस्कृती धोयात येतात. त्यामुळे सांस्कृतिक ओळख आणि सभ्यताविषयक वारसा टिकवण्यासाठी, हिंदू समाजाचे धार्मिक स्वातंत्र्य आणि सांस्कृतिक परंपरांचे संरक्षण महत्त्वाचे असल्याची भूमिका येथे मांडण्यात आली आहे. मीरा रोडमधील हे प्रकरण धार्मिक कार्यक्रमांना परवानगी देताना समान निकष लागू होतात की नाहीत, याची निष्पक्ष चौकशी करण्याची गरज अधोरेखित करते. धार्मिक स्वातंत्र्य, समानता आणि सांस्कृतिक परंपरांचे संरक्षण यांना लोकशाही भारतात अनन्यसाधारण महत्त्व आहे.

---

# जय माँ कामाख्या!

## कामाख्या शक्तिपीठ : सृष्टीच्या सृजनशक्तीची होते उपासना!

विशेष
विरेश स्वामी
भ्र. ८९७५२८४२५७

**मूर्तीविना देवीची आराधना, अंबुबाची मेळ्याची अनोखी परंपरा, तंत्रसाधनेचा प्राचीन वारसा आणि आदिशक्तीच्या तत्त्वज्ञानाचा अद्भुत संगम गुवाहाटी, आसाम विशेष लेख**

एखाद्या मंदिरात देवीची मूर्ती नसेल, तरीही हजारो भाविक तिच्या दर्शनासाठी दूरदूरवरून येत असतील; एखाद्या धार्मिक स्थळाचा उत्सव पृथ्वीच्या सृजनक्षमतेशी जोडलेला असेल; आणि जिथे स्त्रीच्या नैसर्गिक ऋतुचक्रालाही धार्मिक प्रतीकात्मकतेत स्थान दिले जाते, अशा स्थळाची कल्पना केली तर डोळ्यांसमोर येते ते आसाममधील नीलाचल पर्वतावर वसलेले माता कामाख्या देवीचे शक्तिपीठ!

भारतीय आध्यात्मिक परंपरेत काही तीर्थक्षेत्रे केवळ दर्शनाची ठिकाणे नसतात, तर ती विशिष्ट तत्त्वज्ञान, श्रद्धा आणि संस्कृतीची प्रतीके असतात. माता कामाख्या मंदिर हे त्यापैकीच एक. येथे देवीच्या पारंपरिक मूर्तीऐवजी नैसर्गिक शिलारूपातील योनिपीठाची पूजा केली जाते. अंबुबाची मेळ्याच्या माध्यमातून पृथ्वीच्या फलनक्षमतेचा गौरव केला जातो, तर शाक्त आणि तंत्रप्रधान उपासना परंपरांमुळे या मंदिराला आध्यात्मिक ओळख प्राप्त झाली आहे. माता कामाख्या देवीचे स्थान म्हणजे श्रद्धा, सृजन, निसर्ग, स्त्रीशक्ती आणि भारतीय धार्मिक परंपरेतील गूढ तत्त्वज्ञान यांचा अद्वितीय संगम!

**१. सतीच्या कथेशी जोडलेले शक्तिपीठाचे माहात्म्य**

माता कामाख्या देवीच्या महिम्याची सुरुवात हिंदू पुराणपरंपरेतील भगवान शिव आणि माता सती यांच्या कथेतून होते. पौराणिक कथेनुसार, प्रजापती दक्ष यांनी आयोजित केलेल्या यज्ञात आपली कन्या सती आणि जावई भगवान शिव यांना आमंत्रित केले नव्हते. तरीही सती यज्ञस्थळी गेल्या. तेथे भगवान शिवांचा झालेला अपमान सहन न झाल्याने त्यांनी देहत्याग केला, अशी कथा आहे. सतीच्या वियोगाने भगवान शिव दुःखाकुल झाले. ते सतीचा देह घेऊन भ्रमण करू लागले. त्यामुळे सृष्टीचे संतुलन बिघडण्याची परिस्थिती निर्माण झाली. तेव्हा भगवान विष्णूंनी सुदर्शन चक्राच्या साहाय्याने सतीच्या देहाचे विविध भाग केले, अशी धार्मिक मान्यता आहे. ज्या ठिकाणी सतीच्या देहाचे भाग पडले, ती स्थळे शक्तिपीठे म्हणून प्रसिद्ध झाली. शाक्त परंपरेतील मान्यतेनुसार, सतीच्या योनिभागाचे पतन नीलाचल पर्वतावर झाले. त्यामुळे कामाख्या हे शक्तिपीठ सृजनशक्ती आणि आदिशक्तीच्या उपासनेचे महत्त्वपूर्ण केंद्र मानले जाते. विश्वाच्या निर्मितीमागील ऊर्जा, जीवनाचे सातत्य आणि निसर्गातील सृजनप्रक्रिया यांना देवीच्या स्वरूपात पाहण्याची दृष्टी भारतीय शक्तिपूजा परंपरेत आढळते.

**२. देवीची मूर्ती नाही, तर नैसर्गिक योनिपीठाची पूजा!**

कामाख्या मंदिराचे सर्वांत वैशिष्ट्यपूर्ण रूप गर्भगृहात अनुभवायला मिळते. कामाख्या मंदिराच्या गर्भगृहात देवीची पारंपरिक मानवी आकृतीची मूर्ती नाही. येथे नैसर्गिक खडकातील योनिरूप पवित्र स्थानाची पूजा केली जाते. या स्थानात नैसर्गिक झर्‍याचे पाणीही आढळते. ही उपासना शाक्त तत्त्वज्ञानातील शक्तीच्या संकल्पनेशी जोडलेली आहे.

**या परंपरेचे चार महत्त्वाचे अर्थ समोर येतात.**

**सृजनशक्ती :** जीवसृष्टीच्या निर्मितीमागील मूलभूत तत्त्व.

**मातृशक्ती :** जीवनाच्या निर्मितीला आणि सातत्याला दिलेले आध्यात्मिक महत्त्व.

**प्रकृती :** पृथ्वी, जल आणि निसर्गातील शक्तीचा गौरव.

**आदिशक्ती :** विश्वाच्या अस्तित्वामागील दैवी ऊर्जेची संकल्पना.

यामुळे कामाख्या मंदिरातील उपासना ही केवळ मूर्तिपूजेची एक वेगळी पद्धत नसून, सृजनतत्त्वाला केंद्रस्थानी ठेवणारी एक महत्त्वपूर्ण धार्मिक परंपरा ठरते.

**३. प्राचीन कामरूप ते आजचे आसाम :** आसामचा हा प्रदेश प्राचीन काळात कामरूप या नावाने ओळखला जात असे. मंदिराची नेमकी स्थापना कधी झाली, याबाबत निश्चित निष्कर्ष सांगता येत नसला, तरी या स्थळाचा प्राचीन धार्मिक वारसा विविध परंपरा आणि ऐतिहासिक संदर्भांतून समोर येतो. मंदिराच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे सोळाव्या शतकातील पुनर्बांधणी. ऐतिहासिक माहितीनुसार, कोच राजवंशातील राजा नरनारायण आणि त्यांचे बंधू चिलाराय यांच्या काळात इ.स. १५६५ च्या सुमारास मंदिराची पुनर्बांधणी झाली. आज दिसणार्‍या मंदिराच्या रचनेत या ऐतिहासिक टप्प्याचा महत्त्वपूर्ण प्रभाव दिसतो. मंदिराच्या स्थापत्याला सामान्यतः नीलाचल शैलीशी जोडले जाते. घुमटाकार शिखर, दगडी बांधकाम आणि पारंपरिक स्थापत्यघटक यांमुळे मंदिराला ओळख प्राप्त झाली आहे.

**४. अंबुबाची मेळा :** देवीच्या ऋतुचक्राशी जोडलेली अनोखी परंपरा कामाख्या मंदिराचे नाव घेताच सर्वप्रथम आठवण येते ती अंबुबाची मेळ्याची. साधारणपणे जून महिन्यात, पावसाळ्याच्या प्रारंभी हा उत्सव साजरा केला जातो. या काळात भारताच्या विविध भागांतून भाविक, साधू-संत, साधक आणि यात्रेकरू नीलाचल पर्वतावर एकत्र येतात. अंबुबाची मेळ्याचे सर्वांत वैशिष्ट्यपूर्ण अंग म्हणजे माता कामाख्या देवी वार्षिक ऋतुमती अवस्थेत असते, अशी धार्मिक श्रद्धा. या मान्यतेनुसार, देवीच्या या कालखंडात मंदिर काही दिवस भाविकांसाठी बंद ठेवले जाते. त्यानंतर पारंपरिक धार्मिक विधी पूर्ण करून मंदिर पुन्हा दर्शनासाठी खुले केले जाते. भारतीय कृषिसंस्कृतीत पाऊस आणि सुपीक भूमी यांना जीवनाच्या सातत्यासाठी अनन्यसाधारण महत्त्व आहे. अंबुबाची परंपरेत पृथ्वीच्या या सृजनक्षमतेचे धार्मिक प्रतीकात्मक दर्शन घडते. या उत्सवात स्त्रीच्या नैसर्गिक जैविक प्रक्रियेला धार्मिक परंपरेत स्थान मिळते, ही बाब विशेष लक्षवेधी आहे. आधुनिक काळातही या परंपरेचा अभ्यास स्त्रीशक्ती, निसर्ग आणि धार्मिक प्रतीकात्मकता यांच्या परस्परसंबंधातून केला जातो. मंदिर पुन्हा उघडल्यानंतर भाविक दर्शनासाठी गर्दी करतात.

**५. कामाख्या आणि तंत्रसाधना :** गूढतेपलीकडील आध्यात्मिक परंपरा कामाख्या मंदिराला भारतातील महत्त्वाच्या तंत्रप्रधान शाक्त उपासना केंद्रांपैकी एक मानले जाते. तंत्रपरंपरेत मंत्र, ध्यान, विशिष्ट धार्मिक विधी, देवतेचे चिंतन आणि शक्तितत्त्वाची उपासना यांना महत्त्व असते. या परंपरांचे स्वरूप प्रदेश, संप्रदाय आणि साधनापद्धतीनुसार वेगवेगळे असू शकते. कामाख्या मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे येथे शाक्त उपासनेचा समृद्ध वारसा आजही जतन झालेला आहे. त्यामुळे भारतीय धार्मिक इतिहास, तंत्रपरंपरा आणि शक्तितत्त्वज्ञानाचा अभ्यास करणार्‍यांसाठी हे स्थान महत्त्वाचे ठरते. या मंदिराविषयी अनेक रहस्यमय कथा, चमत्कारांचे दावे आणि लोकश्रद्धा प्रचलित आहेत. मात्र, प्रत्येक कथेला ऐतिहासिक किंवा वैज्ञानिक पुष्टी आहेच असे नाही.



कामाख्येचे खरे वैशिष्ट्य केवळ तिच्याभोवती असलेल्या गूढतेत नाही; तर शक्ती, सृजन आणि निसर्ग यांना धार्मिक तत्त्वज्ञानाच्या केंद्रस्थानी ठेवणार्‍या परंपरेत आहे.

**६. दशमहाविद्या :** आदिशक्तीच्या दहा स्वरूपांची संकल्पना

शाक्त परंपरेतील दशमहाविद्या ही आदिशक्तीच्या दहा स्वरूपांची महत्त्वपूर्ण संकल्पना आहे. कामाख्या मंदिर परिसरात या परंपरेशी संबंधित विविध देवीस्थाने आढळतात.

**दशमहाविद्यांची प्रचलित नावे अशी आहेत**

१. काली काळ, परिवर्तन आणि शक्तीचे प्रतीक.
२. तारा संरक्षण, मार्गदर्शन आणि संकटातून तारून नेणारी शक्ती.
३. त्रिपुरसुंदरी सौंदर्य, चेतना आणि विश्वतत्त्वाशी संबंधित स्वरूप.
४. भुवनेश्वरी विश्वाची अधिष्ठात्री देवी.
५. भैरवी तेजस्वी आणि उग्र शक्तीचे स्वरूप.
६. छिन्नमस्ता त्याग, आत्मसमर्पणाशी संबंधित प्रतीकात्मक रूप.
७. धूमावती वैराग्य आणि जीवनातील कठोर वास्तवाचे दर्शन.
८. बगलामुखी ड्ढ स्तंभनशक्तीशी संबंधित देवीस्वरूप.
९. मातंगी वाणी, ज्ञान आणि कलात्मक अभिव्यक्तीचे स्वरूप.
१०. कमला समृद्धी आणि मंगलतेचे प्रतीक.

या दहा स्वरूपांमधून आदिशक्तीचे विविध पैलू व्यक्त होतात. सृष्टीतील परिवर्तन, ज्ञान, वैराग्य, समृद्धी आणि संरक्षण यांसारख्या संकल्पनांना या परंपरेत देवीच्या विविध रूपांतून समजावले जाते.

**७. नीलाचल पर्वत :** अनेक देवी-देवतांच्या उपासनेचे केंद्र

कामाख्या मंदिर हे नीलाचल पर्वतावरील विस्तृत धार्मिक परिसराचा केंद्रबिंदू आहे. या परिसरात देवीच्या विविध स्वरूपांशी आणि शिवोपासनेशी संबंधित अनेक मंदिरे आहेत. भुवनेश्वरी मंदिर हे नीलाचल पर्वतावरील आणखी एक महत्त्वाचे देवीस्थान आहे. याशिवाय तारा, छिन्नमस्ता आणि इतर देवीस्वरूपांशी संबंधित स्थाने तसेच विविध शिवमंदिरे या धार्मिक परिसराचा भाग आहेत. या मंदिरांमुळे नीलाचल पर्वतावर शक्ती आणि शिवोपासनेच्या विविध परंपरांचे दर्शन घडते. भाविकांसाठी हा परिसर केवळ एका मंदिराचे दर्शन घेण्यापुरता मर्यादित राहत नाही, तर भारतीय धार्मिक परंपरेतील अनेक स्वरूपांचा परिचय करून देणारा आध्यात्मिक प्रवास ठरतो.

**८. स्त्रीशक्ती, सृजन आणि प्रकृती :** कामाख्या उपासनेचा व्यापक संदेश माता कामाख्या देवीच्या उपासनेचा विचार करताना स्त्रीशक्ती आणि सृजनशक्ती या दोन संकल्पना केंद्रस्थानी येतात. शाक्त तत्त्वज्ञानात शक्ती ही विश्वाच्या अस्तित्वामागील मूलभूत ऊर्जा मानली जाते. शिव आणि शक्ती यांचे नाते हे चेतना आणि क्रियाशक्ती यांच्या परस्परपूरकतेचे प्रतीक म्हणूनही समजले जाते. कामाख्या मंदिरातील योनिपीठाची पूजा या तत्त्वज्ञानाला वैशिष्ट्यपूर्ण अभिव्यक्ती देते.

**या परंपरेतून पुढील विचार समोर येतात.**

**सृष्टीविषयी आदर :** जीवनाची निर्मिती आणि त्याचे सातत्य ही पवित्र मानण्याजोगी तत्त्वे आहेत, अशी धार्मिक दृष्टी.

**मातृशक्तीचा गौरव :** जीवनाला जन्म देणार्‍या आणि त्याचे संगोपन करणार्‍या शक्तीचे महत्त्व.

**निसर्गाशी नाते :** पृथ्वी, पाणी, पाऊस आणि ऋतुचक्र यांचा जीवनाशी असलेला निकटचा संबंध.

**शक्तीचे व्यापक स्वरूप :** शक्ती ही केवळ एका प्रतिमेपुरती मर्यादित नसून विश्वातील विविध क्रियाशील तत्त्वांशी जोडलेली आहे, ही संकल्पना. अर्थात, कामाख्या परंपरेचा अर्थ प्रत्येक व्यक्ती आपल्या श्रद्धेनुसार समजून घेऊ शकते. मात्र, या उपासनेत सृजनशक्तीला दिलेले महत्त्व हे तिचे सर्वांत वेगळे वैशिष्ट्य आहे.

**९. कामाख्या देवीच्या दर्शनासाठी जाताना...**

माता कामाख्या देवीचे मंदिर गुवाहाटी शहराजवळील नीलाचल पर्वतावर आहे. येथे वर्षभर भाविक दर्शनासाठी येतात; मात्र अंबुबाची मेळ्याच्या काळात गर्दी मोठ्या प्रमाणावर वाढते.

**दर्शनाला जाण्यापूर्वी पुढील बाबी लक्षात घ्याव्यात**

- मंदिराच्या संकेतस्थळावर दर्शनाच्या वेळा आणि धार्मिक कार्यक्रमांची माहिती तपासावी.- अंबुबाची मेळ्याच्या काळात गर्दी अधिक असल्याने प्रवास आणि दर्शनाचे नियोजन आधी करावे.
- मंदिरातील धार्मिक नियम, स्थानिक परंपरा आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे.
- प्रवासासाठी गुवाहाटीपर्यंत रेल्वे, विमान किंवा रस्तेमार्गाचा पर्याय निवडता येतो. पुढे स्थानिक वाहतुकीने नीलाचल पर्वतावर जाता येते.
- उत्सवाच्या काळातील प्रवेशव्यवस्था आणि उपलब्ध सुविधांमध्ये बदल होऊ शकतात; त्यामुळे प्रवासापूर्वी अद्ययावत अधिकृत माहिती तपासणे आवश्यक आहे.

**१०. कामाख्या :** श्रद्धेच्या पलीकडे जाणारे शक्तितत्त्वाचे दर्शन

माता कामाख्या देवीच्या मंदिराचे महत्त्व पाच प्रमुख सूत्रांतून समजून घेता येते ड्ढ शक्ती, श्रद्धा, प्रकृती, संस्कृती आणि साधना. शक्ती म्हणजे सृष्टीच्या निर्मितीमागील मूलभूत ऊर्जा. श्रद्धा म्हणजे पिढ्यानपिढ्या जपली गेलेली धार्मिक परंपरा. प्रकृती म्हणजे जीवनाला आधार देणारे निसर्गचक्र. संस्कृती म्हणजे विविध धार्मिक आणि स्थानिक परंपरांचा संगम. साधना म्हणजे उपासना, आत्मचिंतन आणि आध्यात्मिक अनुभूतीचा मार्ग.कामाख्या मंदिराची परंपरा या सर्व सूत्रांना एकत्र आणते. म्हणूनच हे मंदिर केवळ एक प्रसिद्ध तीर्थक्षेत्र नाही, तर भारतीय शक्तिउपासनेचा आणि तिच्याशी संबंधित सांस्कृतिक वारशाचा अभ्यास करण्यासाठीही महत्त्वाचे स्थान आहे.

**उपसंहार :** नीलाचल पर्वतावर अनुभवता येणारी आदिशक्तीची परंपरा आसाममधील नीलाचल पर्वतावर वसलेले माता कामाख्या देवीचे मंदिर भारतीय धार्मिक आणि सांस्कृतिक वारशातील एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. सतीच्या पौराणिक कथेशी जोडलेले शक्तिपीठ, मूर्तीऐवजी नैसर्गिक योनिपीठाची पूजा, अंबुबाची मेळ्याची अनोखी परंपरा, तंत्रप्रधान शाक्त उपासना आणि दशमहाविद्यांचा वारसा या सर्व गोष्टी कामाख्या मंदिराला स्वतंत्र ओळख देतात. विशेष म्हणजे, येथे सृजनशक्ती आणि पृथ्वीच्या फलनक्षमतेला धार्मिक प्रतीकात्मकतेत महत्त्व दिले जाते. निसर्गातील जीवनचक्र आणि आदिशक्तीची उपासना यांचा संबंध या परंपरेतून व्यक्त होतो.कामाख्या देवीचे दर्शन म्हणजे केवळ एका मंदिराला भेट देणे नव्हे; तर भारतीय शक्तितत्त्वज्ञान, प्राचीन श्रद्धा, निसर्गाशी असलेले नाते आणि धार्मिक परंपरांचा संगम समजून घेण्याची संधी आहे. नीलाचल पर्वतावर विराजमान असलेल्या माता कामाख्या देवीच्या चरणी कोटी कोटी प्रणाम! (लेखक सोलापूर विद्यापीठातील संशोधक विद्यार्थी आहेत.)

# आनंदाचे लेणे, पौर्णिमेचे चांदणे!



निमित्त

प्रा.डॉ. नयनकुमार आचार्य

पूर्णा पूश्चादुत पूर्णा परस्ताद्।
उन्मध्यत पौर्णमासी जिगाय।
तस्यां दैवैः संवसन्तो महित्त्वा।
नाकस्य पृष्ठे समिषा मदेमब।
(अथर्ववेद-७.८०.१)

अनादी काळापासून निरंतर गतिमान असलेले अमर्यादित स्वरूपाचे निसर्गचक्र म्हणजे प्रगतीचे द्योतक! या वैभवशाली सृष्टीत विद्यमान असलेली सर्वच स्थूल आणि सूक्ष्म तत्त्वे ही मानवाला जगण्याचे नवे बळ देतात. ही प्रकृती माता असंख्य जीवात्म्यांच्या सर्वांगीण सुखासाठी नेहमीच पोषक, प्रेरक व मार्गदर्शक राहिली आहेत. अशा या निसर्गातील बदलांकडे पाहून माणूस स्वतःला बदलून घेत नसेल, तर त्यात त्या नैसर्गिक तत्त्वांचा काय दोष? प्रकाशाची अद्भुत रम्यता वितरित करण्याच्याकरिता सूर्य, चंद्र आणि नक्षत्र- तारे ही सर्व नेहमीच व्यग्र आहेत. ही लहान-मोठी असली, तरी सर्वांचे तितकेच महत्त्वदेखील आहे.

वैदिक स्वस्तिवाचन पाठात असाच एक सुंदर मंत्रांश येतो- 'स्वस्तिपन्थामनुरेम सूर्याचंद्रमसाविव.' या मंत्रात सूर्य आणि चंद्रांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले असून या दोन्हींच्या कल्याणपंथांचे अनुकरण करण्याचा मौलिक उपदेश मिळतो. सूर्याची प्रखर तेजस्विता, तर चंद्राची शीतलता!

एक चंड सहस्रांशू तर दुसरा हिमांशू! एक ग्रीष्माच्या वैशाखात तीव्र मार्तंड बनतो, तर दुसरा कोजागिरी पौर्णिमेला आपली शैत्यप्रभा खुलवितो. शारदपौर्णिमेच्या रात्री चांदण्याचा वैभवविलास हा मानवी मनाला अतिशय आल्हाददायक बनवतो. या दिवशीचा जागृत पूर्णचंद्र मोठ्या गौरवाने उद्घोष करतो- 'को जागर्ति? कोण जागा आहे?' स्वतः जागे राहत इतर सृष्टीतत्त्वांना नेहमीच जागृत होण्याची हाक देणारा हा चंद्र. म्हणूनच कोजागिरी पौर्णिमा हे तिचे नामाभिधान. स्वर्गसुखाची बरसात करणारी ही रम्य निशा. या पौर्णिमेला कुठेही ढगांचा लवलेश नाही. या रात्री नभाचे दिव्य आभूषण ठरलेला पूर्ण चंद्र म्हणजे चैतन्याचा मनमोहक स्तंभ. नभांगणात सर्वांच्या ठळक दृष्टीस पडणारा हा शशी किती स्वच्छ, सुंदर आणि तितकाच मनमोहक. दरवर्षी येणारी शारदीय पौर्णिमा माणसाला नवजीवन देते. जीवन जगण्यासाठी बरेच काही सांगून जाते...आपले अंतर्बाह्य जीवन निमळ, मनोरम व सुगंधित आणि तितकेच रंजक बनवण्याच्या कार्यात पौर्णिमा ही प्रेरणेचा खळाळता झरा!

सदरील मंत्रात पौर्णिमेच्या वैभवाचे अप्रतिम वर्णन करण्यात आले आहे. पौर्णिमा चोहिकडे उठून दिसते. सर्व दिशांत पसरलेला अंधार नाहीसा करण्यासाठी तत्पर आहे. पौर्णिमेचा पूर्णचंद्र निसर्गाचे सौंदर्य खुलवत आहे. अशी कोणतीही दिशा नाही की जिथे चांदणे भरलेले नाही. मागे-पुढे, तसेच पूर्व- पश्चिम- दक्षिण- उत्तर, खाली-वर, मध्यभागी अशा प्रत्येक भागात चंद्राची शीतकिरणे व्यापून आहेत. चंद्र आपल्या मधुर, शांत व आल्हाददायी किरणांद्वारे अमृताचा वर्षाव करीत आहे. या चंद्राच्या शीतल किरणांच्या आश्रय घेत तपस्वी व ध्यानी असे ऋषिमुनी भगवंताचे नामस्मरण करीत आहेत. पशु-पक्ष्यांचा किलबिलाट सुरू आहे. भक्तजन भक्तिभावनेत तल्लीन होऊन विश्व विधात्या भगवंताकडे आळवणी करत आहेत. आपल्या शरीर मंदिरातील प्रत्येक कप्प्यात साठलेला दुर्गुण, दोष व अपप्रवृत्तींचा अंधार नाहीसा करून तिथे ज्ञानाचा प्रकाश पाडण्याकरिता त्यांची धडपड सुरू आहे.

पौर्णिमा ही विजयाचे प्रतीक! सृष्टीत दाटलेले तमांचे ढग नाहीसे करीत स्वतःला पूर्णत्व प्रदान करण्याची संधी मिळते, ती पौर्णिमेमुळे. म्हणूनच मंत्रात म्हटले आहे 'पोर्णमासी जिगाय!' ही पौर्णिमा आम्हांसाठी चौफेर विजय प्रदान करणारी ठरो. पौर्णिमेमुळे निसर्गातील बाह्य वातावरण जसे विहंगम बनते, तसेच आध्यात्मिक वातावरणदेखील अतिशय बहारदार होते. आमच्या अंतरंगातील पौर्णिमा, तर नेहमीच प्रकाशित झाली आहे. आत्मतेजाची पौर्णिमा केव्हाच 'ज्योतिर्मय' बनली आहे. भगवंताकडून मिळालेल्या या पिंडात आत्मशक्तीरूप पौर्णिमा फारच तेजोमय आहे. यात मनरूपी चंद्राची किरणे चहुकडे पसरलेली आहेत. अशा या पवित्र व शुद्ध मनश्चंद्राचे संकल्प व विकल्पांचे टिपूर चांदणे पडले आहे. या चांदण्याच्या प्रकाशात आमची पाच ज्ञानेंद्रिये आणि पाच कर्मेंद्रिये आप-आपल्या विषयांकडे अगदी सुव्यवस्थितपणे धाव घेत आहेत. अंतरंगातील पौर्णिमा आणि तिचा चंद्र हे दोन्ही अगदी सर्वदृष्टीने सर्वोत्तम आहेत.

> **वेदमंत्रात वर्णिलेली कोजागिरी पौर्णिमा अतिशय शाश्वत स्वरूपाचे सुख देणारी आहे. अशा या पौर्णिमेच्या रात्री दिव्य गुणांनी परिपूर्ण होत आम्ही आमचे ज्ञान-विज्ञान वाढविण्यासाठी प्रयत्नशील राहावयास हवे. नेहमीच आत्मकल्याणाच्या दिशेने वाटचाल करणे हीच खरी पौर्णिमा...**

असे असले, तरी मानवांमध्ये दडलेले वाईट प्रवृत्तीरुप अंधाराचे साम्राज्य वाढत चालले आहे. डोळे नेहमीच नको ती दृश्ये पाहण्यात उद्युक्त होतात. कान अभद्र शब्द ऐकण्यासाठी तत्पर असतात. रसना हीसुद्धा शारीरिक व्याधींचा विचार न करता अभक्ष्य पदार्थ सेवन करण्यास मागेपुढे पाहत नाहीत. त्वचेलाही मनोरम सुखस्पर्श हवा. जसे ज्ञानेंद्रियांचे, तसेच कर्मेंद्रियांचेदेखील! वाणीही नको ते अपशब्द उच्चारण्यास प्रवृत्त होते. हात हे दानधर्म, सेवा, परोपकार करण्यांऐवजी पापकृत्ये करण्यास धजावतात. नको त्या मार्गाकडे जाण्यास पाय तत्पर होतात. तसेच आहे जननेंद्रियांचेदेखील. आपल्या नैतिक परंपरांच्या मर्यादा ओलांडून 'कामार्तानां न भयं न लज्जा!' याप्रमाणे देहभान विसरून जातो. कामवासनेने वेडापिसा झालेला मानव ब्रह्मचर्य नियमांचे पालन करीत नाही. मागचा-पुढचा विचार न करता स्वतःचे चारित्र्यहनन करून घेतो. हे सर्व घडते ते आध्यात्मिक पौर्णिमेच्या रात्री उगवलेल्या मनरूपी चंद्राच्या शीतल ज्ञानप्रकाशात न वावरल्याने! म्हणूनच वेदमंत्रात वर्णिलेली पौर्णिमा ही अतिशय शाश्वत स्वरूपाचे सुख देणारी आहे.

अशा या पौर्णिमेच्या रात्री दिव्य गुणांनी परिपूर्ण होत आम्ही आमचे ज्ञान-विज्ञान वाढविण्यासाठी प्रयत्नशील राहावयास हवे. जे करायचे, ते चांगलेच करावयाचे! कधीही विपरित, विकृत व अविद्या-अज्ञानाच्या मार्गाने जाणे नको. नेहमीच आत्मकल्याणाच्या दिशेने वाटचाल करणे हीच खरी पौर्णिमा आणि हाच तो ज्ञान-चंद्रोदय. अशा या वेदप्रतिपादित पौर्णिमेच्या आल्हाददायी शीतल चांदण्यात स्वच्छंदपणे भिजत राहिल्याने मानवाची इहलोकीची आणि परलोकीचीही जीवनयात्रा सुखपूर्वक यशस्वी होईल, यात शंका नाही.



# बस्तरची शोधयात्रा : प्रश्नांकडून उत्तराकडे

> **'बस्तरची शोधयात्रा' या माहितीपटाची निर्मिती छत्तीसगड- बस्तरमध्ये दंतेवाडा जिल्ह्यात कार्यरत असणाऱ्या बनफुल जनकल्याण समिती यांच्यातर्फे नुकतीच करण्यात आलेली आहे. या माहितीपटाचे लोकार्पण पुण्यात रविवार, २५ ऑक्टोबर रोजी योजण्यात आले आहे. याविषयीचा हा विशेष लेख !**

विशेष

विवेक गिरीधारी
भ्र. ९४२२२३१९६७

नक्षलवादाच्या छायेतील छत्तीसगडमधील दंतेवाडा परिसरात दोन तपांहून अधिककाळ वैद्यकीय सेवाकार्य करणे हे फार मोठे अवघड व आव्हानात्मक कार्य आहे. सर्वसामान्य व्यक्तीच्या कल्पनेच्या आवाक्यापलीकडचे असलेले हे काम महाराष्ट्रातील डॉ. राम व सुनीता गोडबोले हे दांपत्य अत्यंत चिवटपणे करीत आहेत. सुनीताताई या मुळच्या पुण्याच्या तर डॉ. राम गोडबोले हे सातारचे. कमालीच्या शांतपणे व निरलसपणे चालणारे यांचे हे काम प्रसिद्धी परांगमुखतेमुळे महाराष्ट्रालाच काहीसे अपरिचित राहिलेले होते.

आता या दांपत्याला यंदाचा 'पद्मश्री पुरस्कार' (वैद्यकीय सेवा) नुकताच प्रदान करण्यात आला. त्यामुळे इतके प्रदीर्घ काळ सामाजिक कार्यात राहूनही महाराष्ट्राला अपरिचित असणाऱ्या या सेवासमर्पित दांपत्याचे कार्य अतिशय ठळकपणे लोकांपुढे येऊ लागले. त्यातून लोकांच्या मनात बस्तर या परिसराविषयी कमालीचे कुतूहल जागृत झाले. तेथील परिस्थितीबाबत त्यांच्याकडे वारंवार विचारणा होऊ लागली. अशा वेळेस बस्तरचे प्रश्न व एकूणच तेथील आदिवासींचे भावविश्व माहितीपत्र-चित्रफितीच्या माध्यमातून लोकांपुढे आणण्याचा चंग बनफुल परिवाराचे पुण्यातील कार्यकर्ते महेशजी भुस्कुटे यांनी बांधला. त्यासाठी पुण्यातून परिश्रमपूर्वक देणग्यांमधून आवश्यक निधी त्यांनी उभा केला. सुमारे दोन वर्षांच्या अथक परिश्रमानंतर हे काम आता पूर्णत्वास गेले आहे. त्यांच्या माहितीपट निर्मिती करणाऱ्या चमूने यासाठी बस्तरचे जंगल तुडवत आव्हानात्मक परिस्थतीत प्रत्यक्ष चित्रीकरणाच्या अनेक फेऱ्या केल्या. या माहितीपटाच्या दिग्दर्शिका विनिता अनगळ यांनी अत्यंत अभ्यासूपणे व बारकाईने बस्तरमधील वनवासींच्या प्रश्नांची मांडणी, त्याची कारणमीमांसा करत या माहितीपटातून आदिवासींचे भावविश्व हळुवारपणे उलगडत नेले आहे. या माहितीपटाचे लोकार्पण रा. स्व. संघाचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य व ज्येष्ठ कार्यकर्ते सुरेश तथा भैय्याजी जोशी यांच्या हस्ते स. प. महाविद्यालयाच्या लेडी रमाबाई सभागृहात येत्या रविवारी (दि. २५ ऑक्टोंबर) संध्याकाळी ५ ते ८ या वेळेत होणार आहे.

**बस्तरमधील अत्यंत प्रतिकूल व आव्हानात्मक परिस्थिती :**

एकेकाळी मध्यप्रदेशचा भाग असलेला तत्कालीन बस्तर जिल्हा हा देशभरातील अत्यंत मागास जिल्ह्यांपैकी एक म्हणून ओळखला जात असे. तेथील आदिम आदिवासी जनजाती रहात असलेल्या अबुजमाडसारख्या प्रदेशात त्या काळी कलेक्टरच्या रितसर परवानगीशिवाय प्रवेश मिळत नसे. बस्तरच्या दंडकारण्यातला आदिवासी समाज हा अत्यंत पारंपारिक, आपल्या चालीरीतींना कवटाळून बसणारा व भौतिकदृष्ट्या अतिमागास आहे. येथील आदिवासी हा नुसता आर्थिक व सामाजिक दृष्ट्या मागास नसून त्यापैकी बहुतेक कुटुंबाचे अर्थकारण हे अत्यंत हलाखीचे व जेमतेम असते. भौगोलिक दुर्गमता व सुदुरता यामुळे हा जनजाती समाज मध्यवर्ती शहरी समाजापासून अगदी अलगथलग पडलेला आहे. भौगोलिक दुर्गमतेमुळे शहरी समाज त्यांच्यापर्यंत पोहोचणे ही अगदीच दुरापास्त गोष्ट होऊन बसते. अंधश्रद्धा व आत्यंतिक रूढी परंपरावादी दृष्टीकोन यामुळे या आदिवासींवर आधुनिक उपचार करणेही कमालीचे आव्हानात्मक होऊन बसते. बदल व प्रागतिक दृष्टीकोन स्वीकारण्यास ते सहजी राजी होत नाहीत. आजारपणामुळे त्यांच्या रोजंदारीवर परिणाम होऊन आधीच जेमतेम असणारे उत्पन्न अधिकच मंदावते. तुटपुंजी असणारी शिल्लकही हिरावली जाते. त्यांच्या जगण्याचा स्तर अधिकच खालावतो. अशांच्यासाठी वैद्यकीय सेवेचे महत्व मोठे होते. गंभीर आजारांच्या उपचाराबाबत पुनःपुन्हा नियमितपणे पाठपुरावा करणे हेही अत्यंत जिकीरीचे काम असते. यात अनेक प्रसंगी आदिवासी रुग्णाचा व त्याच्या कुटुंबियांचा मिळणारा थंड प्रतिसाद आपल्या भावना गोठविणारा असतो !

**प्रश्नांच्या शोधयात्रेकडून उत्तराच्या दिशेने :**

'बस्तरमधील आदिवासींचे शोषण, मलेरिया, माता व बालकांचे कुपोषण, भ्रष्टाचार, सन्मान नसणे, दुय्यम नागरिकत्वाची वागणूक मिळणे हे प्रमुख प्रश्न आहेत. यासर्वांकडे शहरी समाजाचे झालेले मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष कारणीभूत आहे. यातून मग एखादा आदिवासी माणूस बंदूक उचलायला राजी होतो. म्हणून वर्तमानकाळात तरी आपण या समाजाच्या उत्थानासाठी विशेषत्वाने प्रयत्न केले पाहिजेत', हे गोडबोले दांपत्याचे म्हणणे पटणारे आहे. सरकार आणि सुरक्षा दलांच्या मोहिमांमुळे नक्षलवादी संपतील पण नक्षलवादाचे काय? तो मुळापासून संपण्यासाठी आपल्यालाच काम करावे लागेल. स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव नसलेल्या या जनजाती समाजात आत्मभान येण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतील, हे सुनिताताईंचे म्हणणे विचार करायला लावणारे आहे.

बस्तरमधील प्रश्नांमधून उलगडत जाणारी ही शोधयात्रा उत्तरात परिवर्तित होण्यासाठी मोठ्या सामुहिक प्रयत्नांची गरज आहे. एकेकाळी महात्मा गांधीनी महाराष्ट्राला कार्यकर्त्यांचे मोहोळ म्हणून संबोधिले होते. आता काळ बदलला आहे.

महाराष्ट्राजवळ पूर्वीचा सेवाभावही आहे आणि आता नव्याने आलेली समृद्धीही आहे. अश्या उभयांगी समृद्ध असलेल्या महाराष्ट्राला बस्तरमधील डॉ. गोडबोले दांपत्याच्या कामापाठीमागे ठामपणे उभे राहिले पाहिजे असे वेगळे सांगायची गरज नाही !



परराष्ट्रकारण

कौस्तुभ वीरकर

पाकिस्तान हा तसा विश्वास ठेवण्यास लायक नसलेलाच देश! तरीही, आंतरराष्ट्रीय राजकारणात भौगोलिक स्थानाची पुण्याई, पाकिस्तानचे आजवर भले करत आली आहे. मात्र, 'दैव देते आणि कर्म नेते' म्हणतात, अशी अवस्था पाकिस्तानची! अलीकडेच सौदी अरब आणि तुर्कीयेबरोबर 'मक्का करार' करून 'इस्लामिक नाटो'ची पायाभरणी करण्याची शेखी पाकिस्तानने मिरवली. मात्र, जेव्हा 'हुतीं'च्या हल्ल्यावेळी या कराराच्या पालनाची वेळ आली, तेव्हा पाकिस्तानने पुन्हा माघार घेतल्याचे समोर आले आहे. या कराराच्या अटींनुसार, लगेचच 'हुतीं'ना पाकिस्तान उत्तर देणार नसल्याचे त्यांच्या परराष्ट्रमंत्र्यांनी जाहीर करतानाच, इराणला तोंडदेखला दमही भरला. हा साराच प्रकार निव्वळ हास्यास्पद!

पाकिस्तानचे सौदी अरबशी धार्मिक, आर्थिक आणि संरक्षणविषयक संबंध आहेत. इराणशी भौगोलिक शेजार आणि प्रादेशिक हितसंबंध जोडलेले आहेत. दोन्ही देशांशी संबंध टिकवणे पाकिस्तानच्या दृष्टीने आवश्यकच आहे. परंतु, 'मक्का करारा'नंतर सौदी अरबच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाल्यावर पाकिस्तानने लष्करी सहभागाबाबत सावध भूमिका घेतली. एखाद्या देशाने युद्धात उतरावे की नाही, हा त्याचा सार्वभौम निर्णय. पण, मग संरक्षण करार करताना कोणत्या परिस्थितीत, किती आणि कशा प्रकारची मदत दिली जाईल, याबाबत स्पष्टता असणेही आवश्यक ठरते. कराराचा राजकीय फायदा घ्यायचा आणि अंमलबजावणीचा प्रश्न आला की, त्याचा अर्थ परिस्थितीनुसार लावायचा, ही पद्धत दीर्घकाळ चालू शकत नाही.

पाकिस्तानच्या या भूमिकेकडे पाहताना त्याची आर्थिक परिस्थिती, परकीय मदतीवरील अवलंबित्व आणि आंतरराष्ट्रीय राजकारणातील स्वतःचे महत्त्व टिकवण्याच्या धडपडीचा एकत्रित विचार करावा लागतो. आज पाकिस्तानने अनेक देशांकडून बक्कळ कर्ज उकळले आहे. त्यामुळे सद्यस्थितीला तरी कोणत्याही देशाच्या विरोधात आघाडी उघडणे, पाकिस्तानला तसे अशक्यच.

> **जगाच्या राजकारणात मैत्री, शत्रुत्व, करार, तह या सगळ्याच गोष्टींना एक मर्यादित आयुष्य असते. कालचा मित्र आज प्रतिस्पर्धी होऊ शकतो आणि कालचा शत्रू उद्या वाटाघाटींच्या टेबलावर शेजारी बसू शकतो. त्यामुळे आंतरराष्ट्रीय संबंधांत कायमस्वरूपी मैत्रीपेक्षा, कायम स्वरूपी हितसंबंधांनाच महत्त्व अधिक. पण, त्याचा अर्थ असा नव्हे की, राष्ट्रांच्या शब्दाला काहीच किंमत नसते. उलट, हितसंबंधांच्या या सतत बदलणाऱ्या खेळात विश्वास हीच अशी गोष्ट असते, जी एखाद्या देशाला वेगळे स्थान मिळवून देते. कारण, सामर्थ्याच्या जोरावर एखाद्या देशाला चर्चेच्या टेबलावर आणता येते; पण त्याच्या शब्दावर विश्वास ठेवायचा की नाही, हे त्याच्या पूर्वीच्या वर्तनावरच ठरते. याच विश्वासाचीही दिवाळखोरी पाकिस्तानच्या परराष्ट्रनीतीतून अधोरेखित होते आहे**

पाकिस्तान आज अनेक देशांशी अनेक करार करत आहे. प्रश्न कराराचा नाही, तर अडचण तेव्हा निर्माण होते; जेव्हा या सगळ्यांमध्ये स्वतःच्या फायद्याची गणिते मांडताना, दुसऱ्या पक्षाच्या अपेक्षांचा विचारच दुय्यम ठरतो. राजनैतिक व्यवहारात तडजोड करावी लागतेच; परंतु तडजोड आणि संदिग्धता यांत फरक असतो.

अमेरिकेसोबतच्या दुर्मीळ खनिजांच्या व्यवहारातही पाकिस्तानने हाच विश्वासघाताचा वारसा पुढे नेला. २०२५ मध्ये अमेरिकेला दुर्मीळ खनिजे पुरवण्याचा करार केल्यावर, बलुचिस्तानमधील बंडखोरांमुळे आम्ही ते अमेरिकेला पुरवू शकत नसल्याचे पाकिस्तानने म्हटले आहे. खनिजांच्या बाबतीतला प्रश्न केवळ संपत्तीचा नाही; दिलेल्या आश्वासनावर ठाम राहण्याचाही आहे.

आंतरराष्ट्रीय राजकारणात विश्वासाला महत्त्व असते. कारण, कोणताही करार भविष्यातील अनिश्चिततेवर मात करण्यासाठी केला जातो. आजची परिस्थिती उद्या बदलू शकते, सत्ताधारी बदलू शकतात, आर्थिक समीकरणे बदलू शकतात. तरीही, एखादा देश आपली बांधिलकी पाळेल, अशी अपेक्षा असल्यामुळेच राष्ट्रे दीर्घकालीन करार करतात. विश्वास संपला की, प्रत्येक व्यवहार नव्याने तपासावा लागतो. पाकिस्तानची अडचण हीच आहे. स्वतःचे हित जपणे प्रत्येक देशाला भाग असते. मात्र, ते जपताना आपल्या शब्दाची किंमतही जपावी लागते. पण, पाकिस्तानात सध्या शब्द बदलण्यालाच 'मुत्सद्देगिरी' समजले जात असल्याने, अर्थिक दिवाळखोरीबरोबरच विश्वासाचीही दिवाळखोरी वाढली आहे.